Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला--सोमवार तारीख २ माहे नोव्हेंबर सन १९१४ इ० [ अंक ४२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट
नो. नं ४

### मुंबई बॅंकचें सोनें

मुंबई बॅंकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बॅंकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बॅंकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६⅔ तोळे असतें.

मुंबई बॅंक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट
नो. नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २९

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही।मिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपेण, व्रण, चिखली, सुकी, ओली खाज, जखम, नखाविषयों, तमाम रोगावर चालणारा १ च ' दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता - व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

### गुण न आल्यास पैसे परत.

आमच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री करून घ्या. मूळ किं० रु० ४ कमी केलेली किंमत पोस्टेज सह रु० २४= यूथिन हें सतत सर्वत्र १० वर्षे अनुभवलेलें असून त्यापासून नपुंसकत्व व अन्य कारणानें आलेला कमकुवतपणा यावर खात्रीनें गुण येतो अशाबद्दल खात्री झालेली आहे.

पत्ता.—यूथिन मॅनुफॅक्चरी।चित्तूर.
नो० नं० ४०८

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

### स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपाति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें उद्याच्या भाग्यांत असेल तो केवळ दोन रुपयामध्य लाभ मिळतो या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामूली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे

पत्ता:- सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना,
नो. न. ३९६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थांनातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

### नोटीस

धी अकोला सेंट्रल बॅंक लिमिटेडचे शेअर होल्डर यांस कळविण्यांत येतें कीं सन १९१२—१३ व १९१३—१४ ह्या दोन सालासाठीं नफा वाटावयाचा आहे तरी ज्या शेअर होल्डरांचे पत्ते बदलले असतील त्यांनी आपला नवीन पत्ता कळवावा तसेंच जे शेअर होल्डर मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी आपलें नांव पूर्ण पत्ता व वारस सर्टिफिकिटें बॅंकेकडे पाठवून द्यावीं.

R. V. Mahajani
सेक्रेटरी
धी अकोला सेंट्रल बॅंक लि०
नो. नं. ४१९ तारीख ३०-९-१९१४

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-

The National Indian Life
Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay.
No. No.421

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

### ए. जे. ह्यात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ! एकच भाव! !

### ओटो मुरंगीं आमचेकड मिळणारा माल ओटो मुरंगीं

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई, चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुमबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट.

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील परवावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नं. ४१३

# वऱ्हाडसमाचार

मित्ती कार्तिक शुद्ध १९ शके १८३६


## साहित्याची अभिवृद्धि.

आज दुसरीकडे येत्या एप्रिलमध्यें मुंबईस भरणाऱ्या साहित्यसंमेलनासंबंधानें प्रसिद्ध झालेलें विनंतिपत्र दिलें आहे तिकडे महाराष्ट्र साहित्याची अभिवृद्धि इच्छिणारांचें लक्ष जाईल अशी आह्मी आशा करतों. सदर विनंतिपत्राच्या ६ व्या पोटकलमांत जे विषय चर्चेसाठीं व निबंधलेखनासाठीं सुचाविले आहेत त्यांत साहित्याच्या बहुतेक अंगांचा अंतर्भाव होण्यासारखा आहे. आमच्या दृष्टीनें त्यांत एकच उणीव आहे आणि ती शास्त्रज्ञान व कला यांच्या संबंधाचा विचार त्यांत केला गेला नाहीं ही होय. येवढ्या व्यापक विषयांवर तास अर्ध्या तासाच्या मुदतींत वाचके जातील असे लेख लिहिणारांचे अंगीं व त्याचप्रमाणें ते ऐकून त्यावर चर्चा करणारांचे अंगीं बरीच ग्रहणशक्ति असणें जरूर आहे. यापेक्षां दोनतीनच विषय घेऊन त्यावर यथास्थितपणें चर्चा करण्याची सवड साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळीनें कां दिली नाहीं तें खरोखर आह्मांस कळत नाहीं. त्याचप्रमाणें गेल्या पांच वर्षांत झालेल्या वाङ्मयाचें परीक्षण हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे खरा; पण हें परीक्षण करण्याचें काम केवढें जबाबदारीचें व नाजूक आहे, व तें हातीं घेणाराचा अधिकार केवढा असला पाहिजे या सर्व गोष्टींचा विचार केला तर हें काम पतकरणारा कोणी संमेलनास लाभेल कीं नाहीं याची शंका वाटते. यापेक्षां हें काम यंदा संमेलनाचे अध्यक्ष होणाऱ्या गृहस्थाकडे सोपाविलें असतें तर तें अधिक चांगलें झालें असतें. संमेलनाचें अध्यक्षस्थान कोणाकडून अलंकृत होणार आहे ती गोष्ट परिषदेनें अद्याप निश्चित केली नाहीं किंवा केली असून गुलदस्तांत ठेविली आहे तें कळत नाहीं. बहुधा पाहिला तर्क खरा असेल असं वाटतें, आणि तसें असेल तर यंदाच्या संमेलनाच्या अध्यक्षाच्या मानासाठीं आह्मी क्रमशः श्री० सर सयाजीराव महाराज गायकवाड, डा० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रा० सा० गणेश जनार्दन आगाशे, व रा० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी. ए. यांचीं नांवें सुचवितों. श्री० गायकवाड सरकारची विद्याप्रियता, व विद्योत्तेजन सुप्रसिद्धच आहे. संमेलनानें त्यांचा पाहुणचार चांगल्यारीतीनें घेतला आहे व त्याचा अंशतः मोबदला अध्यक्षत्वाचा सन्मान देऊन परिषदेनें परत केल्यास परिषदेच्या पदरीं कृतज्ञतेचें श्रेय पडून शिवाय परिषदेच्या भावी उत्कर्षास ही त्यांचें कृत्य उत्तमप्रकारें साह्यकारक होईल. श्री० महाराज साहेबांची ही स्वारी पुढच्या महिन्यात युरोपखंडाच्या प्रवासांतून परत येणार असल्या मुळें परिषदेनें लवकरच त्याचेकडे डेप्युटेशन पाठविल्यास चांगलें होईल असें आह्मांस वाटतें. कांहीं कारणामुळें तें न जुळल्यास सररामकृष्ण भांडारकर यांस तीच विनंति करण्यांत यावी अशी आमची सूचना आहे.

## बालसैनिक पद्धति.

वऱ्हाड शाला पत्रकाच्या आक्टोबर १९१४ च्या अंकांत बेळगांव येथील सरदार हायस्कुलांत सुरु असलेल्या बालसैनिक पद्धतीची (बॉय स्काउट सिस्टिमची) बरीच माहिती दिली आहे. ती आमच्या प्रांतांतल्या विद्याधिकाऱ्यांनीं अवश्य वाचावी, आणि ती किंवा तिच्या सारखी कांहीं पद्धति आमच्या शाळांतून सुरू करण्यास परवानगी, प्रेरणा, व प्रोत्साहन द्यावें, अशी आह्मी शिफारस करतों. सध्या आमच्या शाळा ह्मणजे शिक्षण विकत देणाऱ्या भाडोत्री संस्थाँ झाल्या आहेत. त्यांच्यांत कांहीं सत्व नाहीं. बालसैनिक पद्धती सारखी पद्धति सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना नागरिक या नात्यानें आपणावर पुढें पडणाऱ्या जबाबदारीची थोडी फार तरी कल्पना करतां येऊन ती अंगावर घेण्याचें सामर्थ्य व वळण ही लागेल, आणि आमच्या तरुणांच्या अंगची उदासीनता जाऊन सध्याच्या शिक्षणपद्धतीला कांहीं नवा दम प्राप्त होईल असा भरंवसा वाटतो. पुढें व्हालंटियर होण्यास परवानगी द्या अशी आह्मी सरकारांस जी विनंति करीत असतों त्या मागणीचा पाया शाळेंत असतांना मजबूत रीतीनें घातला जाईल, व आमच्या विनंतीला दुजोरा मिळून ब्रिटिश राज्याशीं आमचा असलेला संबंध अधिक दृढ करण्याचा यत्न केल्याचें श्रेय ही विद्याधिकाऱ्यांस मिळेल. शिवाय हा बालसैनिक पद्धति नुसत्या लष्करी पेशालाच उपयोगीं पडणारी नसून समाज सेवेचीं निरानिराळीं अंगें, भूतदया, वगैरे बाबतींतही तिचा उपयोग करून घेतां येईल. यासाठीं हा पद्धति सर्व शाळांतून सुरू करण्याविषयीं पालकांनीं सरकारी अधिकाऱ्यांना नम्रपणें विनंति करावी अशी आह्मी सूचना करतों.

## ब्राह्मणांचें प्राचीन ध्येय

### [ डाक्तर केतकर यांचें व्याख्यान ]

रावबहादूर महाजनी यांच्या तारीख १२ रोजीं झालेल्या व्याख्यानानंतर डाक्टर केतकर यांचें जें बोलणें झालें त्याचा सारांश येणेंप्रमाणें.

प्राचीन ब्राह्मणांचें ध्येय हा विषय घेऊन रावबहादूर महाजनी यानीं त्या विषयावर आज चांगलें विवेचन केलें. क्षमा, शांति. हें त्यांचें ध्येय होतें असा त्यांचा व्याख्यानाचा तात्पर्यार्थ निघाला. माझ्या मतानें ब्राह्मणांचें ध्येय शांति दया वगैरे ह्मणून अण्णासाहेबानीं सांगितलें तें फक्त अंशतः बरोबर आहे. एखाद्या वर्गाचें कर्तव्य काय होतें हें जर आपणांस ऐतिहासिक पद्धतीनें ठरवावयाचें असेल, तर तत्कालीन उपदेशकांनीं अगर नीतिवेत्त्यांनीं त्या विषयासंबंधीं काय लिहिलें होतें तेवढेंच सांगितल्यानें भागावयाचें नाहीं. तो वर्ग त्या काळीं काय कर्तव्य खरोखर बजावीत होता हें पाहिलें पाहिजे व तें पाहिल्यानंतर तत्कालिन उपदेशाचें महत्व आपल्या लक्षांत येणार आहे. कारण पुष्कळदां असें होतें कीं उपदेशक मुख्य कर्तव्य न सांगता ज्या कर्तव्याचें लोकांत विस्मरण पडत चाललें असेल त्या कर्तव्याच्या महत्वावरच व्याख्यान देतो. आज आपल्या हातीं जे लेख येतील ते विस्मृत कर्तव्यासंबंधानेंच असणें शक्य आहे. शिवाय ब्राह्मणांचें ध्येय कोणतें होतें हें ठरविण्यासाठीं रावबहादुरांनीं उपयोगास आणलेलें साहित्य अपुरें आहे. त्यांनीं महाभारतांतील एकाच चरित्राचा उपयोग केला. प्राचीन ब्राह्मणांच्या कर्तव्य निर्णयास जी खटपट करावयाची ती सांगितली पाहिजे ती येणें प्रमाणें आहे.: —

समाजाचें सामान्य ध्येय काय होतें हें पहावें. व तें ध्येय पार पाडण्यासाठीं ब्राह्मणांचें कर्तव्य काय ठरलें होतें हें पहावें. “ ब्राह्मणांचें ध्येय ” या शद्वाचे दोन अर्थ होऊं शकतात एक अर्थ ह्मटला ह्मणजे “ ब्राह्मण निर्मित सामाजिक ध्येय ” व दुसरा अर्थ ह्मटला ह्मणजे “ब्राह्मणांच्या संबंधाचें ( ह्मणजे ब्राह्मणांनीं स्वतःसाठीं निर्माण केलेलें ) ध्येय. ” दोन्हीं तऱ्हेनें ध्येयें व्यक्त करावयाचीं झालीं ह्मणजे ब्राह्मणांना स्वतःसाठीं ठरविलेलीं कर्तव्यें व समाजापुढील सामान्य ध्येय या दोहोंची मीमांसा केली पाहिजे. व या दोन्हीं गोष्टींचा अभ्यास करावयाचा झाल्यास साहित्य देखील विविध आहे. तत्कालीन उपदेशकांचे ग्रंथ व तत्कालीन वस्तुस्थिति या दोहोंचा अभ्यास झाला पाहिजे. तत्कालीन उपदेशकांचे ग्रंथ ह्मटले ह्मणजे केवळ इतिहास पुराणें नव्हत. धर्मशास्त्रकार नीतिवेत्ते, अर्थशास्त्रकार याचे ग्रंथ अवलोकन केले पाहिजेत व त्यांच्या दृष्टीनें इतिहास पुराणें वाचलीं पाहिजेत.

या सर्व ग्रंथाचें अवलोकन केलें ह्मणजे त्यांची एकवाक्यता कांहीं बाबतींत दिसून येते. समाजाच्या सुस्थितीसाठीं चातुर्वर्ण्य कायम राहिलें पाहिजे असें सर्वांस वाटत होतें असें दिसतें व तें चातुर्वर्ण्य कायम रहाण्यासाठीं ब्राह्मणांनीं स्ववर्णास योग्य असें कर्म करावें, असा सर्व ग्रंथांचा उपदेश आहे प्राचीन ब्राह्मणांचें सामाजिक कार्य लक्षांत घेतलें व त्याचें पृथक्करण केलें असतां आपणांस त्यांच्या कर्तव्याचे भाग आढळून येतात ते येणें प्रमाणें ·

१ धर्म शास्त्राचे उत्पादक, अभ्यासक व वर्धक या दृष्टीनें कर्तव्य कर्म

२ विवाह मौंजीबंधनादि संस्काराचे अधिकारी या नात्यानें त्यांचें कर्तव्य कर्म

३ समाजांतील अत्यंत उच्च जाति या दृष्टीनें त्यांचें कर्तव्य कर्म.

या सर्व गोष्टी ब्राह्मणांस त्यांची समाजांतील विशिष्ट पदवी ठेवण्यास अवश्य आहेत

आपण आजची स्थिति जर पाहिली तर आपणांस असें आढळून येईल कीं आपलीं कर्तव्यें चांगल्या तऱ्हेनें बजावण्यासाठीं अवश्य असणारे सर्व अधिकार आज आपल्या हातून जवळ जवळ जात चालले आहेत.

आपण संस्कारांचे अधिकारी आहोंत पण उद्यां ब्राह्मणांमार्फत लग्नें व्हावयाच्या ऐवजीं “ सिव्हिल म्यारेजेस् ” होऊं लागलीं ह्मणजे आज जो उपाध्येपणाचा अधिकार आपल्या हातीं आहे तो इंग्रज अगर सरकारनें नेमलेले अधिकारी यांच्या हातीं बळकावून बसतील.

धर्मशास्त्राच प्रवर्तक या नात्यानें आपलें कर्तव्य आटोपलेंच आहे. कायदा अगर कायद्यापेक्षां उच्च असें जें धर्मशास्त्र त्यावर भर घालण्याची आज आपली ताकद नाहीं. आह्मी ह्मणायला लागलों कीं कायदा अमूक प्रकारचा असावा. आमच्या ह्मणण्यास विचारितो कोण? आजच्या देशशासनासाठीं जें धर्मशास्त्र अगर नीतिशास्त्र निर्माण करावयाचें तें आज आपण करीत नाहीं. शास्त्री पंडित हें तर करीत नाहींतच पण आज इंग्रजी शिकलेले लोक ही करीत नाहींत. आजची इंग्रजी शिकलेली मंडळी ह्मणजे सामाजिक व राजकीय गोष्टींवर स्वतंत्र विचार करणारी नाहींत तर इंग्रज लेखकाच्या वाक्यांचा पुनरुच्चार करणारी आहे. आपल्या देशांत स्वतंत्र विचार करणारा वर्ग निर्माण झाला पाहिजे व त्या वर्गानें आपलें स्वतंत्र शासनाविषयक तत्वज्ञान निर्माण केलें पाहिजे, व त्या तत्वज्ञानानुसार वागणें सरकारास भाग पाडलें पाहिजे. तरच आपल्या देशातील लोकांच्या अंगीच समाजाचे ब्राह्मण्य धर्म नियामकत्व येईल नाहीं तर तें इंग्रजांकडेस राहील.

समाजांतील श्रेष्ठ जाति या दृष्टीनें आपलें एक कर्तव्य कर्म आहे. ज्या जातीबरोबर इतर जाती अधिक निकटता स्थापूं इच्छितात ती समाजातील श्रेष्ठ जाती होय. ज्या जातीबरोबर इतर जाती विवाह संबंध करूं इच्छितील त्या जातीस आपोआपच श्रेष्ठपणा येतो. या स्वाभाविक नियमास लक्षात घेऊनच ब्राह्मणांनीं सर्व ह्मणजे चारही वर्णाच्या स्त्रियांबरोबर लग्नें करावींत, तसेंच क्षत्रियांनीं तीन वर्णांबरोबर वैश्यानीं दोन वर्णांबरोबर व शूद्रांनीं एक वर्णाबरोबर अशीं लग्नें करावींत असें धर्मशास्त्रकारानीं ठरविलें आहे. आज ब्राह्मण जर चारही वर्णांबरोबर लग्नें करून समाजाचा मध्यबिंदु बनणार नाहींत तर कदाचित् इंग्रज बनतील हें लक्षांत ठेवलें पाहिजे. परवा कुचविहारच्या राज घराण्यांतील दोघीं मुलींनीं दोन गोऱ्यांबरोबर लग्नें लावलीं व कपुरथळ्याच्या महाराजांनीं एका यूरोपीयन नर्तकी बरोबर लग्न केलें होतें हें आपणांस ठाऊकच आहे. एवंच, सर्व वर्णांबरोबर लग्न करणें हें आपणांस आपलें ब्राह्मण्य रक्षण करावयाचें या दृष्टीनें कर्तव्य आहे.

थोडक्यात सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे आपल्या पुढील प्रश्न आज हिंदुसमाजाचें ब्राह्मण आपणच रहावयाचें अगर इंग्रजांस होऊं द्यावयाचें हा आहे. दया, क्षमा, शांति हे सर्व शद्व सुंदर आहेत व ते वापरण्याचा मोह आपणांस फार पडतो. आपल्या हातचा अधिकारच नष्ट होत चालला आहे, तर आपण दया, क्षमा, शांति इत्यादि गुण कितपतस प्रचारात आणणार? आपणांस शिक्षा अगर क्षमा करण्याची ताकदच नसली तर आपण क्षमा तरी काय करणार?

मला असें वाटतें कीं क्षमा शांतीचा उपदेश करणें ही एक तऱ्हेची पराजय झाली असावी व ती पडण्याचें कारण बरच दूरवर आहे. मुसलमानी राज्य स्थापन झाल्यानंतर आपलें राजकीय कर्तव्यच उरलें नव्हतें, व तेव्हांपासून आपणांस जर कांहीं पोटापाण्याकडचें कर्तव्यें करावयाचें असल्यास परमार्थ साधन हें होतें. तेव्हां परमार्थ साधनार्थ जी आपलीं कर्तव्यें असतील त्या-

वरच बरीच भिस्त पडली होती. दया क्षमा इत्यादि गोष्टींवर आज राव बहादुरांनीं जो जोर दिला तो आतां निर्देश केलेल्या स्थितीचाच द्योतक आहे असें मला वाटतें.

मी या आज तुह्मांस ब्राह्मण्यासंबंधाच्या कल्पना सांगत आहे त्या कदाचित् आपणास नवीन वाटतील पण खरोखर पहातां यांत नवीन कांहीं नाहीं. आपणापैकीं पुष्कळ लोकांस इतिहास अवगत नसतो व ऐतिहासिक रीतीनें अवलोकन करण्याची संवय लागली नसते त्यामुळें अगदीं सामान्य कल्पना विचित्र वाटतात. आज आपणास ज्या गोष्टी सांगत आहे त्यापैकीं कांहीं मी "उद्यान" नांवाच्या मासिकांत प्रसिद्ध केल्या होत्या व त्या लेखावर, तो लेख ज्याला समजलाच नाहीं अशा एका विनोदी लेखकानें येथील एका पत्रांतून टीका केली होती. हें आपणांपैकीं कांहीं जणांस आठवत असेलच.

रावबहादूर महाजनी यांनीं दया, क्षमा हें ब्राह्मणांचें प्राचीन ध्येय होतें ह्मणून सांगितलें तें एक अपलें महत्त्वाचें ध्येय आहे यांत शंका नाहीं. तथापि ते ध्येय पार पाडण्यासाठीं ब्राह्मणाचे अधिकार अगोदर हातीं असले पाहिजेत. आपल्या हातीं ब्राह्मणाचे अधिकार मिळविण्याचा प्रयत्न करणें आपलें अगोदरचें कर्तव्य आहे तो प्रयत्न यशस्वी झाला ह्मणजे दया, क्षमा, शांति हे सद्गुण मिळविण्याचा प्रयत्न आपण सावकाशपणें करूं.

तथापि हा सर्व खटाटोप जो करावयाचा, तो आपणांस जर समाजाचें ब्राह्मण रहाण्याची चाड असेल तरच करावयाचा. जर इंग्रजासच हिंदुस्थानचे ब्राह्मण होऊं द्यावयाचें असेल, तर तोहि खटाटोप नको. शूद्रच रहाण्याची ज्याची इच्छा असेल त्यांस कर्तव्य विवेचनाची जरूर काय? आपलें कर्तव्य काय हें ठरवणें अगोदर आपल्या इच्छेवर आहे. यासाठीं इंग्रजास आपले ब्राह्मण होऊं द्यावयाचें कीं आपण स्वतः व्हावयाचें, हा प्रश्न, तुमच्या पुढें, विचार करण्यासाठीं, पुन्हा, एकदां ठेवतों, आणि आपली रजा घेतों,

## जर्मनींतले हिंदी विद्यार्थी.

आपल्या देशांतून पुष्कळ तरुण शास्त्र व कला यांचे ज्ञान संपादण्यासाठीं जर्मनींत गेले होते. सध्याच्या युद्धाला एका एकीं सुरुवात झाल्यामुळें त्यांना त्या देशांतून निघून इंग्लंडांत जाऊन पोंचण्यास पुरेसा वेळ न मिळाल्यामुळें ते युद्ध संपेपर्यंत तेथेंच अडकून पडले असतील, आणि त्याचे पालक व इष्टमित्र यांना साहजिकच त्यांच्याविषयीं चिंता लागून राहिली असेल. अशा पालकांची चिंता दूर करण्याकरितां जर्मनींत असलेले प्रो० रुचिराम शहानी व मि. भावे या दोघांनीं निरनिराळ्या पत्रांतून जर्मन लोकांच्या मायाळूपणाच्या व सभ्य वागणुकीविषयींचा आपला स्वतःचा अनुभव प्रसिद्ध केला आहे. जर्मन लष्करी शिपायांनीं फ्रान्स व बेल्ज्यम या देशांतून केलेल्या राक्षसी कृत्यांचें वर्णन वांचून एकंदर जर्मन राष्ट्रासंबंधानें सरसकट दुष्टपणाचा आरोप करणें किती अन्यायाचें व चुकीचें आहे हें त्यावरून दिसून येईल. ऐन युद्ध सुरू होण्याच्या वेळीं जर्मनींतून निघून जाण्याची घाई कित्येक हिंदी विद्यार्थी करूं लागले, तेव्हां कित्येकांना भाड्याचे पैसे देऊन, कित्येकांना जाण्याचे परवाने मिळवून देण्याचे कामीं मदत करून आणि कित्येकांना आपल्या घरीं नेऊन ठेवून घाबरलेल्या मनाला धीर देऊन जर्मन प्रोफेसरांनीं आपलें सौजन्य प्रकट केलें असें प्रो. रुचिराम व मि. भावे या दोघांच्या पत्रांवरून दिसतें. युद्धांतली निर्दयता व राक्षसीपणा युद्धांत समरभूमीवर, इतरप्रसंगीं सभ्यपणा व सौजन्य सोडावयाचें नाहीं, असा जर्मन लोकांचा स्वभाव दिसतो. इकडे सुद्धां एमडननें हिंदी महासागरांत धुमाकूळ घातला त्यावेळींसुद्धां जहाजावरच्या लोकांना दयाळूपणानें वागविलें, व कोणाच्याही प्राणाची हानि बुद्धिपुरःसर होऊं दिली नाहीं, असें बुडविलेल्या जहाजावरील उतारूंनीं स्पष्टपणें कबूल केलें आहे. तेव्हां जर्मनींत अडकून पडलेल्या हिंदीविद्यार्थ्यांच्या पालकांच्या भीतिग्रस्त व चिंतातुर मनाला वरील दोघां हिंदी गृहस्थांनीं दिलेला स्वतःचा अनुभव वाचून थोडेंसें तरी समाधान वाटेल अशी आह्मी आशा करतों.

## शोचनीय मृत्यु.

हिंदुस्थानचे अत्यंत कळकळीचे आणि प्रेमळ मित्र सर हेनरी कॉटन यांच्या पत्नी लेडी कॉटन यांना गेल्या महिन्यांत देवाज्ञा झाल्याचें शोचनीय वृत्त गेल्या आठवड्यांत हातीं आलेल्या 'इंडिया' पत्रावरून कळतें. लेडी कॉटन यांचे अंगीं आपल्या पती प्रमाणेंच अत्यंत सौजन्य व हिंदुस्थानाविषयींचें प्रेम वसत होतें. हिंदी गृहस्थाना त्यांच्या घराचे दरवाजे नेहमीं खुले असत, व दुःखी कष्टी हिंदी लोकांवर त्या आईसारखें प्रेम करीत हें त्यांच्या घरीं जाऊन स्वागताचा व पाहुणचाराचा लाभ घेऊन आलेल्या आमच्या एका मित्रानें स्वानुभवावरून आह्मांस सांगितलें आहे. अशा प्रिय जनाचा विरह हिंदुस्थानाला दुःसह वाटणें साहजिक आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांति व उत्तम गति देवो.

## मिसेस बिझांट आणि राष्ट्रीय सभा

मिसेस बिझांट यांनीं अलीकडे हिंदुस्थानच्या राजकीय उन्नतीचा प्रश्न हातीं घेतला आहे हें हिंदुस्थानचें भाग्य आहे असें आह्मी नुकतेंच ह्मटलें होतें. याला पुरावा पाहिजे असेल तर त्यांनीं कांग्रेसबद्दल जो एक सुंदर लेख कॉमनवील पत्राच्या २३ आक्टोबरच्या अंकांत लिहिला आहे तो पहावा. अलीकडे राष्ट्रीय सभेसंबंधानें आपसांतल्या दुफळीमुळें व इतर कारणांमुळें पुष्कळांच्या ठायीं अनुत्साह, व उदासीनता दिसून येत आहे. पण यांच्या मुळाशीं असलेल्या कारणांची मीमांसा मिसेस बिझांट यांनीं जशी केली आहे तशी थोड्याच लेखकांनीं केली असेल. प्रथम आंग्लोइंडियन अधिकारी राष्ट्रीय सभा हें केवळ थोतांड आहे असें समजून त्या संस्थेचा उपहास करीत व हें सोंग फार दिवस टिकणार नाहीं असें भविष्य वर्तवीत. पुढें तिच्यांत चिवटपणा व जोम आहे असें दिसूं लागतांच त्या उपहासाचें द्वेषांत व तिरस्कारांत रूपांतर होऊन ते राष्ट्रीयसभेच्या भक्तांचा छळ करूं लागले. याही दिव्यांतून राष्ट्रभक्त सुखरूपपणें पार पडले, तेव्हां तेचलोक तिच्याविषयीं थोडाबहुत आदर दाखवूं लागले व तिच्या न्यायाच्या मागण्यांचा विचार करू लागले 'मॉर्ले–मिंटो सुधारणा' हें त्या विचारांचें उत्तम फळ हिंदुस्थानाला प्राप्त झालें. पुढें राष्ट्रीय सभेनें पाठविलेल्या प्रतिनिधि मंडळाचें खुद्द व्हाइसराय साहेबांनीं आदर पूर्वक स्वागत केलें येथपर्यंत मजल आली. पण तेथेंच ती मजल तूर्त थांबली आहे. पुढें पाऊल कां पडलें नाहीं ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. मिसेस बिझांट बाईंचें असें मत आहे कीं राष्ट्रीय सभेनें आपल्या कार्यपद्धतींत आतां सुधारणा करणें अवश्य आहे. ती केल्यास पुढें पाऊल पडण्यास फारसा कालावधि लागणार नाहीं. त्याच्या मतें आतां राष्ट्रीय सभेनें कायदेकौंसिलांत लोकमताचा प्रभाव दिसावा ह्मणून लोक मताला शिक्षण देणें, कौंसिलांत लोकांच्या तर्फेनें मांडण्यांत येणाऱ्या गोष्टींचा समर्थनार्थ पुरावा व प्रमाणें यांची सिद्धता करणें, आणि लोक मताला सशक्त करणें ही तीन कार्यें करावयास पाहिजेत. पैकीं पहिलें कार्य करण्यासाठीं थोड्याच पण निवडक विषयांवर अधिकारी माणसाकडून चर्चा करवून त्याची शहरांतून व गांवांतून सभांच्या व पत्रांच्या द्वारें प्रसिद्धि करणें अवश्य आहे. जे विषय लवकरच कौंसिलांपुढें आणण्याइतके परिपक्व झाले असतील ते हातीं घेऊन त्यासंबंधाचे कौंसिलाचे ठराव बिलांच्या रूपानें कौंसिलांचे पुढें आणण्यानें पहिलें कार्य सिद्ध होईल. ठिकठिकाणीं कमिट्या नेमून त्यांच्या मार्फत जागोजागची माहिती आणवून त्या माहितीला व्यवस्थित स्वरूप देण्याची तजवीज करण्यानें दुसरें कार्य साधतां येईल, आणि तिसरें कार्य 'अखील भारत राष्ट्रसभा मंडळी' (ऑल इंडिया कांग्रेस कमिटीनें) हातीं घेऊन पार पाडावें ह्मणजे तिसरें ही कार्य साधेल. सध्या युद्धामुळें ब्रिटिश राज्यावर संकट आलेलें आहे. अशा वेळीं यंदाच्या कांग्रेसमध्यें हत्याराच्या कायद्याची व प्रेस आक्टाची दुरुस्ती यांच्या संबंधाचा तेवढा एक ठराव पास करण्यापलीकडे कोणतीही गाऱ्हाणीं राष्ट्रीय सभेनें सरकार पुढें मांडूं नयेत. मिसेस बिझांट बाईंच्या या सूचनेला सर्व हिंदीगृहस्थांकडून चांगलें पाठबळ मिळेल अशी आह्मांस खात्री आहे.

## तुर्कस्थानांतली गडबड

कान्स्टान्टिनोपल येथील ता. १४ आक्टोबरच्या तारवरून कळतें कीं ब्रिटिशसरकारनें तेथील सल्लागारी ॲडामिरल लिम्पस व त्याच्या हाताखालचें आरमार यांस परत बोलावलें आहे. यावरून तुर्की लोकांना आश्चर्य वाटलें, पण तुर्कस्थानांतल्या ब्रिटिशांना आश्चर्य वाटलें तें येवढेंच कीं तुर्कस्थाननें आपल्या आरमारावर अनेक जर्मन आफिसर नेमलेले ठाऊक असतां ब्रिटिशसरकारानें आपलें आरमार परत बोलावण्यास इतका विलंब कसा केला व तुर्कस्थानांतल्या जर्मन आफिसराकडून ब्रिटिश आफिसरांचा मानभंग आजपर्यंत तरी कां होऊं दिला?

म्यांचेस्टर गार्डियन पत्राचा रोम येथील बातमीदार आथेन्सच्या पत्राचा उतारा देऊन ह्मणतो कीं अनवर पातशहा व तुर्कस्थानचे युवराज नुकतेच लढाईविषयीं संभाषण करीत असतां पातशहाला एकाएकीं इतका आवेश चढला कीं त्यांनीं खुद्द युवराजाच्या अंगावर पिस्तुलाचे दोन बार झाडले. युवराजाच्या डाव्या हाताला थोडीशी जखम झाली युवराजानें उलट पिस्तुल झाडून पातशाहाचा पाय जखमी केला. दुसरी एक बातमी अशी आहे कीं अनवर पातशहा मेले. पण इतली सरकारला या गोष्टीची अद्याप खबर नाहीं.

डेलीमेल पत्राचा बातमीदार लिहितो कीं तुर्कस्थानांतले फार थोडे सुशिक्षित मुसलमान काय ते इंग्लंडच्या बाजूचे आहेत. बाकीचे सारे मुसलमान जर्मनीला अनुकूळ आहेत. या लोकांची तर अशी भोळी समजूत आहे कीं खुद्द केसर मनांतून मुसलमान आहे, फक्त राजकारणासाठीं त्याला बाह्यात्कारीं ख्रिस्त्यासारखें आचरण करावें लागत आहे,

एक तुर्की वर्तमानपत्र लिहितें कीं जेरुसलेम येथील सेनापति जर्मनीला अनुकूळ आहे. त्यानें आपल्या राज्यांतल्या मुसलमान पत्रकर्त्यांना बोलावून तुह्मी जर्मनीच्या विरुद्ध कांहीं बातमी छापतां उपयोगाची नाहीं असें त्यांना निक्षून सांगितलें आहे.

तुर्की फौजेला जमा करण्याचे यत्न चालले आहेत. व्हालंटियर लोकांना खाण्यापिण्याचा व पोशाखाचा स्वतःच खर्च सोसावा लागतो. सरकारांतून फक्त बंदूक मिळते. तुर्की सरकारच्या खजीन्यांत पैसे नसल्यामुळें सध्यां लढाईचें सामान उधारीनें खरीद करण्यांत येत आहे.

सीरिया, दमास्कस, अलेप्पो, हैफ, व जेरूसलेम हीं आरमाराचीं ठाणीं झालीं आहेत. रोज रंगरूट (रिक्रूट) ची भरती होत आहे व कवायत सुरू आहे. तुर्की टोपी जाऊन तिची जागा जर्मन टोपीनें पटकाविली आहे.

सध्याच्या लढाईच्या अनर्थाला इंग्लं[ड] कारण आहे असें तुर्की लोक समजत आहे[त] व त्यामुळें इंग्रज लोकांची निंदा चालली आहे. प्यालेस्टाईन मधून द्रव्याभावामुळें कांहीं मिशनरी लोक निघून गेले, तेव्हापासू[न] त्यांच्यासंबंधानें गमती गमतीच्या गप्[पा] उठत आहेत. कोणी ह्मणतात कीं जेव[ढे] ख्रिस्ती दिसतील तेवढ्यांची कत्तल करण्या[चे] हुकुम सुटले आहेत ही बातमी गुप्त[प]णें या लोकांना आगाऊ कळल्यामुळें भिऊन लोक पळाले. कोणी ह्मणतात कीं इंग्लं[ड] प्यालेस्टाइनवर रोख धरून तो प्रांत लवकर काबीज करण्याच्या बेतांत आहे.

अशा तऱ्हेतऱ्हेच्या बातम्या तुर्कस्थानांतू[न] येत आहेत. त्यावरून आणि जर्मन आफि[स]रांना आरमारावरून काढण्यासंबंधानें इंग्लं[ड]नें लिहिलेल्या खलित्यास तुर्कस्थान कडून नव[ख]राचा जबाब मिळाल्याचें प्रसिद्ध झालें अ[सून] त्यावरून तुर्कस्थानांतल्या गडबडीचें स्व[रूप] वाचकांच्या लक्षांत येईल.

मि. एच. ओ. आरनॉल्ड फॉस्टर आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत लिहितात कोणत्याही शतकांतल्या १९ व्या वर्[षाचा] महिमा कांहीं अजब दिसतो. सन १२

मध्यें जॉन राजा व सरदार मंडळी यांच्यांत विरोध येऊन अखेर राजाला म्याग्राचार्टावर सही करावी लागली व स्वतःचे हातपाय जखडून घ्यावे लागले.

१४१२ मध्यें एजिन कोर्टच्या लढाईंत इंग्लंडला जय मिळाल्यामुळें इंग्लंडची अब्रू राहिली.

१७१९ मध्यें ज्याकोबाइट लोकांचा सत्यानास होऊन इंग्लंडच्या राजघराण्याला शांतता मिळाली. १८१९ मध्यें वॉटर्लूच्या लढाईंत इंग्लंडानें विजय संपादून नेपोलियनचें नाक पुरतेपणीं ठेचलें. ही मागची परंपरा कायम राहावयाची असेल तर १९१९मध्यें जर्मनीवर इंग्लंड, फ्रान्स, व रशिया यांच्या संयुक्त सैन्याला जय मिळून साऱ्या जगाला भयचकित करून सोडणाऱ्या जर्मनसेनासत्तेचा नायनाट होईल.

मॅडम मॅकरेज नांवाची एक शूर फ्रेंच स्त्री सोसां येथील मेयर "शहरचा मुख्य अधिकारी" जर्मन लोकांच्या भीतीनें पळून गेल्यावर त्या शहराचा कारभार पाहत होती. तिनें पोलीस, दारूगोळा, दवाखाना वगैरेंची व्यवस्था रोजचेरोज स्वतः जाऊन पाहावी. जर्मन लोकांनीं तें शहर घेतलें तरी ही निधड्या छातीची स्त्री तेथेंच राहिली होती. जर्मनलोकांनीं तिच्यापाशीं तंबाखू व सिगरेट मागितली तेव्हा तिनें निरोप पाठविला कीं चंद्र सूर्य कां मागत नाहीं?

इकडे एमडेन जहाजानें आतां पर्यंत सुमारें दीड डझन बोटी बुडविल्या. याच वेळीं युरोप खंडांत अटलांटिक महासागरांत दुसरें एक एमडन नावाचें जहाज चाचेपण करीत आहे. त्यानें एकाच आठवड्यांत तेरा बोटी बुडविल्याची खबर आली आहे!

जर्मन लोक रशियांत धुमाकूळ घालण्यासाठीं वार्सापर्यंत गेले होते. पण तेथें त्यांना अशा जबर मार मिळाला कीं त्यांना आतां पळतां पळतां पुरें वाट झाली आहे.

हिंदुस्थानांतून गेलेलें मदतीस सैन्य फ्रान्समध्यें शत्रूला आपल्या तरवारीचें पाणी दाखवीत आहे. तोफांच्या भडिमारापुढें हे लोक निधड्या छातीनें उभेराहून लढतांना पाहून युरोपियन लोक चकित झाले आहेत. हिंदुस्थानची मागून गेलेली फौजही फ्रान्समध्यें गेल्या आठवड्यांत उतरल्याची बातमी आली आहे.

बोअर लोकांचा कम्यांडर मारित्झ हा दगलबाजी करून जर्मन लोकांना जाऊन मिळाला आहे. पण तेथें ही त्याचें व जर्मन लोकांचें इतक्यांतच पटेनासें झाल्याची बातमी आली आहे. त्याला मिळालेले आफिसर व शिपाई परत युनिअन सरकाराकडे आले आहेत, कांहीं पकडले गेले आहेत. एवंच दक्षिण आफ्रिकेंतलें बंड मोडलें आहे. आनंदाची गोष्ट.

## हिंदी सैनिकांचें शौर्य.

युरोपांतल्या युद्धांत सामिल होण्यासाठीं इकडून गेलेले हिंदी सैनिक जर्मनांशीं शौर्यानें लढून आपला आजपर्यंतचा लौकिक कायम राखीत आहेत हें ऐकून प्रत्येक हिंदीमनुष्यास आनंद वाटेल. हे सैनिक फ्रान्समध्यें पोंचल्याबरोबर दुसरेच दिवशीं जर्मन लोकांशीं त्यांचा सामना झाला. या सामन्याची हकीकत तेथें प्रत्यक्ष हजर असलेल्या एका लष्करी माणसानें प्रसिद्ध केली आहे. तो ह्मणतो कीं जर्मन लोक मोठ्यागुर्मीत होते. इतक्यांत शत्रूकडून काळी फौज कांहीं विचित्र जयध्वनि करीत व एकच कल्लोळ करीत पुढें सरसावली. त्यांचा हल्ला इतका निकराचा होता कीं आपल्यापुढें काय आहे इकडे त्यांची दृष्टिच नव्हती. आवेशानें धुंद होऊन ते एकसारखे तुटून पडत होते. त्यांच्या त्या आवेशापुढें जर्मन लोकांचा टिकाव निघेना. हिंदी सैन्य जर्मनांची टोळी फोडून चोहोंकडे दाणादाण करीत चाललें होतें, आणि जर्मन शिपाई हे कोण सैतान आपल्या मागें लागले आहेत हें पाहून घाबरून धूम पळत आहेत, अशा रीतीनें एक मैलपर्यंत हिंदी सैन्यानें त्यांचा पाठलाग केला. सारांश काय कीं या पहिल्याच चकमकीनें हिंदी सैन्यानें आपल्या नांवाचा दरारा चोहींकडे बसविला आहे. फार उत्तम गोष्ट.

## मनुष्याच्या जिवाची किंमत.

मनुष्याच्या देहांत जी रासायनिक द्रव्यें आहेत त्यांची व्यवहारिक किंमत फक्त १७।१८ रुपये होते असें कोणी एका शास्त्रज्ञानें काढलें आहे असें आह्मीं वाचिलें आहे तशी हिंदुस्थानांतल्या काळ्या माणसाच्या जिवाची किंमत हल्लींच्या बाजारभावाप्रमाणें फक्त २९ रुपये होते असा मंत्र कोणी अदृश्य महात्म्यानें मुंबईच्या म्याजिस्ट्रेटाच्या कानांत सांगितला कीं काय कोण जाणे! मुंबईचे पोर्ट ट्रस्ट इनस्पेक्टर मि. मार्टिन फोर्ब्स यांच्यावर जबर दुखापत केल्याचा खटला पोलीसनें केला होता. त्या खटल्याच्या चौकशीअंती म्याजिस्टेट साहेबांनीं आरोपीला फक्त २९ रु० दंडावरच सोडून दिलें. या आरोपीनें धोंडू नांवाच्या एका काळ्या नोकराला तो कामांत चुकल्या बद्दल मारलें व तो मेला अशा गोष्टी आहेत. म्याजिस्ट्रेट साहेबांनीं ठरविलें कीं यात आरोपीकडे विशेषसा दोष नाहीं. व त्यास २९ रु० दंडावर सोडून दिलें. बरोबर आहे. मयतानें दुर्बळ प्लीहा पोटांत अगोदर वागवावीच का? सगळ्या काळ्या हिंदी नोकरांना दुर्बळ प्लीहा वागविण्याची दुष्ट खोड आहे आणि ती खोड घालविल्याशिवाय असे खटले म्याजिस्ट्रेट पुढें येणें कधीं बंद होणार नाहीं. किंवा असे खटल उपस्थित होऊ नयेत ह्मणून सरकारनें एक असा नियम करावा कीं ज्या ज्याला युरोपियन अधिकाऱ्याचे हाताखालीं काम करावयाचें असेल त्यांनीं आपली प्लीहा अगोदर डाक्तरकडून तपासवून घेऊन त्याचें सर्टिफिकेट दाखविल्याशिवाय त्याला नोकर ठेवतां येणार नाहीं. असा कांहीं नियम केल्याशिवाय अशा खटल्यांच्या निकालांत ब्रिटिश सरकारच्या न्याय देवतेचे जे निष्कारण टीकाकारांकडून हाल होतात ते बंद होणार नाहींत.

## अपूर्व महायुद्ध

लक्षावधी फ्रेंच इंग्लिश व हिंदीसैन्य लक्षावधी जर्मन सैन्याला मागे मागे जर्मनीमध्यें हटवीत आहे. बंगालच्या घोडेस्वार पलटणींनें तर जर्मन घोडेस्वारांना चांगलाच पोबारा काढण्याला भाग पाडलें हें ऐकून सर्वत्र आनंद होईल. जर्मन लोक एक मैल पर्यंत सैरावैरा पळत गेले. ब्रिटिश खंदकाच्या बाजूनें जर्मन सैन्य तुटून पडणार होतें इतक्यांत हिंदी शिपायानीं तेथें अप्रतिम पराक्रम दाखविला आणि जर्मनांचा हल्ला मागें परतला. बेलज्यम मधून जर्मन फ्रान्सवर उतरू लागले होते त्यांस बेलजम मधून आतां क्रमा- आतां क्रमाक्रमानें माघार घ्यावी लागत आहे. पूर्वेच्या बाजूनें रशियन सैन्य जर्मन सैन्याचा धमधडाका उडवून त्याला आपल्या राज्याच्या हद्दींतच अधिक कोंडीत कोंडीत चाललें आहे. लढाईच्या बातम्या ऐकण्याला जितके आपण उत्सुक आहों तितक्या त्या संजयासारखा कोणी दिव्यचक्षु मिळे पर्यंत मिळण्याचा संभव नाहीं. लोकांची वृत्ती इतकी तळफवान होत चालली आहे कीं दररोजच्या बातम्या वाचून त्यावर नाना फडनीशी टीका केल्याशिवाय त्याना चैनच पडावयाचे नाहीं. एकंदर इतके दिवसाच्या लढाइच्या ओघावरून तोफखाना, विमानें, लढाऊ आरमारें इत्यादि नवीन यांत्रिक अस्त्रें व यंत्र यानीं रक्ताचा कोट चालविला आहे. असें महायुद्ध ईश्वरी संकेतावाचून होण्याचा संभवच नव्हता आणि त्यामध्यें इंडियन सैन्याला आपल्या इतर आर्य बंधूबरोबर प्रतिस्पर्धी आर्यबंधूवर निकरानें लढावें लागत आहे ही गोष्टच कांहींतरी मोठ्या भवी क्रांतीचा पूर्व योग सुचवीत आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः–** दुपारीं कडक ऊन पडून बराच उष्मा होतो. परंतु रात्रीं व सकाळीं चांगली थंडी पडते. मध्यंतरी आकाश साभ्र असे. परंतु हल्लींच्या रात्री फार रमणीय असतात. तेव्हां या रात्रीच्या सूर्याच्या अमृत किर्णांचा लाभ सर्व शरीरास देण्यास आरोग्येच्छूंनीं विसरूं नये. कापसाचे वेंचे सुरूं झाले आहेत पण भाव ३० रु० खंडीवर नाहीं. ज्वारी हुर्ड्यावर आलेली आहे. तेव्हां दुखणेकऱ्यांनीं या नवीन जीव ओतणाऱ्या धान्याचा यथेच्छ उपभोग घ्यावा. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. क्वचित् ऋतु पालटल्यामुळें हिवताप सुरूं आहेत.

**आपला रुपयाः—** मुंबईचे प्रिंसिपाल दामोदर गणेश पाध्ये, एम. ए. यांनीं "आपला रुपया" या अर्थ शास्त्राच्या विषयावर गेल्या शुक्रवारीं एक चांगलें व्याख्यान येथील नेटिव्ह लायब्ररींत दिलें. प्रिंसिपॉल पाध्ये हे स्वतः या विषयांत तज्ज्ञ आहेत आणि यांस सार्वजनिक व्याख्यानें देण्याची लहानपणापासून हौस व आवड आहे. शिवाय विद्यार्थ्यांस शिकविण्याचा यांचा मुख्य व्यासंग असल्यामुळें यांनीं हा सोन्यारुप्याचा कठिण विषयहि बालबोध करण्याचा प्रयत्न केला आणि त्याबद्दल येथील मंडळी व्याख्यात्याची फार ऋणी आहे. सोन्याच्या मोहरा हिंदुस्थानच्या टाकसाळींत पाडल्या गेल्या पाहिजेत इत्यादि पुष्कळशा बिकट बाबींचा त्यांनीं उहापोह केला तरी तेथें जमलेल्या चांगल्या सुश्रुत श्रोत्यांस ही विशेष खुलाशवार तपशील देतां आला नाहीं.

**श्रीगणपति महायज्ञः–** श्री० वे० शा० रा० रा० गणपतिबुवा इस्लामपूरकर यांच्या हल्लीं चालू असलेल्या श्रीगणपति महायज्ञाचा महोत्सव चालू असून त्यांत रा० रा० महाजनि वकील व चिपळूणकर वकील यांची व्याख्यानें व कथाकीर्तनें तसेंच महाभागवताचा व नामसप्ताह होणार असल्यानें आकोलेकरांना येणारा आठवडा मोठा गडबडीचा जाणार आहे.

**युद्धफंडासाठीं नाटक** — आमच्या आकोल्यांतील सुशिक्षित, वकील, व्यापारी, शिक्षक व आचारी इत्यादि मंडळींनीं "तारा मंडळ" नाटकाचा प्रयोग गेल्या शुक्रवारीं केला तो पहाण्यास गेलेल्या आमच्या एका रसिक मित्रानें ह्मटलें आहे कीं उपाध्ये बुवाचें काम उत्तम वठलें. इतबारराव दुर्जनसिंग यांचीं कामें बरीं झालीं. इतर कामेंकरी कांहीं कामें साधारण व कांहीं अगदींच निरस झालीं तथापि मंडळीच्या उद्योगाला बहुमान देऊन त्यांचा गौरव करण्यासारखा आहे प्रस्तुतच्या कालीं प्रत्यक्ष लढण्याचा योग येईपर्यंत ही नाटकाची लढाई लोकांना दाखवून लढाई विषयीं आक्रमण जागृत करण्याचा व राजनिष्ठेला अधिक जोर आणण्याचा हा प्रयत्न अत्यन्त श्लाघ्य होय. व त्याकरितां आह्मी या प्रयोगातील गुणदोष दाखविणें पुढील अंकावर सोपवून आज आमच्या या हौशी व शोकी विद्वान मंडळींची आह्मी विशेष तारीफ करतों.

**चोरट्या गाईह्मशी**–पुष्कळशा गवळ्यांचा धंदा हाच कीं लोकांचीं उभीं पिकें आपल्या खंडोगणती गाईह्मशी कडून चारवावीं. आणि वेळ पडल्यास शेताच्या रखवाल्यासही एकजुटीनें मरणःप्राय चोप द्यावा. या लोकांच्या साठीं पोलिसांनीं विशेष तजवीज केली पाहिजे आणि त्यांनीं सायंकाळनंतर जनावरें खुंट्यावरून सोडतां कामा नये अशाविषयीं कांहीं तजवीज होईल तर बरें. या चोरट्या गाई ह्मशींचा अवलक्षणें एकदां शेतात सोडल्यावर यथेच्छ पोटें फुगल्यावर तीं कशी परत येतात हें पहाताच लक्षांत येईल.

एम्डन क्रूझरनें पुनरपि पाच जहाजें हिंदुस्थानचे महासागरांत बुडविल्याचें नवीन वर्तमान आलें आहे. एम्डन सारखीं जर्मनांचीं ९ जहाजें समुद्रांत फिरत असून व्यापारी बोटी बुडवीत आहेत. सदर्हू जहाजांचा पाठलाग करून त्यांचा नाश करण्याकरितां एकंदर ७० जहाजें इंग्लंड व फ्रान्स यांनीं सोडलीं आहेत.

चालू युद्धात तुर्कस्थानचे मुसलमान यांनीं तटस्थ रहावें अशा बद्दल नेलोर 'मद्रास' येथील महॉमेडन एज्युकेशनल असोसियेशननें ठराव करून तो मुंबईतील टर्किश कॉन्सल जनरल यांनमार्फत पाठविण्यांत आला आहे.

पुणें येथें कांहीं अराजक मंडळी पकडली असून त्यांचे झडतींत बांब कसे तयार करावयाचे ज्यावर विक्रिक असिदचे पं. यूंके किहिले अशा चोपड्या मदनलाल धिंग्रा चाफेकर "रँड साहेबाचा खुन करणारा" व इतर अराजक मंडळींचे फोटो व टाइपचे खिळे असे सामान पोलिसास सांपडले असल्याचें कळतें.

## पत्र व्यवहार

### आठवें महाराष्ट्र--साहित्यसंमेलन.

**महाराष्ट्र भाषेच्या सर्व अभिमान्यांस व भक्तांस विनंती.**

१९१२ अखेर अकोल्यास भरलेल्या साहित्यसंमेलनांत परिषदेचें पुढील संमेलन मुंबईस भरण्याचें ठरलें होतें आणि यंदां आक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात तें येथें भरवावें अशी परिषदेच्या कार्यकारी मंडळीच्या मुंबईतील सभासदांची उत्कट इच्छाही होती. परंतु अनेक कारणांनीं तसें करणें अशक्य दिसून आलें; तथापि मुंबईतील व बाहेरील कार्यकारी मंडळीच्या सभासदांच्या संमतीनें संमेलनाची बैठक केव्हां भरावयाची हें नक्की ठरून त्यासंबंधीं पूर्व तयारी आतां झाली आहे हें जाहिर करण्यास आम्हांस आनंद वाटतो. कार्यकारी मंडळीची सभा ता. १३ सप्टेंबर रोजीं खालील गोष्टींचा विचार करण्यासाठीं बोलाविली होती:-(१) संमेलनाची वेळ नक्की करणें; [२] स्वागत-कमिटीची स्थापना आणि इतर व्यवस्थेची योजना करणें; [३] संमेलनाचे अध्यक्ष कोणास निवडावें तें ठरविणें. आणि संमेलनात चर्चेसाठीं आणिनिबंधलेखनासाठीं कोणते विषय घ्यावयाचे हें निश्चित करणें,--इत्यादि. परंतु याच दिवशीं युरोपांतील भयंकर लढाईसंबंधीं लोकमत प्रदर्शित करण्यासाठीं मुंबईत महाराष्ट्रीय हिंदूंची मोठी जाहीर सभा भरण्याचें मागाहून ठरल्यामुळें, वरील सभा २० सप्टेंबर रोजीं डॉ० **सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर** यांच्या घरीं भरली. ज्या सभासदास या सभेस हजर राहतां आलें नाहीं त्यांनीं वरील बाबींसंबंधानें आपलें मत लिहून कळविलें होतें. या एकंदर मताचा विचार होऊन व त्यास अनुसरूनच एकमतानें सभेंत ज्या गोष्टी ठरल्या त्या येणेंप्रमाणें ---

१. परिषदेचें आठवें संमेलन मुंबईत येत्या ईस्टरच्या सुट्टीत--एप्रील १९१५ मध्यें--भरवावें.

२. संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं ज्यांस विनंती करावयाची त्यांचीं नावें ठरविण्यांत आलीं.

३ स्वागत कमिटीचे सभासद होण्याविषयीं विनंती करण्याचें व तिची घटना निश्चित करण्याचें काम एका पोट-कमिटीकडे सोंपविण्यांत येऊन, स्वागत कमिटीचे सभासदांनीं आपला अध्यक्ष, उपाध्यक्ष, आणि परिषदेचे चिटणीस व खजिनदार यांचे साह्यार्थ मदतगार-चिटणीस आणि मदतगार-खाजीनदार नेमावे.

४. स्वागतकमिटींत सामील होऊन संमेलनाविषयीं सहकारित्व करण्यासाठीं 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'च्या व्यवस्थापक मंडळास विनंती करावी.

५. संमेलनापुढें कोणते ठराव आणावयाचे ते भावी विषयनियामक कमिटीच्या विचारासाठीं सुचावण्यांत आले.

६. संमेलनात चर्चेसाठीं आणि निबंधलेखनासाठीं पुढील विषय असावे:—

(१) गेल्या २५ वर्षांतील कादंबऱ्या—त्यांचे गुणदोष व त्यांच्या प्रगतीचे उपाय:—

(अ) साध्या, ऐतिहासिक, व सामाजिक कादंबऱ्या.

(ब) स्वकपोलकल्पित, भाषांतररूप अथवा रूपांतरस्वरूपी कादंबऱ्या.

२. सदरप्रमाणेंच नाटकांसंबंधानें.

३. तसेंच अलीकडील मासिकांत, ग्रंथमालांत वगैरे येणाऱ्या लहान मोठ्या गोष्टी, कादंबऱ्या वगैरेंसंबंधानें.

४. आधुनिक आणि जुनी व सयमक आणि निर्यमक कविता.

५. सध्यांचीं मासिक पुस्तकें, व त्यांचें स्वरूप, व सुधारणेच्या दिशा.

६. अलीकडील गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें वगैरे ग्रंथांत शृंगार अथवा इतर कोणत्याही रसाचा अश्लाघ्य अतिरेक होऊन लोकाभिरुचि **बिघडत आहे काय?**

७. गेल्या पांच वर्षांतील वाङ्मयाचें परीक्षण, समवायानें अथवा पृथकशः

८. **सांप्रतचे** मराठी वाङमयाचा समाजावर घडणारा परिणाम: सर्वांगीं प्रगति होण्यास कोणत्या तऱ्हेच्या नव्या वाङमयाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे?

९. **ग्रंथकार**, ग्रंथप्रकाशक व ग्रंथ विकणार यांचेमध्यें, आणि वर्तमानपत्रें व मासिकें याचे संपादक यांचेमध्यें, अधिक निकट संबंध व परस्पर सहकारित्व कसें साधावें!

१०. नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्याचे मार्ग.

याप्रमाणें ठराव होऊन **संमेलनाच्या व्यवस्थे**संबंधीं इतर काहीं गोष्टी या सभेंत नक्की **करण्यांत आल्या. आतां** मुंबईच्या आणि मुंबई **बाहेरील महाराष्ट्र**—साहित्याच्या भक्तांनीं कंबर **बांधून हें संमेलनाचें** कार्य यशस्वी रीतीनें पार **पाडलें पाहिजे. सरस्वतीदेवीच्या या सेवेचे** कामीं **एक जुटीनें** लागण्यास सर्व महाराष्ट्रबंधु उत्साहानें तयार होतील यांत संदेह नकोच.

**विशेष विनंती** —शेवटीं कार्यकारी मंडळीची सर्व प्रसिद्ध, विचारी आणि उत्साही **लेखकांस अशी** अगत्यपूर्वक विनंती आहे कीं **वर निर्दिष्ट केलेल्या** विषयांपैकीं कोणत्याही आवडत्या विषयावर लेख लिहून तो येत्या फेब्रुआरी महिन्याचे अखेर परिषदेचे चिटणीस यान कडे खालीं दिलेल्या पत्त्यावर पाठवावा. परिषदेंत जितके लेख वाचतां येतील तितके वाचले जातील. पण सर्व लेख वाचणें अशक्य झाल्यास प्रत्येकाचा सारांश तरी वाचला जावा अशी कार्यकारी मंडळाची इच्छा आहे. ह्मणून प्रत्येक लेखाचे शेवटीं सारांश द्यावा अशी लेखकांस विनंती आहे. लेख लिहून धाडूं इच्छिणारांनीं चिटणीस यांस होतां होईल तितकें आगाऊ कळवावें अशी विनंती आहे.

परिषदेंत वाचण्यासाठीं, येणारे लेख अर्थातच छापून प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

| | |
|---|---|
| ८१, फणसवाडी, काळबादेवी पो. मुंबई, ता० १ आक्टोबर १९१४ इ. | रा. र. मोरमकर<br>वा. गो. आपटे<br>चिटणीस. |

---

## पत्रव्यवहार

रा• रा० वऱ्हाडसमाचार कर्ते,

यांस

सा० न० वि० वि० तारीख २६ माहे आक्टोबर सन १९१४ इ० चे आपले वृत्तपत्रात राव बहादूर महाजनि यांनीं देशमुख लायब्ररींत दिलेल्या व्याख्यानावर टीकात्मक अग्रलेख छापला आहे. त्यावरून वाचकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे. तो दूर व्हावा ह्मणून खालीं लिहिलेला मजकूर आपले पत्राच्या येत्या अंकीं प्रसिद्ध होण्यासाठीं पाठवीत आहे; त्याचा अव्हेर आपण करणार नाहीं अशी पूर्ण आशा आहे.

रावबहादूर महाजनि यांनीं सांगितलेल्या कथानकांत आपण दाखविलेले दोष:—

१ वसिष्ठ विश्वामित्रास केवळ नंदिनी गाय घेऊन जा असें ह्मणाला नाहीं, तर "कोण ज्ञाता राज्यस्वीकार करील आधिज्याम्रजां"

२ कामधेनूनें आपल्या अंगांतून निर्माण केलेल्या सैन्यानें "बळ उडविलें तिहीं खगपातिपक्षांहीं जसें सहज मशक"

३ म्लेंच्छ यवनासारख्या क्रूर जातीस आर्यांवर घालताना केवळ अहिंसेचा उद्देश असेल असें वाटत नाहीं.

(१) नंदिनी गाय घेऊन जा, असें वसिष्ठानें विश्वामित्रास मुळींच ह्मटलें नाहीं, हें तिच्या मोबदल्यांत अर्बुद गायी अथवा मी आपलें सर्व राज्य देतों, असें विश्वामित्र ह्मणाला असतां, वसिष्ठानें "राज्य त्यजिकारून मन नेहमीं काळजींत ठेवणें हें कोण शाहाणा पुरुष पत करील" असें जें विश्वामित्रास उत्तर दिलें, या एका गोष्टीवरूनच सिद्ध होत नाहीं काय! पुढें ती गाय हंबरडा फोडून वसिष्ठाचे तोंडाकडे पाहूं लागली तेव्हां आपलें ब्रह्मतेज व नंदिनीचे अंगातील सामर्थ्य जाणून त्यानें तिला एवढेंच ह्मटलें—"शक्ति असेल तरि रहा. ऐसें मुनिबोलतांच ती क्षोभे" यावरून वसिष्ठानें नंदिनी गाय घेऊन जा असें विश्वामित्रास ह्मटलें, असा अर्थ निघतो काय?

२ नंदिनीनें आपल्या अंगापासून उत्पन्न केलेल्या म्लेच्छादिक सैन्यानें "बळ उडविलें तिहीं खग—पतिपक्षांहीं जसे सहज मशक" हा आयार्ध घेऊन "तीं बारा कोस पळविलीं कटकें" असा त्या मागील आर्येचा मुद्याचा चरण याकडे आपण दृष्टि न दिल्यामुळें अर्थ विपर्यास करून विश्वामित्राचें कांहीं तरी सैन्य ठार मारलें असेल, असें अनुमान बांधिलें.

(३) म्लेंच्छ यवनासारखें क्रूर सैन्य, जें नंदिनीच्या देहापासून उत्पन्न झालें, तें विश्वामित्राच्या सैन्यावर घालून एकही सैनिकाचा वध न करतां वसिष्ट ऋषींनें ब्राह्मणाचे अंगीं असलेले स्वाभाविक अद्भुत गुण ह्मणजे क्षमा, दया व तपोबल हे विश्वामित्राच्या निदर्शनास आणून दिले, याबद्दल वाचकांची खात्री करून देण्याकरितां महाभारतांतील आदिपर्व, अध्याय १७५, श्लोक २९,४२ व ४५ हे खालीं देत आहे:—

। क्षत्रियाणां बलं तेजो ब्राह्मणानां क्षमा बलं ॥
। क्षमा मां भजते यस्माद् गम्यतां यदि रोचते २९
। नच प्राणैर्वियुज्यन्ते केचित्तत्रास्य सैनिकाः ॥
। विश्वामित्रस्य संक्रुद्धैर्वासिष्ठै र्भरतर्षभ ॥४२॥
। धिग्बलं क्षत्रिय बल ब्रह्मतेजो बलं बलं ।४५।

वेदव्यासप्रणीत वरील श्लोकांच्या आधारावरूनच रावबहादूर महाजनि यांनीं आपले व्याख्यानांत निर्धास्त विधानें केलीं. त्यांना हा कथाभाग समजला नाहीं, किंवा समजून त्यांनीं आपलें व्याख्यान मनो[...] होण्यासाठीं आपल्या पदरचीं कांहीं विध[...] केलीं असा प्रकार बिलकुल नाहीं हें [...] वाचकांस पूर्णपणें कळून येईल.

विश्वामित्राच्या सैनिकांपैकीं एकाचा देखी[ल] प्राणघात होऊं दिला नाहीं, ही वसिष्ठाच[ी] आंगची दया आपणास उपहासास्पद व [...] हल्लीं चालूं असलेल्या संग्रामाशीं वरी[ल] प्राचीन संग्रामाची तुलना आपण केली [...] बद्दल वाईट वाटतें. व्यासांनीं सांगितले[ल्या] कथेचें व मोरोपंताच्या आर्यांचे रह[स्य] ध्यानांत आलें नाहीं, असें वाटतें.

| | |
|---|---|
| आकोला ता. २८।१०।१४ | आपला हितेच्[छु]<br>श्रीधर रामच[ंद्र]<br>पिंपळखे[डे] |

टीप:--श्लोक ४२ याचा अर्थ सर्व वाच[कां]च्या सोई करिता देत आहे. हे परी[...]क्षित राजा, वसिष्ठाच्या क्रुद्ध झालेल्या शू[र] शिपायांनीं विश्वामित्राचा एकहि शिपायी ठा[र] मारला नाहीं.

---

## नोटीस

नोटीस बेसमी भोनाजी वा॥ हिराज[ी] धनगर रा० सांगवीखुर्द ता० जी० आकोल[ा]

यांस:-

खालीं सही करणार रा० सांगवीखु[र्द] ता० जी० आकोला इज कडून

नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझे मध[ल्या] सवतीचे पहिले घरचा मुलगा आहेस तू[ं] अज्ञान असतां माझे सवतीचे मागें य[ा] घरीं आला होतास त्यावेळीं तुझेवय अ[ं]माजे १०।१२ वर्षांचें होतें तुझे लग्न वगैरे माझा नवरा नामे तोलाजी यानें करून तुजला घरातून काढून दिलें तेव्हां पासून तूं विभक्त राहात आहेस. माझा नवरा ना[मे] तोलाजी याचे मरणानंतर माझे इस्टेटीची व्यवस्थाकरण्यास काळजीचें दुसरें कोणी नसल्यावरून मी तुजला माझे जवळ अजमास दोन वर्षे ठेविलें दरम्यानमध्यें तुझी दुधबहीण ह्मणजे माझे मधत्रे सवतीची या घरची मुलगी नामे रायजी व माझे नव[ऱ्या]च्याचे लग्नाचे बायकोचे मुलीचा मुलगा नामे धनु यांचें व तुझे असें त्रीवर्गाचे नांवचे मृत्युपत्र करून ठेविले होतें. माझे जिवंत पणींच माझेइस्टेटीचा तुझा अफरातफर करण्याच[ा] मानस कळल्यावरून व माझे मरणानंत[र] माझ्यामुलीस व नातवास या इस्टेटीपैकीं का[ं]हींच देणार नाहींस अशी माझी खात्[री] झाल्यावरून जे त्रीवर्गाचे नांवचेंमृत्युपत्र करू[न] ठेविले होते तें रद्द करून तुझेनांव मृत्युपत्रांतू[न] कमीकरून उभयतां ह्मणजे रायजी व ध[नु] यांचे नांवचे दुसरें मृत्युपत्र करून ठेविले आ[हे] वास्तविक या इस्टेटीसी तुझा कांहींच संब[ंध] नव्हता व आतां मृत्युपत्रावरून होतां तो रद्द झाला आहे. यापुढें तुझा माझे इस्टेटी[शी] संबंध राहिला नाहीं. यापुढें माझे स्थाव[र] इस्टटीचे संबंधांत तू हातघातल्यास तु[झी] योग्य व्यवस्था करण्यात येईल. सालमजकु[र]ची पीकें मी लोकांना विकली आहेत व [...] पुढेंही पांच वर्षे माझी स्थावरशेतें त्यानां वाहतीस दिली आहे. त्यांना आडविण्याच[ा] आतां तुजला मुळींच अधीकार राहिला नाह[ीं] व तूं आडवूं नयें करितां आगाऊ नोटीसी कळविलं आहे कळावें ता० १२।१०।१४ [...] द० लक्ष्मण निकाजी पी० रा० आको[ला] सही बायजाई मर्द तोलाजी धनगर र[ा०] सांगवी खुर्द नी॥ बांग[...]

नो० नं० ४३३

सतत १० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक--** डा. गौतमराव केशव, आणि सन्त
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबइ. नंबर २.

नो० नं० १११

---

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ४१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,
खलासीचकला, मुंबई.

नो. नं०३३७

---

मांगालिक प्रसंगीं बक्षीम देण्याकरिता

सेंटचा राजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतक सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं. रु. -॥- -॥।- व रु. २ ट. ख. वगळा. सुवासिक कार्डें दिलचमनचीं दर डझनास रु. -॥।- "

सोल एजन्टस. एच. आर. मादा आणि कं
नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमार, मुंबई.

---

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनाविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९

---

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| | 31 | 1,41,32356 |
| 1903 | | 2,1),95,947 |
| 1908 | | 3,2?,79,991 |
| 1913 | | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policynolders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insuraace—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

***M. deSOUZA,***
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NagPUr

N. No. 13

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला—सोमवार तारीख ९ माहे नोव्हेंबर सन १९१४ इ० [ अंक ४३


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं ४

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१⅜ तोळे असतें.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } J. G. Ridland. एजंट

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. २९

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ॥८ व्हीपीनें ॥१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १॥६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ६

## अनुभवून पसंत ठरलेलीं

केशनाशकचूर्ण कि० ४ आणे, दंतमंजन कापूर, ओवा, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाल हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ९

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

## स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपाति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल तो केवळ दोन रुपयमध्ये लाभ मिळतो या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामूली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे

पत्ताः- सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना,

नो. न. ३९६

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थांनातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ॥४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ॥४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-

The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay.

No. No.421

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना

## ए. जे. क्षात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! एकच भाव!

ओठो सुरंगी आमचेकडे मिळणारा माल ओठो सुरंगी

अत्तरें.- गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई, चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा. केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६रु.

तेलें.- चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, मुगंवराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरानिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उदणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट.

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, घंट्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ४१२

## नोटीस

रा. रा. गंगाराम मिठेद कलूसिंग जात रजपूत राहणार शहर आकोला काळ्या मारुती जवळ यांस,

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं दोन वर्षांमागें आमचा आप्त पिराजी वल्द संतराम यास कर्जाकरितां रु० १०० शंभर आम्ही दोघे भाऊ जामीन राहून तुमच्याकडून काढून दिले होते. पुढें ऋणकोनें अनमासे रु० ६० फेडले. बाकी राहिलेल्या रकमेची तुम्ही त्याजकडून नवीन प्रॉमिसरी नोट लिहून घेतली आहे. या प्रॉमिसरी नोटीला आमच्या पैकीं वडील बंधु सजन गोविंदा जामीन झाले आहेत. इतकें झालें तरी तुम्ही पूर्वीचा रु० १०० शंभर चा दस्तऐवज फाडून आम्हांस परत दिला नाहीं. आणि उलटें पिराजीला आपल्याकडे कर्ज देण्याच्या आमिषानें आपल्याकडे वळवून घेतलें आहे या वरून तुमच्या मनांत जामीनां कडून कांहीं उपटावें असें दिसतें. तरी आतां पूर्वीच्या दस्तऐवजाशीं आमचा कांहीं एक संबंध राहिला नसल्यामुळें आमचा दस्तऐवज फाडून आम्हांस ही नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत परत करावा. तसें न केल्यास तुमच्यावर आम्हांस कायदेशीर इलाज करावे लागतील. कळावें.

तारीख ३१।१०।१४

सही
महादु वा। गोविंदा द० खुद

नो० नं० ४३३

## WANTED.

For the post of a temporary teacher on Rs. 25. per month to teach the English 1st. standard in the Municipal Middle Anglo-Vernacular School Malkapur.
None need apply who has not passed the Matriculation Examination with Sanscrit as his second language.
Preference will be given to one who has got some experience of the work
Applications with copies of testimonials should reach the undersigned on or before the 15 th October 1914.

Md. M. A. Khan
Malkapur
24 September 1914 } Vice chairman M. committee
Malkapur
( Berar )

No. No. 415


## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझें मालकीचें घर आगरवेशीवर पू० सडक प० मल्ली द० वेजीरखांचें घर उ० खुली जागा हि माझेच ताब्यांत आहे. हें कोणी गहाण खेरदी बक्षीस घेऊं नये. व देणारांनीही देऊं नये. तसें केल्यास त्या बद्दल जबाबदारी याइस्टेटीवर नाहीं क० ता० ३१११९१४

सही
सैयदखोदीन बा सैयदजान रा० खुर.
नो० नं० ४३३

## नोटीस

दाऱ्या वल्लद व्हान्या महार राहणार शिरसगांव तालुका खामगांव जिल्हा बुलढाणा.

यांस:

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हीं माझी कन्या शेवंती इजबरोबर १९११ च्या एप्रिल मध्यें गंधर्व काविला आणि त्या वेळीं करारनामा लिहून दिला कीं जर तुम्हीं लग्नाच्या टाकलेल्या पहिल्या बायकोला पुनः वागविण्यास आणाल तर माझ्या मुलीवरील गहाण्यासुद्धां लग्नाचा नवरेपणाचा हक्क सोडून देण्याचें वचन दिलें. वरील करार अर्धें एक वर्षपर्यंत तुम्ही वागला पण नंतर पहिल्या बायकोला जातीचा बाट लागला असूनही पुनः घरांत आणिली आणि दागदागीनें घरीं काढून ठेवून आपला नवरेपणाचा हक्क सोडून तिला माझ्या घरीं आणून घातलें. आज दोन वर्षे झालीं आणि तिचा दुसरा घरठाव करून द्यावयाचा आहे तर जनरिती प्रमाणें आणि करारा प्रमाणें तिला सोडचिठ्ठी फारकत देऊन टाकावी. एक महिन्याची वाट पाहून नंतर कायदेशीर योग्य ती तजवीज करावी लागेल आणि या नोटिशीचा खर्च तुमच्या अंगावर पडेल. कळावें. ता. ३।११।१९१४ ई.

सही
चंदु वा मुन्या महार रहणार चाननी ता. बाळापूर निशाणी
नो. नं. ४३४

## नोटीस.

राजाराम नरसू कुणबी रहाणार नकाशी, तालुके बाळापूर,

यास:—

खालीं सही करणार बापु पुनाजी पा० रहाणार नकाशी, ता० बाळापूर, याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं माझी मुलगी नामे सुभद्रा इच्याशीं तुमचें लग्न होऊन सरासरी दहा वर्षें झालीं. तेवढ्या अवकाशांत तिची तुमच्या घरीं ने आण मुळींच केली नाहीं. तिचें तुमचें पटेना ह्मणून दीड पावणे दोन वर्षापूर्वी पंचामार्फत तुह्मी रु० ३१० [ अक्षरीं तिनशें दहा ] घेऊन आमच्या मुलीस फारकत लिहून देण्याचें ठरलें होतें. मध्यंतरीं कांहीं फौजदारी मुकदमा वगैरे होऊन हें काम तसेंच राहिलें. पुन्हा पुष्कळदां तुह्मांस फारकत लिहून देण्याविषयीं सांगितलें पण तुह्मी फारकत लिहून ही देत नाहीं आणि मुलीला वागवीत नाहीं. मी मुलीचा बाप आहे आणि ती आतां वयांत आली आहे. तेव्हां मला तिची कांहीं तरी व्यवस्था लाविली पाहिजे. तरी तिच्या आजपर्यंतच्या खावटीबद्दल रु० १२० अक्षरीं एकशें वीस खर्च आला आहे तो आह्मांस देऊन तुमचे ठरावाप्रमाणें रकम रु० ३१० "तिनशें दहा" घेऊन फारकत लिहून द्यावी. रकम आमचे जवळ तयार आहे. तरी ही नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत तुमची रकम घेऊन जाण्याची तजवीज करावी आणि फारकत लिहून द्यावी. तसें न केल्यास तुमच्यावर दिवाणी मुकदमा करून तिच्या अन्न वस्त्राबद्दल दाद मागावी लागेल व या नोटिशीचा खर्च व दिवाणीच्या फिर्यादीचा वगैरे सर्व खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. ता० ४ माहे नोव्हेंबर सन १९१४

सही
बापु पुनाजी पाटील रहाणार नकाशी. तालुके बाळापूर याच्या सहीची निशानी
नो० नं० ४२९

## नोटीस

नोटीस बेशमी मारुती वल्लद गोपाळा मराठे कुं० रा० भवरद ता० आकोला जि० आकोला. यांस:—

आह्मी खालीं सह्या करणारे यांचे कडून नोटीस देण्यांत येते कीं ता० २७-१०-१९१४ ई० रोजीं तुह्मी आमचे जवळ नानाप्रकारच्या गोष्टी सांगुन व उलट पालट आमची समज करून धोका देऊन वाटणीपत्र व दत्तकपत्र आह्मा त्रीवगीपासून करून घेतलें आहे हें बरोबर नाहीं व हे दोन्ही लेख आह्मास कबूल नाहींत ते पोकळ दस्तऐवज आहे असें समजावें कारण तूं गैर वर्तनानें वागत आहेस. सबब कोणत्याच तऱ्हेचा तुझा हक्क चालत नाहीं. यापुर्वी आमचा नवरा मैयत नामे आपा वल्लद सावळाराम यानें त्याचे जिवंतपणीं तूं पुतण्या आहे ह्मणून तुझें लग्न वगैरे करून दिलें व जे कांहीं तुला द्यावयाचे होते तें तुला देऊन निकाल केला आहे. आतां आमचां शेतीवाडी घरदार व इस्टेटीवर कोणत्याच तऱ्हेचा तुझा हक्क नाहीं. ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत आमचें घर खालीं करून द्यावे व दुसरीकडे जाऊन राहावे. मुदतीचे आंत घर खालीं न केल्यास आह्मी रीतिप्रमाणें तुजवर फौजदारींत अगर दिवाणींत तजविज केली जाईल.

टीप.

व तुझे जवळ असलेले पुर्जे व इतर कागदपत्र वगैरे व घरवळ वरील मुदतीचे आंत आणून द्यावे व पावती घेऊन जावी ही नोटीस लिहून दिली कळावें ता. ३-११.१४

सही.
विठाई मर्द आपा मराठे दस्तुर खुद.
गंगु मर्द आपा हा. आंगठा खु.
रंगु मर्द आपा हा. आंगठा खु.
नो० नं० ४३६

## नोटीस

नोटीस बेशर्मा कोगी मर्द सरावण जात धनगर राहणार कजवे येवद ता० दर्यापूर जि० उमरावती इजला

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तं आह्मांस ता० २९।१०।१९१४ चे भारत वर्तमान पत्रांतील नोटीस दिली ती पावली त्यांतील मजकूर सर्व खोटा आहे. तुझा बाप उकर्डा हा नोटीस देणार नंबर १ चा सासरा व नं० २ चा बाप आहे तो निराळा राहत असे त्यानें पुरुषोत्तम गंगाराम पटवारी व मनुपांडे वा॥ गंगाप्रसाद या लोकांची शेतें वहितीस केली होती. सदहूचा उकर्डा हा सरासरी २॥ महिने झाले मरण पावला. त्याचे स्थावर जंगम इस्टेटीचे आपण दोघी बहिणी वारस आहोंत. परंतु तुझें सांगणें बरोबर नाहीं ह्मणून उकर्डा यानें मालकीनें केलेली शेतीतील वारस या नात्यानें असलेला माझा हिसा मी सोडला व सदहू शेती संबंधी नफ्या नुकसानीची व मालकीची जबाबदारी तूं घतल्यावरून आह्मीं तुजपासून पावती करून घेतली आहे. याशिवाय दुसरा कोणताही प्रकारचा लेख झालेला नाहीं. ज्यावेळीं उकर्डा हा मांदा झाला त्यावेळीं तं व नोटीस देणार हा त्याची सुश्रशा करण्यास त्याजपाशीं होत्या. ज्यावेळीं त्याची प्रकृती फार बिघडली त्यावेळीं उकर्डा यानें गांवातील संभावित मनुष्य बोलावून आणून त्याचे समक्ष असें सांगितलें कीं नगदी असलेले रुपये ६०० व माझे मालकीची जमीन सहा एकर व एक म्हैस व घर ही इस्टेट व चिल्हर भांडीं वगैरे आहेत ही मिळकत उभयता तुह्मीं माझ्या मुलींनी सारखे रितीनें वाटून घेऊन तिचा जिवमानपर्यंत उपभोग घ्यावा व कोगी ह्मणजे तूं निपुत्रीक आहे हीची इस्टेट ती मेल्यावर मालन नोटीस देणार इजला मिळावी. व मालकीची शेती ही निमेनिमेच वाहून घ्यावी अशा प्रकारें सांगून उकर्डा ( अमचा बाप ) याचा अंतकाळ झाला त्याचे क्रियाकर्मास मी लोकांचें कर्जकाढून खर्च केला क्रियेचें काम आटपल्यावर मी ज्यालोकासमक्ष माझे बापानें रुपयां बद्दल सांगितलें होतें त्याना बोलावून आणून रुपये वाटून घेण्यास तुला ह्मटलें असतां तूं रुपये नेले असे सांगितलें व त्याच दिवशीं म्हैसही सोडून तूं आपले घरी नेली मी उकर्डा याचे नात्यानें असलेले शेतीचा कबजा घेतला आहे व त्यातील पीकही मी निराळेंच लक्ष्मण रोडाजी याचे घरीं ठेवणार आहे सदहू घरांतील नेलेले रुपये ६०० पैकीं रुपये ३०० मजला आणून द्यावे व त्याच प्रमाणें ह्मशीची किंमत ठरवून निमे किंमती बद्दल रुपये मला द्यावे असें जर तूं केले नाहींतर मी शेतांतील हिस्सा तुला मुळींच देणार नाहीं कारण ज्या अर्थी तूं रुपये ६०० व एक ह्मैस घेतली त्या पैकीं तुला उकर्डाचे मिळकती पैकीं निमे हिसा मिळाला आहे वरून तुला नोटिसीनें कळविलें जातें कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तूं जवळ असलेले माझे हिशाचे रुपये ३०० व ह्मशी पैकीं निमे रुपये देऊन ते तुं उकर्डा याचे शेतीपकीं निमे हिसा कोठें गहाण अगर खरेदी पट्ट्यानें देणार नाहीं याशिवाय वर जीवमान पर्यंत खाण्यास द्यावा हें मला कबूल नसल्यास तुझा हिसा तुला पावला असें समजून मी शेताची एकटी मालकीन होइल मग तुझा वरील शेतावर कांहींच हक्क राहणार नाहीं. तें आपले नोटिसींत मला कांहीं तरी लिहिलें पावेल ते मी मानणार नाहीं. तुझे नोटिसींतील मजकूर खोटा आहे. ता. ४।११।१९१४ ई.

सही
नि. गंगाराम बा॥ सीवाजी धनगर रा. यवद आंगठाखु नि. मालिन मर्द गंगाराम धनगर रहेणार यवदआंगठाखु
नो. नं. ४३७

## जाहिर नोटीस.

चौं. राहेमान अलिशा वा एकीनअलीशा फकीर जात मुसलमान राहणार माना हल्लीमुक्काम बेलखेड ता. मुर्तिजापुर जि. आकोला पोष्ट माना यांस खालीं सही करणार इजकडून या जाहिरनोटिसीनें कळविण्यांत येते कीं मी तुह्मांस तारीख २।६।१९१४ इसवी रोजीं माझे स्वतः मालकीच्या स्थावर मालकी शेतें इनाम स.नं. २६ यांतील पोटहिसा नं. १ आणि स.नं. २८ यांतील पोट हिसा नं. १ इनाम मौजे माना येथील आणि कसबे माना ता. मुर्तिजापुर येथील स्थावर माल घर अशी बक्षीस देऊन बक्षीसपत्र तारीख २।६।१९१४ रोजीं नोंदुन दिलें होतें आणि त्या बक्षीसपत्राचे मोबादल्यांत तूं मजला करारनामा तारीख २।६।१९१४ रोजीं लिहून नोंदुन दिला. त्याकरारनाम्यात ज्या ज्या शर्ती तूं मजला लिहुनदिल्या त्याशर्ती प्रमाणें तूं करारनामा लिहून दिल्या त्या तारखेपासून वागलास नाहीं उलट मजला बुडविण्याची सर्व कारवाई करीत आहेस. करारनाम्यात तं स्पष्ट लिहून दिलें आहेस कीं मी करारनाम्यात लिहील्या शर्ती प्रमाणें न वागल्यास बक्षीसपत्र रद्द आहे तर त्याशर्तीच्या आधारें मी तुजला लिहून दिलेले बक्षीस आणि तूं मजला लिहून दिलेला करारनामा असे दोन्ही कागद पत्र आज तारखेस रद्द केले आहे. स्थावर माल माझे कबज्यांत आहे या साठीं त्याचा दावा तजला मागण्याची जरुर नाहीं हिनोटिस दिली सही तारीख ३।११।१९१४

सही.
आशाबी मर्द करीमशा इचे खुद हातची निशाणी असे मुकाम आकोला.
नो. नं. ४३८

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ७ शके १८३६

## लक्ष्मी आणि सरस्वती.

जगात त्रिकालाबाधित सत्यें ह्मणून जीं कांहीं सत्यें मानण्यांत येतात त्यांत ' विद्वान सर्वत्र पूज्यते ' हें एक सामान्यतः गणिलें जातें, पण सध्या तरी निदान या वाक्याला त्रिकालाबाधितत्वाच्या उच्च पदावासून सुधारलेल्या राष्ट्रांतून सुद्धां च्युत करण्यांत आलेलें आहे असें ह्मटलें असतां अत्युक्तीचा दोष पदरीं येईल अशी भीती वाटण्याचें कारण नाहीं. पूर्वी मनूच्या काळीं आमचा देश सुधारलेल्या राष्ट्रमालिकेत अग्रगण्य होता; आणि मनुसंहितेंत मानस्थानांचा जो क्रम दिला आहे तो येणेप्रमाणें आहे– ' वित्तं बंधुर्वयःकर्म विद्या भवति पंचमी ' ह्मणजे धन, नातें, वय, कर्म, आणि विद्या यांना अनुक्रमें चढता मान दिला पाहिजे असें भगवान् मनूचें ह्मणणें आहे. पुराणादिकांतून जी तत्कालीन हिंदुसमाजाची स्थिति वर्णिलेली आढळते, तिजवरून पाहतां आमच्या देशांत त्याकाळीं मनूचें हें वचन पूर्णपणें पाळलें जात असावें असें दिसतें. पण आज आमच्या देशांत तो प्रकार सार्वत्रिक आहे काय? आज तर जिकडे तिकडे लक्ष्मीपुत्रांचीच बोलबाला होत असलेली आढळते. विद्येला मान्यपद देण्यांत आलेंच तर तें लक्ष्मीच्या खालीं. मनूनें मानस्थानांचा जो क्रम सांगितला आहे त्यांत लक्ष्मीचा अगदीं शेवटचा नंबर आहे. पण आज तिलाच पहिला नंबर देण्यांत येत असतो. आमच्याच देशांत हा शोचनीय प्रकार आहे असें नाहीं. इंग्लंडांत, अमेरिकेंत, जर्मनींत, सर्वत्र हीच स्थिति आहे. प्रसिद्ध लेखक रस्किन यानें हीच तक्रार केली आहे. तो ह्मणतो कीं सरस्वतीचा उपासनेचा मान मध्ययुगपर्यंत लोकांना कबूल होता, व त्याप्रमाणें लोक वागत होते. पण आतां नव्या युरोपानें मात्र सरस्वतीला पदच्युत करून तिच्याजागीं लक्ष्मीची स्थापना केली आहे. इंग्लिशट्रेट्स (इंग्रजांचें चारित्र्य) या सुप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता ह्मणतो कीं लक्ष्मीचा अग्रमान हें आमच्या युगाचें प्रधान लक्षण झालें आहे. अमेरिकेंतले लोक डॉलरला आपलें दैवत मानतात ह्मणून इंग्रज लोक त्यांना टोमणा मारतात, पण इंग्लंडांत तर दारिद्र्य हा अपमानवाचक शब्द होऊन बसण्याची पाळी आली आहे. युरोपांतल्या राष्ट्रांचीं परस्पर तुलना करून पाहिली तर या अधःपतनांत इंग्लंडदेशच अग्रेसर दिसतो. फ्रान्समध्यें लक्ष्मीला विद्वत्तेच्यावर मान आहे खरा, पण इंग्लंडांतल्या इतका नाहीं युरोपांतल्या राष्ट्रांत अलीकडे ज्या भयंकर सामाजिक क्रांति घडून येत आहेत, त्यांपैकीं पुष्कळांच्या मुळाशीं लक्ष्मीला देण्यांत येणारा हा अतिरिक्त मानच आहे असें आढळून येईल. कार्लाइल सारख्या अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांनें इंग्लंडच्या या अधःपतनाबद्दल आपल्या ग्रंथांतून अनेक स्थळीं तीव्र निषेधपर व शोकपर उद्गार काढले आहेत. कवि वर्ड्स्वर्थ यानें ही तसेंच केलें आहे. आमचे मनु, वासिष्ठ, व्यास प्रभृति ऋषि व समाजशासक आज या भारत वर्षांत पुनःअवतीर्ण होतील तर त्यांना ही या बाबतींत आमचे लोक इंग्रजांचेंच अनुकरण करून अधःपाताला संमुख होत असलेले पाहून अश्रुमोचन केल्यावाचून राहवणार नाहीं. प्रस्तुतचा काळ विद्येचा आहे असें ह्मणण्याचा प्रघात आहे. पण ही विद्या कोणती तर अर्थकरी विद्या लक्ष्मीची दासी होऊन राहणारी विद्या होय. आजकालचें साहित्य पहा. त्यांत लेखकाचें धोरण व त्यांची दृष्टि कोणीकडे असते? द्रव्यार्जन हा मुख्यहेतु, समाजोन्नति हा उद्देश गौण आढळतो. सध्यां भौतिक शास्त्रांना युरोप व अमेरिका खंडांत विशेष मान आहे तो कां? तर ती अर्थकारी विद्या आहे ह्मणून. भौतिक शास्त्रवेत्त्यांचें लक्ष नवीनवीं घातुक शस्त्रास्त्रें आणि चैनबाजीचीं साधनें वाढविण्याकडे जितकें लागून राहिलें आहे तितकें समाजसुख संवर्धनाकडे नाहीं. संभोगलालसा, व अधिकारतृष्णा, या भयंकर रोगांनीं पाश्चात्य समाजाला ग्रासून टाकिलें आहे. नुकतेच लार्ड ब्राइस यांनीं साहित्याची गति व वाढ या विषयावर भाषण करतांना हेंच ह्मटलें होतें कीं सध्याच्या साहित्याचा रोख हे रोग वाढविण्याकडे आहे, तो कमी करून मनाचें औदार्य, उच्च भावनांची प्रेरणा, आणि त्यांचा परिपोष करणें यांनकडे नाहीं, आणि असें असून आह्मी लोक साहित्याची अभिवृद्धि होत आहे असें मोठ्या दिमाखानें सांगत असतों!

आतां कोणी असें विचारतील कीं मनूसारख्या दूरदर्शी किंबहुना त्रिकालदर्शी समाजगुरूनें तरी लक्ष्मीला सन्मान पदवीच्या क्रमांत शेवटलें स्थान देण्यांत तिच्या विषयीं अन्याय केला नाहीं काय? आणि जर तो अन्याय त्यांचे हातून झाला असेल तर त्यांच्या चुकीची दुरस्ती आधुनिक समाजानें केल्याबद्दल तुह्मी त्याच्यावर येवढा गाहजब कां करावा? प्रश्न बरोबर आहे. या प्रश्नाचें उत्तर देणें फारसें कठीण नाहीं. मात्र तें देणारा व समजून घेणारा या दोहोंच्या ठायीं अंतर्भेदक दृष्टि पाहिजे. व्यक्तिविषयक चारित्र्याचा विचार न करतां स्थूलमानानें धनोपार्जनाच्या सामान्य मार्गाचा विचार केला तर या प्रश्नाचें उत्तर कोणालाही देतां येईल. बहुधा धनोपार्जनाचा मार्ग नीचता, कपट, शठता, अन्याय, निष्कारुण्य, व उत्कोच इत्यादि कोणत्याना कोणत्या दोषांनीं कलंकित असतो, व धनाच्या आगमना बरोबर दुर्मद, परोत्कर्षासहिष्णुता, अंधता, इ॰ दोषांचें ही साहचर्य येतें असा अनुभव आहे. दुसऱ्याच्या तोंडांतला घास काढून स्वतःच्या पोटांत कोंबल्या शिवाय धनिकाच्या उदराला विशालत्व बहुधा येत नाहीं. धनोपार्जनेचे मार्ग धर्मपर नसतात, हेंच एक धननिंदेचें मुख्य कारण आहे. अनिंदनीय स्पर्धा ही दूषणीय नाहीं. स्वतःच्या दीर्घ परिश्रमावरच अवलंबून राहून धन प्राप्ति केल्याचीं उदाहरणें केव्हांही व कोठेंही निंद्य ठरत नाहीत. समाजांत प्रामाणिकपणाच्याच सुकाणूनें व्यवहाराचें तारूं हाकारलेलें क्वचित दिसतें. पितृदत्त धनापैकीं वीसलक्ष पौंड ज्यानें धर्मार्थ— परदुःख निवारणार्थ– दिले आहेत अशा महामति रस्किन साहेबांचेच हे उद्गार आहेत कीं स्वतःच्या अकलेवर, प्रामाणिकपणानें, परपीडन न करतां, न्यायमार्गानें पैसा मिळवून जे श्रीमंत होऊन बसले आहेत त्यांपेक्षां शठता, अन्याय, दुर्मार्ग, भ्रष्टता, इ॰ निंद्य गुणांनीं अर्थोपार्जन केल्याचींच उदाहरणें ज्यास्त आहेत व तेच लोक अधिक श्रीमान होतात. लक्ष्मी स्वतःपूज्य आहे, ती आमच्या हिंदुसमाजानें देवी मानलेली आहे, पण तिच्या दासी हलकट, व त्या दासीच्या द्वारें तिची उपासना करणारे त्यांहून नीच असा जो प्रकार दिसतो, त्यामुळें मनूसारख्या ऋषींनीं तिला सन्मानपदवीच्या क्रमांत अगदीं शेवटला नंबर दिलेला आहे. हलकट दासी जवळ बाळगण्याच जें उदाहरण लक्ष्मी देवीनें घालून दिलें आहे तिचें अनुकरण सध्याच्या काळीं सुद्धां लक्ष्मी पुत्रांच्या येथें होत असलेलें दिसून येतें; आणि ह्मणूनच विचारी पुरुषांच्या दृष्टीनें या लक्ष्मीपुत्रांची सन्मानाविषयींची अपात्रता आहे. पाश्चात्य समाजांत लक्ष्मीपुत्रांच्या हातून मदोन्मत्ततेमुळें होणारीं दुष्कृत्यें पाहिलीं ह्मणजे तर लक्ष्मीपुत्रहे समाज शत्रु होत असे तीव्रउद्गार काढण्याकडे विचारी लोकांची प्रवृत्ति होते, आणि ज्या मनूनें विद्येला परम सन्मान्य ठरवून लक्ष्मीला अधमप्रतीची सन्मानाची पदवी दिली त्याच मनूचे वंशज, हल्लींच्या काळीं आपल्या पूर्वजांनीं दूरदृष्टीनें ठरविलेली मर्यादा सोडून वागल्यामुळें अधोगतीला कसे जात आहेत व पाश्चात्यांचें अंध अनुकरण करून धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारी पुरुषार्थांना कसे मुकत आहेत हें पाहिलें ह्मणजे मन शोकातुर होतें व लक्ष्मी आणि सरस्वती यांच्या मधली ही एकांगी स्पर्धा आमच्या देशाला कोणत्या गर्तेंत नेऊन टाकणार आहे तें न कळल्यामुळें आमच्या समाजाच्या भावी दुःस्थितीबद्दल एक प्रकारें भय ही वाटूं लागतें.

---

## सध्याची संग्राम देवता केसर

सध्याच्या महायुद्धाचे उत्पादक, व चालक जर्मनीचे केसर यांना पाश्चात्य लेखक संग्रामदेवता या उच्च (?) पदवीनें संबोधीत असतात. या संबोधनांत पुष्कळ गोष्टी अंतर्भूत होतात. त्यांतल्या बहुतेक जरी निंदाव्यंजक असल्या तरी एक विशेष गुण केसरच्या ठायीं आहे आणि तो केवळ अद्भुत आहे. हा गुण ह्मणजे पररहस्योद्घाटनकौशल्य हा होय. इंग्रजी वर्तमानपत्रांतून या त्यांच्या गुणांचीं कित्येक उदाहरणें पाहिलीं ह्मणजे मन आश्चर्यानें थक्क होतें. इटली, फ्रान्स, इंग्लंड वगैरे परराष्ट्रांतल्या प्रधान मंडळांत ज्या गोष्टी अतिशय गुप्त रीतीनें चालतात, त्यांची बित्तं बातमी जणूं काय अंतर्ज्ञानानें केसरला तावडतोब कळते. सन १९०८ सालीं फ्रान्स व इंग्लंड यांच्या मध्यें कांहीं अतिशय गुप्तपणें करार चालला होता. जर्मनीच्या फ्रान्स मधील वकिलाला त्याची खबर नव्हती. पण केसरला होती व त्यानें तिच्याविषयीं अज्ञात राहिल्याबद्दल आपल्या वकिलाला ठपका दिला. तेव्हां त्या वकिलानें बारीक चौकशी केली, तेव्हां खुद्द फ्रेंच प्रधानानें ती गोष्ट खरी असल्याचें कबूल केलें! दुसरें उदाहरण– कांहीं जर्मन खलिते फ्रान्समधून जात असतां मध्यें कोठें उघडले जात, व त्यांचे फोटोग्राफ घेतल्यावर पुनः चिकटवून पुढें रवाना होत. खुद्द फ्रेंच प्रेसिडेंटाला या गोष्टीची खबर नव्हती. पण केसरला होती. त्यानें फ्रेंच प्रेसिडेंटला ती कळविली तेव्हां त्याला आश्चर्य वाटलें. पण गंमत ही होती कीं केसरचें हें पत्र सुद्धा नेहमीं प्रमाणें फोडलें जाऊन त्याचा फोटो घेण्यांत आला होता. फोटोग्राफ घेतल्याची ही खबर केसरला मिळाली व फ्रेंच प्रेसिडेंटाला शेवटीं ती गोष्ट कबूल करून माफी मागावी लागली. केसरची बातम्या काढण्याची ही कला कमज्यास्त मानानें सगळ्या जर्मन लोकांना उत्तम साधलेली आहे असें दिसतें कारण हिंदीमहासागरांत धुमाकूळ घालीत असलेल्या एमडेन जहाजावरल्या कप्तानाला अमकीं अमकीं जहाजें अमक्या अमक्या ठिकाणीं आहेत या विषयींचें पूर्ण ज्ञान असून जहाज येणार आहे अशा सूचना दोन दोन तीन तीन दिवस अगोदर मिळालेल्या असतात असें त्या कप्तानानेंच परवा सांगितलें! जर्मन घोडेस्वाराच्या खोगीराखालीं बिनतारेचें तारायंत्र ठेविलेलें असतें व त्यानें कोठें काय चाललें आहे याचें सूक्ष्मज्ञान त्याला सहज करून घेतां येतें असें ह्मणतात. आमच्या ऋषींना जें अंतर्ज्ञान तपश्चर्येच्या बळानें प्राप्त होत असे तें यंत्राच्याद्वारें जर्मन लोकांनीं प्राप्त करून घेतलेलें दिसतें.

---

## महायुद्धाची मीमांसा.

### (ग्रेटब्रिटनच्या भीष्माचार्यांचा नागरिकांस संदेश)

फील्ड मार्शल अर्ल रॉबर्ट्स यांच्या इतका लढाईच्या बाबतींत जुना तज्ज्ञ मुत्सद्दी दुसरा कोणी नाहींच. हे आपल्या पराक्रमांचें विचारचातुर्यानें, आणि बहुकाल देशसेवेनें इतके सर्वत्र पूज्य व वंद्य आहेत कीं त्यांस ग्रेटब्रिटनचेच काय तर सर्व सुधारलेल्या जगाचेच भीष्माचार्य संबोधिले तरी तें त्यांस शोभण्यासारखें आहे. प्रस्तुतच्या लढाईला उद्देशून सांप्रतच्या नागरिकांचें उत्तमोत्तम ध्येय व इतिकर्तव्य काय हें समजावून सांगण्यासाठीं त्यांनीं ' हीबर्ट जर्नल ' नांवाच्या आक्टोबरच्या अंकांत एक अत्युत्तम लेख लिहिला आहे. त्यांतील ठळक ठळक मुद्दे आह्मी मुद्दाम खालीं देत आहोंत. ह्मणजे त्यांच्या दृष्टीनें आपण हिंदुस्थानवासी लोकांनीं कोणत्या प्रकारची कार्यनिष्ठा ठेवावी आणि ह्या प्रसंगीं 'काळा मनुष्य' ह्मणून नांवाजलेल्या सर्व प्रजासमूहानें ब्रिटिश राज्याची थोरवी व इभ्रत वाढविण्यास कायावाचा मनें आपलें सर्वस्व अर्पण कोणत्या तऱ्हेनें करावें हें कळण्यासाठीं लॉर्ड रॉबर्ट्स यांनीं घालून दिलेला ब्रिटिश प्रजाधर्माचा आदर्श आह्मी महाराष्ट्र वाचकांपुढें मांडीत आहोंत.

## दोन त्रिकूटें

यूरोपांतील मुख्य राष्ट्र ह्मणजे ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, प्राशिया आस्ट्रिया टर्की व रशीया व इटली हीं होत. या राष्ट्रामध्यें दोन फळ्या कशा झाल्या व कांहीं एका पक्षास व कांहीं दुसऱ्या पक्षास कशीं मिळालीं याचा संक्षिप्त उल्लेख ह्मटला ह्मणजे असा कीं १८७७—७८ सालीं रशियानें आपलें सरासरीं ९ लक्ष सैन्य टर्कीवर धाडून जें रण माजविलें त्या वेळीं ड्यान्यूब नदी जेव्हां तें सैन्य उतरूं लागलें तेव्हां प्राशिया व आस्ट्रिया यांना रशियाच्या हालचालीचा धाक पडला तेव्हां ह्या दोघांनीं आपसांत तह करून रशियाचा ग्रह कोणत्याहि प्रकारें आपल्या अंगावर येता कामा नये ह्मणून त्यांनीं आपसांत मैत्री स्थापिली. आपल्या या दुकलीला इटलीनें सामील व्हावें ह्मणून जर्मनीचे नाना फडणवीस प्रिन्स बिस्मार्क यांनीं अशी युक्ती लढविली कीं त्या मध्यें फ्रान्सनें टयूनिस येथें आपली सत्ता प्रस्थापित केली. टयूनिस हें अवघे कार्थेन पासून ९० मैल असल्यामुळें टयूनिस येथील फ्रेंच सत्ता ह्मणजे इटलीच्या राष्ट्राला घातुक अशी घोरपड उभी राहिली. तेव्हां अर्थातच प्रशिया व ऑस्ट्रिया यांच्या दुकलीस इटलीला सामील व्हावें लागलें. इकडे जसें त्रिकूट बनलें त्याच्या उलट फ्रान्स व रशिया यांनी आपली मैत्री सन १८९६ मध्यें स्थापित केली. आणि ग्रेटब्रिटनला या वेळेला आपला एकरंगीपणा बोअर युद्धाच्या वेळेस फळास आला आणि चक्रें परचक्रें यांची शहानिशहा होतां होतां व जर्मनीनें आपलें वाढविलेलें दांडगे आरमार लक्षांत घेऊन ब्रिटिश मुत्सद्यांनींहि १९०४ मध्यें फ्रान्स व रशिया यांच्या बाजूला मिळण्याचा उपक्रम केला आणि शेवटीं १९०७ सालीं हें निराळें त्रिकूट बनलें. अशीं हीं दोन त्रिकूटें बनल्यामुळें कोणत्याही एका राष्ट्राला आपली सत्ता दुसऱ्या राष्ट्रावर वाढविण्याला आळा बसला.

## लढाईचें कारण

आस्ट्रियानें सर्व्हियाला राजपुत्राच्या वधाच्या निमित्तानें जेव्हां निर्वाणीचा खलिता पाठविला व तो सर्वियास कबूल करणें शक्य ही नव्हतें तेव्हां सर्वियाचें अस्तित्व कायम ठेवण्यासाठीं रशियानें आपले दंड थोपटले. तेव्हां ऑस्ट्रियाची कड जर्मनीनें धरली. रशियानें स्वारी सुरू केल्याबरोबर फ्रान्सला रशियाच्या वतीनें युद्धांत सामील होणें भाग झालें.

अपूर्ण

## कपाशी

यंदा कपाशीचा हंगाम चांगला असून मोठी धन संपदा आणण्यासारखा आहे पण लढाईमुळें बाजारभाव अगदींच येणार नाहीं अशी पहिल्यांदा अफवा उठली होती व तिनें लोकांना हवालदिल केलें होते पण प्रत्यक्ष प्रकार आशाजनक व उमेदीचा आहे. गेल्या महिन्याच्या ३१ तारखेला येथील कॉटन मार्केटांत जी पहिली एकच गाडी आली तिला भाव ३३। चा आला आणि त्या नंतर गेल्या सोमवारपासून २२-१३-१९-२१-३९-५८ याप्रमाणें दररोज गाड्या येत गेल्या आणि त्यांना भाव ३४-३६ व शेवटचा ३८ रुपये खंडी याप्रमाणें आला. जे लोक घरचे खाऊन पिऊन सुखी असून ज्यांना कपाशी साठवितां येईल ते सहसा बाजारांत आणीत नाहींत आणि ज्या गरीब शेतकऱ्यांस कापूस बाजारांत आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं त्यांना हल्लीं ज्या कंपन्यांच्या खरीद्या चालल्या आहेत त्यांच्या मानानें उत्तरोत्तर वाढता भाव येईल असा अंदाजा आहे.

## वऱ्हाड विद्या परिषद्

या वार्षिक संस्थेची बैठक आजरोजीं १२ वाजतां पुला जवळील शाळेंत भरणार आहे. या परिषदेचा प्रोग्राम ४ दिवसाचा आहे. यंदा परिषदेपुढें येणाऱ्या विषया मध्यें परीक्षा घेण्या संबंधाचे प्रश्न मातृ भाषेच्याद्वारें विद्यादानाची पद्धति व प्रस्तुतचा अभ्यासक्रम व चालू पुस्तकें तसेच वऱ्हाड शाळांमधून विद्यार्थ्यांची व्हॉलंटीअर पलटण बनाविणें इत्यादि पुष्कळशा वादग्रस्त विषयावर भवति न भवति व्हावयाची आहे ही आनंदाची गोष्ट होय. नीति शिक्षणावरही १ निबंध वाचण्यांत येणार आहे त्यावेळीं धर्म शिक्षण शाळांतून सुरू करण्यासंबंधाचा प्रश्न विचारांत घेण्यांत यावा अशी आमची सूचना आहे.

## विद्यार्थ्यांचे खेळ

उद्यापासून येथील हायस्कूलच्या वीस्तीर्ण पटांगणामध्यें हायस्कूलें व अँग्लो व्हरन्याक्युलर शाळा यांच्यामधील विद्यार्थ्यांमध्यें क्रिकेट, हॉके, फुटबॉल, इत्यादि खेळांना प्रारंभ होऊन ते शनवार अखेर चालतील. शनवारीं सायंकाळीं रा. रा. स्ट्यांडन साहेब कमिशनर यांच्या हातून विजयी विद्यार्थ्यास बक्षीसें वाटण्याचा समारंभ होणार आहे. विद्यार्थ्यांची शरीरें तेजस्वी कांतिमान व वीरश्रीयुक्त असावीं एवढ्यासाठीं हल्लीं जे सर्व राष्ट्रभर शाळाखात्यांतून प्रयत्न चालू आहेत ते विशेष वर्णनीय आहेत. आणि या नव्या दिशेनें पहातां विद्यार्थी वर्गामध्यें वीर्य, ओज व बल हीं त्यांच्या वयोमानानें चांगली नवीन पिढींत दृश्यमान होतील अशी उमेद आहे. क्वचित् क्वचित् हे जे खेळाचे सामने होतात त्यांमध्यें कांहीं दूषित मनोविकारांचें प्राबल्य दिसून येते आणि दोन वर्षांपूर्वीं राजश्री स्ट्यांडन यांनीं खेळांमध्यें विद्यार्थ्यांमधील दिसून येणारे आज्ञेचें उल्लंघन, शिस्तीचा मोड व शिक्षकांमधील पक्षपात इत्यादि दोषांचा उल्लेख केला होता. आह्मी अशी उमेद बाळगतों कीं निदान या चार दिवसांत तसा प्रसंग न येण्याविषयीं विद्यार्थी खबरदारी घेतील.

## लढाई

ग्रेटब्रिटन व फ्रान्स यांच्या आरमारी काफल्यानें गेल्या मंगळवारीं डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीवर तोफांचा जोराचा भडिमार केला. डार्डानेल्समधील किल्यांवरूनही उलट मारा झाला. जहाजाचें कांहींही नुकसान झालें नाहीं.

हिंदुस्थान व साम्राज्यांतील इतर महंमदीयांना अनुलक्षून ना० आगाखान यांनीं एक खलिता प्रसिद्ध केला आहे. जर्मनीच्या हातांतील तुर्कस्थान हें बाहुलें झालें असून त्याच्या सांगीवरूनच तुर्कस्थान चालू अपवित्र अशा कार्यांत सामील झालें आहे असें त्यांत ह्मटलें आहे.

इजिप्तचे शेख, ब्रिटिश ईस्ट आफ्रिकेचे चीफ आणि सायप्रस आणि सीलोनमधील महंमदी प्रजा यांनीं आपण राजनिष्ठ आहों अशी सरकारची खातरजमा केली आहे.

बेलजम सरकारनें प्रसिद्ध केल्याप्रमाणें जर्मन लोक आपले जखमी व मेलेले लोक जागच्या जागीं टाकून न्यूपोर्ट आणि डिक्समूडच्या मध्यंतरी वायसरच्या पश्चिमेस मागें जात आहेत असें दिसतें. सर्वत्र जर्मन सैन्य मागें जात आहे अशी सर्वत्र लक्षणें दिसत आहेत. बेलजन वैमानिकांच्या पाहणीवरून ब्रुसेल्सकडे जर्मन सैन्य मागें जात आहे असें डेलीमेलच्या तारेंत ह्मटलें आहे.

## लढाईचें क्षेत्र

लढाई वाढत वाढत सर्व युरोप भर पसरत आहे. अखेर जर्मनीचा पगडा बसला व टर्की जर्मनीला मिळालें व त्यामुळें युरोपच्या आग्नेयेला लढाऊ आरमारें धुमाकूळ मांडीत आहे. सैप्रेस ब्रिटिश लष्करानें सर केलें. डार्डनलीस येथें तोफांची सरबती चालू आहे. इजिप्त येथें लष्करी अंमल चालू झाला आहे. अरेबियांत रशियन फौज टर्कीच्यामागें हात धुवून लागली आहे. टर्की लढाईंत शिरलें खरें पण तिच्यामध्यें फांटाफूट आहे. इंदु प्रकाश

रशियन सैन्यानें पोलांडच्या बाजूनें शत्रूला जेरीला आणिलें आहे. आणि पूर्व भागाला जर्मन बेलजममधून हळू हळू मागें परतत आहे. पूर्व बाजूला ब्रिटिश, फ्रेंच व इंडियन सैन्यें तटबंदीसारखीं उभीं असून पावलो पावलीं जर्मनीला माघार घ्यावी लागत आहे. दारुगोळा व प्रत्यक्ष लढाई या पेक्षां जर्मन राष्ट्रावर दुसराच कुलपी गोळा सुटला आहे. त्याचा जसा हा बांधकोंडमारा वाढत आहे त्यापेक्षां जर्मनीला लक्षावधी सैन्याला अन्नसामुग्री पुरविण्याचें संकट मरणप्राय होत चाललें आहे. सर्वत्र दाणादाण उडाली आहे आणि दोनतीन महिन्याच्या आंतच लढाईचा शेवट होईल असा रंग दिसतो.

# वऱ्हाडवृत्त

**हवामान**—अभ्रें येतात, क्वचित थोडा थोडा पाऊस ही पडतो. त्यामुळें हवेंतली थंडी जाऊन ती असावी तशी आरोग्य कारक नाहीं. किरकोळ ताप वगैरे दुखणीं थोडीं जोरावर आहेत. पण ही हवेंतील चलबिचल लवकरच नाहीशी होईल असा अजमास आहे.

**पानसुपारी**—गेल्या मंगळवारीं उमरावती येथें रा. रा. स्ट्यांडन साहेब यांच्या बंगल्यावर आलिशान नामदार सर राबर्टसन चीफ कमिशनर यांच्या सन्मानार्थ मोठी पानसुपारी झाली आणि त्यावेळीं त्यांच्या मुलाखतीसाठीं सर्व प्रांतांतील ठळक ठळक प्रतिष्ठित लोकांस निमंत्रणें होतीं. त्यावेळीं कोठें कॉनटोनिसच खेळ कोठें मराठी नाटकाचे कांहीं रंगभूमीवर देखावे, इतर करमणुकीच्या गप्पागोष्टी, फलाहारादिकांचें सुखसेवन इत्यादि गोष्टीमध्यें साहजीकच राजकर्ती मंडळी व इतर नागरिक लोक यांच्यामधील स्नेहभाव व दळणवळण वाढावण्याचा हा सुयोग आणल्याबद्दल उभयतां श्री. स्ट्यँडन दांपत्याचे आह्मी ऋणी आहों. या पान सुपारीच्या वेळीं रावबहादूर दामले व खानसाहेब अबदुलकादर यांस त्यांच्या नवीन किताबाच्या सनदाही देण्यांत आल्या.

आजरोजीं सायंकाळीं ५ वाजतां विद्यापरिषदेच्या विद्यमाने क्यापटन फाउलर यांच्या अध्यक्षत्वाखालीं "आकस्मिक दुखापतीवर तात्कालिक उपाय" या विषयावर डॉक्टर भणगे यांचें व्याख्यान होणार आहे.

'तळवळकर बक्षीस फंड' नांवाचें एक बक्षीस १५०० रुपये देणगी देऊन रा. रा. गोपाळराव तळवळकर हायकोर्ट वकील यांनीं आपल्या तीर्थरूपांच्या स्मारकार्थ ठेविलें आहे हें कळविण्यास परम आनंद वाटतो.

रा. रा. मूलचंद शुक्ल मुनसफ यांस आकोल्यास नेमून रा. रा. गणपती महादेव पेंढारकर मुनसफ यांस आकोल्याहून जंजगीर येथें बदलण्यांत आलें.

नामदार राजश्री मो० विश्वनाथ जोशी यांनीं येथील व्याख्यान मालेंतलें ३ रें पुष्प हल्लींच्या तरुण विद्यार्थ्यांनीं पुढें काय करावें ' या विषयावर काल रोजीं गुंफलें.

**श्री. गणपति महायज्ञ**- या यज्ञाची समाप्ती श्री० वे० शा० सं० गणपतीबुवा इस्लामपूरकर यांनीं केली आणि त्या दिवशीं सायंकाळीं पानसुपारीचा समारंभ झाला. पानसुपारीला सर्व धर्माची मंडळी बोलाविली होती आणि त्या वेळीं येथील डे० कमिशनर रा० रा० देवर साहेब हे हजर होते. त्यांनीं बुवांच्या हातून महायज्ञाचा प्रसादही मोठ्या आनंदानें ग्रहण केला. रा० रा० रामभाऊ महाजनी' चिपळूणकर व चिंतामण शास्त्री यांचीं समयोचित भाषणें होऊन मोठ्या आनंदांत या महायज्ञानें लढाईचा शेवट यशप्रद होवो अशी सर्वजण श्री गजानना जवळ प्रार्थना करीत मंडळी घरोघर परतली.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| सोनें | २६॥ |
| चांदी | ७५ |
| आळशी | ९५ |
| रुई | ४२ |
| गहू | ८ ते ८॥ |
| ज्वारी | ५० ते ६५ |
| तूप | १० ते १०॥ |
| तेल | ७॥ ते ८ |

हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO. N. 156

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला——सोमवार तारीख १६ माहे नोव्हेंबर सन १९१४ इ० [ अंक ४४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## WANTED.

For the post of a temporary teacher on Rs. 15. per month to teach the English 1st standard in the Municipal Middle Anglo-Vernacular School Malkapur.
None need apply who has not passed the Matriculation Examination with Sanscrit as his second language.
Preference will be given to one who has got some experience of the work
Applications with copies of testimonials should reach the undersigned on or before the 15 th October 1914

Md. M. A. Khan,
Vice chairman
M. committee
Malkapur
(Berar)

Malkapur
24 September 1914

No. No. 415

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा भ्रतार रामचंद्र गुरु देवचंद तारीख ७ ८-१९१४ रोजीं मैयत झाला. ते वेळीं मी खालीं सही करणार आणि माझी धाकटी सवत पार्वतीबाई इतक्याच काय त्या समाईक कुटुंब पद्धतीनें त्याजजवळ होतो त्यानें दत्तक वगैरे कोणास घतले नव्हतें, व त्यानें मृत्युपत्र केलेलें आहे. त्याच्या खऱ्या खोट्याचा अद्याप निवाडा व्हावयाचा असून तें सिद्ध व्हावयाचें आहे तें सिद्ध होऊन दत्तक घेतला जाईपर्यंत किंवा रामचंद्रच्या इस्टेटीची वाटणी कायदेशीर रितीनें होत नाहीं तों परयंत सर्व इस्टेटिची मालकीण आणि ताबेदारीन मी असून माझे भ्रताराची सर्व स्थावर जंगम इस्टेट म्यानेजर या नात्यानें माझेच ताब्यांत आहे. या करितां रामचंद्रचें कर्ज अगर त्याची जमीन किंवा त्याचा जंगम माल वसूल करण्यास पट्यानें अगर गाहाणानें देण्यास अगर विल्हेवाटीस लावण्यास मजवांचून दुसरे कोणाचाही अधिकार नाहीं. पार्वतीबाई मजजवळ समाईक आहे. तिनें तारीख ९-९-१४ रोजीं कोर्टातं काम चालविण्या करितां समाईक मुखत्यार नेमला होता. त्याचें मु० पत्र तिनें तारीख २१-९-१४ रोजीं रद्द केलेलें आहे. शिवाय तिनें दुसऱ्या बऱ्याच गोष्टी केल्या आहेत व त्या वरून असें स्पष्ट दिसते कीं ती स्वार्थी आणि मतलबी लोकांचे नादीं लागून फौजदारी जोखीम देखील अंगावर ओढून घेत आहे.

प्रथमतः स्त्री असलेमुळें तिला इस्टेटीचा अफरातफर करता येत नाहीं. शिवाय समाईक इस्टेट असून ती धाकटी आहे ह्मणून तिला कसलाही इस्टेटीसी व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. या साठीं रामचंद्रच्या कर्जदारांस आणि रामचंद्रच्या इस्टेटिशीं कसल्याही प्रकारचा व्यवहार करणाऱ्या सर्व लोकांस या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं त्यांनीं पार्वतीबाईशी कसलाही व्यवहार केल्यास त्याची कसलीही जबाबदारी खालीं सही करणार इजवर अगर रामचंद्रच्या धन दवलतीवर नाहीं. तसला व्यवहार त्यांनीं तिज बरोबर करून आपल्या हित संबंधास विरोध आणून घेऊ नये कळावें तारीख ९ माहे नोव्हेंबर सन १९१४ इसवी.

सही.

नि. मनाबाई मर्दे रामचंद रा० सीवण खुर्द द० बाळभारथी द. खु.

नो० नं० ४३९

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण उर्फ बाबा गणेश ठेंबरे रा० आकोट व जानराव बाळकृष्ण गाडेगांवकर हल्लीं वस्ती आकोट अमृत काठोळे रा० आकोट गणपत रोकडे रा० आकोट गोविंदा पाटील रा० लोहारी खुर्द ता० आकोट

यांस

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे तीर्थरूप रामकृष्ण राजाराम यानीं तुह्मांस कर्ज दिलें व त्याकर्जाबद्दल प्रॉमिसरी नोट व रोखे आमची सापत्न आई सरस्वती जवजे रामकृष्ण इचे नावें लिहून घेतले आहेत परंतु सर्व आह्मी कुटुंब येकत्र असोन आमचे वडिलाचे संपादन केलेले पैसे आमचे वडिलानी तुह्मास दिले आहेत त्या पैशाचे आह्मी वारस आहोत ह्मणून आमचा बाप दोन महिने मरण पावल्यामुळें तुह्मास बरेच वेळा मी रुपये मागितले परंतु तुह्मी मजला देत नाहीं. तर ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत आणून द्यावे व आमची पावती घ्यावी आमचेशिवाय आमचे आईस वगैरे कोणास देऊ नये. दिल्यास त्याबद्दलचा बोजा तुमचेवर राहील. पंधरा दिवसाचे आंत पये नदिल्यास तुमचेवर दावा आणून कोर्टखर्चा सुद्धा पैसे घेतले जातील कळावे ता० ३।११।१९१४

सही

बळीराम रामकृष्ण व्यास रा० आकोट

नो० नं० ४४०

## नोटीस

नोटीस बेशमी रामचंद्र वा गणू पाटील रा. मनारखेड तालुके जळगांव जिल्हा बुलडाणा.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मजला तूं आज १४।१९ वर्षें झालीं तेव्हांपासून टाकून दिले आहे. कधीही नेण्यास आला नाहीं. मी लोकांचे कर्ज १००० रु. काढून आपला उदरनिर्वाह करीत आहे. मी तुमचे जवळ फार्कत दोन तीन वेळां मागितली. तुह्मी दिली नाहीं. तरी आतां नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत वरील कर्जाची फेड करून मजला घेऊन जाणें. जर वरील मुदतींत तुह्मी कर्जाची फेड न केल्यास व मजला नेण्यास न आल्यास हीच फार्कत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली तारीख ८।११।१९१४ इसवी.

सही

सहीची निशानी बांगडी सारजा बाई मर्दे रामचंद्र पाटील रा० आलेगांव

दस्तुर हरी भाऊराव

नो. नं. ४४२

## नोटीस.

रा. रा. माधव शिवराम भोके जात ब्राह्मण रा. पंचगव्हाणं खेळ देशपांडे

यांसः—

खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी ता० २. अक्टोंबर सन १९१४ रोजीं तुमचे मालकीची घरें तीन ह्मणजे भाउ भोळेवाले. वासुदेव नाईकवाले व तुमचे रहाते धाबे अंगणासुध्दा रुपये ९०० ला विकण्याचे कबूल केले व त्या करारानुसार आमचे पासून रुपये ९ इसाराबद्दल घेतले व खरेदी खता साठीं स्टांप कागद ९ रुपयाचा आमचे पासी आणूनही दिला परंतु पुढें तुमचे मनांत बेमानकी आली असून खरेदीखत करून देण्यास वारंवार बोलावणें पाठविले असतां टाळाटाळी करित आहांत. तरी या नोटिशीनें कळवितो की तुह्मी ताबडतोब आपणामध्ये ठरल्याप्रमाणें, आह्मी स्थापन केलेल्या व आमचे मालकीच्या श्री आप्पास्वामी संस्थानचे नांवानें खरेदीखत लिहुन नोंदून द्यावें. तसें न केल्यास कोर्ट मार्फत खरेदीखत करून घेऊं. व मग या नोटिशीचा खर्च व कचेरीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावे मु॥ आकोला. ता. १०-११-१४

सही.

श्री आपास्वामी संस्थान पंचगव्हाणचे वहीवाटदार मालक गोपाळ व देवलाल नानकराम आगरवाले. तर्फे कुलमुखत्यार आपाजी मारुती दस्तुर खुद.

नो० नं० ४४३

## नोटीस

नोटीस बेशमी पांडू व. नारायण क्षीरसागर राहणार नीमखेड ता. मलकापूर जिल्हे बुलडाणे

पांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे मोहतुराचे नवरे आहा. पण तुमची वर्तणूक बिलकूल चांगली नाहीं. तुह्मी तुमचे व माझे व माझे आई बापाचे अब्रूस बट्टा लागेल अशी भलतीच कर्मे करितां. परवां एका कोल्हाटीनचे प्रकरणांत तह्मी स्वतः जातीबाहेर पडून माझे आई बापासही जातीबाहेर टाकले. माझे आईबाप पंचामार्फत शुद्ध झाले पण तुह्मी अझून तसेंच जाती बाहेर आहां. मी सध्यां माझे आई बापाचे घरीं आहे व यापुढें तुह्मी तुमची वर्तणूक चांगली ठेवल्यास मी तुमचे घरीं नांदण्यास तयार आहे. परंतु तुह्मी तुमचे चांगले वर्तणूकीचे जामीनकीबद्दल रुपये पांचशे रोख माझे बापाजवळ अनाम ठेवावे व मला तुमचे घरीं घेऊन जावे. याची मुदत १९ दिवस, सदरहू मुदतींत तुमचे कडून असें न झाल्यास ही नोटीसच आपली फारकत समजून मी दुसरा नवरा करीन कळावे ता. ४ माहे नोवेंबर सन १९।१४ इ.

सही

सजनी मर्दे पांडू राहणार हल्लीं मु. निंबारी ता. मलकापूर नि. खुद्द हातची.

नो० नं० ४४४

विश्वास असेल तर मागवा.

## सुगंध शीर्ष

आज पर्यंतच्या मेंथॉल व बामवर गुणकारित्वासंबंधाची शर्थ आह्मी जिंकिली आहे. उष्णतेचे मस्तकाविकार, संधीवात, विंचवाचा दंश, दंत विकार इत्यादिकावर खात्रीचा इलाज. पैसे परत करण्याची थाप नाहीं. थोडेसें मस्तकाला चोळतांच सुगंधानें पुष्प वाटिकेंतच उभे असल्याचा भास होईल. किंमत कांचेच्या बाटलीस ।॥. ट.ख. निराळा ६ बाटल्यास पो. ख. माफ. बाटलीवर सही पाहून घ्यावी. तयार करणार —सकळकळे ॲन्ड सन्स काळ्यांचे हवेली मागें शहर आकोला.

नो० नं० ४४९

## नोटीस

हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटचा ठराव नं० २८३१-४२ ता० ८ डिसेंबर सने १८९९ यांतील खालील उतारा सर्व लोकांचे माहितीकरितां प्रसिद्ध करण्यांत येत आहे,

## ठराव

नागपूर ता० १० नोव्हेंबर सन १९१४ } ये. ब्लेनर ह्यासट चीफ सेक्रेटरी, निस्बत चीफ, कमिशनर मध्यप्रांत

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांनीं हिंदुस्थान सरकारचे नजरेस असें आणिलें आहे कीं इंग्लडांत गेलेले हिंदुस्थानांतील विद्यार्थी किंवा इतर रहिवाशी हे, जेथें पासपोर्ट रहदारी परवाना जवळ असणें इष्ट किंवा जरूर असते अशा परदेशांत प्रवास करितां यावा ह्मणून पासपोर्ट मिळण्यासाठीं अर्ज करितात, व अर्जदार हा ब्रिटिश प्रजा आहे ह्मणून त्यास पासपोर्ट मिळण्याचा हक्क आहे अशाबद्दल पुरावा नसल्यामुळें वारंवार अडचण पडते असें अनेक वेळा घडते. तसेंच स्वदेशीं परत जाऊं इच्छिणारे निराधार हिंदी लोक व पुरेसा पैसा नसल्यामुळें अभ्यासक्रम पुरा करण्यास असमर्थ असे हिंदी विद्यार्थी यांजकडून साहेब महसूफास मदतीसाठीं वारंवार अर्ज करण्यांत येतात.

२ अशी बाबतींत सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना समाधानकारक व्यवस्था करितां यावी ह्मणून गव्हर्नर जनरल इन कौंसिल यांनीं असें ठरविलें आहे कीं इंग्लंडांत जाणारे विद्यार्थी व इतर हिंदी लोक यांचे मनावर खालील गोष्ट चांगली बिंबविणें अवश्य आहे ती ही—त्यांनीं हिंदुस्थान सोडण्यापूर्वी, ते ब्रिटिश हिंदुस्थानचे रहिवाशी असतील तर आपले जिल्ह्याचे मुख्य अधिकाऱ्याचे सहीचा प्रेसिडेन्सी टाऊनमध्यें पोलीस कमिशनरचें सहीचा व देशी संस्थानचे रहिवाशी असतील तर पोलिटिकल ऑफिसरचे सहीचा ठरावास जोडलेल्या नमुन्याप्रमाणें ओळख पटविणारा दाखला ( सार्टिफिकेट ऑफ आयडेंटिटी ) घेऊन ठेवावा हें इष्ट आहे. विद्यार्थ्यांचे बाबतींत ह्या दाखल्यावर त्या विद्यार्थ्यांचे शेवटचे शाळेच्या अगर मुख्य अधिकाऱ्याची सही घेऊन आणखी जरूर असेल त्याप्रमाणें जिल्हा अधिकाऱ्याची प्रेसिडेन्सी टाऊनमध्यें पोलिस कमिशनरची किंवा पोलिटिकल ऑफिसराची सही घ्यावी.

ओळख पटविणाऱ्या दाखल्या [ सार्टिफिकेट ऑफ आयडेंटिटी ] चा नमुना·

१ अर्जदाराचें नांव ——————

२ बापाचें नांव व जात ——————

३ राहण्याचें ठिकाण ——————

४ अर्जदाराचें वय ——————

५ अर्जदाराचा देश* ——————

६ बापाची ( किंवा पालकाची ) सामाजिक व सांपत्तिक स्थिति ——————

७ हिंदुस्थान कधीं सोडणार ह्याची अंदाजानें तारीख ——————

८ अर्जदाराचा इंग्लंड ( युरोप ) ला जाण्याचा उद्देश ——————

सही ——————

डेप्युटी कमिशनर अथवा पोलिटिकल एजंट अथवा शाळेचा किंवा कॉलेजचा मुख्य अधिकारी +

अर्जदाराची सही ——————

माझे समक्ष सही केली.

डेप्युटी कमिशनर किंवा पोलिटिकल एजंट

---

* ह्मणजे तो ब्रिटिश मुलुखांत जन्मल्यामुळें किंवा राहिल्यामुळें ब्रिटिश प्रजा आहे किंवा देशी संस्थानची प्रजा आहे.

+ शाळांच्या किंवा कॉलेजाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या सह्याचे सार्टिफिकिटांवर आणखी जिल्हा किंवा पोलिटिकल अधिकाऱ्याची सही घ्यावी.

नो० नं० ४४७

---

## नोटीस

नोटीस बेशमी सरस्वती जवजे रामकृष्ण व विठ्ठल भट बिन बापू भट धारूरकर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे वडिलानीं बाबा उर्फ नारायण गणेश ठोबरे, जानराव बाळकृष्ण, अमृत काठोळे गणपत रोकडे रा० आकोट व गोविंदा पाटील रा० काहोरी खुर्द ता० आकोट यांना पैसे देऊन प्रामेसरी नोटा व रोखे तुमचे नांवें लिहून घेऊन तुमचे जवळ ठेविले आहेत व माझे नावचे रोखेही तुमचे जवळ ठेविले आहेत तुमचे नावचे रोखे व प्रामेसरी नोटा व माझे नावचे रोखे त्यांचा मालक मी आहे. तुमचा फक्त अन्नवस्त्राचा अधिकार आहे. त्या रोख्याचे व प्रामेसरी नोटीचे पैसे तुह्मी माझे खेरीज वसूल करूं नये आमचे सोन्या चांदीचे दागीने किंमत रुपये अंदाज ५००० पांच हजाराचे तुह्मी नेलें आहे ते सर्व दागीनें भांडेकुंडे व दस्ताऐवजही नोटीस पावलेपासून आठ दिवसाचे आंत माझे स्वाधीन करावें न केल्यास कोर्टांत दावा करून खचासुद्धां वसल करूं कळावें नोटीस ता० ३।११।१९१४ इ.

सही

बळीराम रामकृष्ण व्यास राहणार आकोट

नो. न. ४४१.

---

## नोटीस

रा० रा० सखाराम वल्लद सुर्यभान भांगे· पाटील राहणार हल्लीं खामखेड प्रगणे पातुर तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी आपलें मालकीचे मौजे भंडारज बुजरुख येथील सर्वे नंबर ४९ येकर ३०।-२७ गुंठे आकार रुपये ४२ यातील हिस्सा पांच जोड्याचा तेरा आणे चारपैचा १३।४ आह्मांस तारीख २७।४।१९१२ ईसवी रोजी अकरा वर्षा करीतां रजीस्टर बुकनंबर १ अनुक्रम नंबर ५१७सन चा पटा १९१२ आमचे जवळून करून घेतला असून त्याच सालात ही जमीन लीहुन घेतलेली आमचे ताब्यांत आली नसुन लिहुन दिलेली जमीनीपैकी निमे जमीन मिळाली आह्मीं तितकीच निमे वाहिली व तुह्मास साऱ्या बद्दल रुपये पंचेवीस दिले तुह्मी आपले सहीची पावती ता. ३।२।१३ ची दिली पण त्यांत जमीनीसंबंधानें खुलासा कांहींच केला नाहीं त्या मुळें आह्मी ती जमीन वाहिलीच नाहीं व यापुढें तुह्मांस स्वामत्विाबद्दल आह्मी येक ही पैसा देणार नाहीं तुह्मी जमीन आह्मास पट्यानें दिली त्यापैकीं पांच आणे चार पैचा हिस्सा तुह्मी भगु पाटील बाखराबारकर यास विकत दिला व भगु पाटील यानें किसन वा॥ खुशाल सेंडे यांस विकत दिली ती हल्लीं ती जमीन चंद्रभान सेंडे व सुर्यभान मीसे असे इसम पाहात असून विकत घेतली ह्मणतात. आमचे जवळुन घेतलेला पट्टा तुह्मीं खोटेपणानें घेतला असून आमच्यासी दगाबाजी केली तरी आह्मी गरीब लोक असल्यामुळें तुह्मास नोटीसीनें कळवितो कीं नोटीस पावल्यापासुन आठ दिसाचे आंत आमचे जवळून घेतलेला पट्टा रद्द करावा व आह्मास स्वामित्वाचे पैसे मागीतले जाउ नयेत असे बद्दल आह्मास उलट जबाबानें कळवावें असें न केल्यास पुढें तुमची तकरार ऐकिली जाणार नाहीं व यापुढें आमचे पट्याचे कामांत कांहीं लबाडी वगैरे केल्यास फौजदारी कायद्यास पात्र व्हाल दिलेले नोटीसीचा खर्च तुमचे कडून घेतला जाईल. ही नोटीस दिली सही तारीख ११।११।१९१४ ईसवी

सही

वाकाजी वा. नवळाजी पुंडकर रा. तांदळी खुर्द निशानी

रामु वा॥ वाकाजी पुंडकर रा. तांदळी खुर्द निशानी

नो. न. ४४९

---

## नोटीस

शेख इमनु वल्लद महमद हयात मुसलमान रा० मौजे ढंगारखेड प्रगणें कुरम पोष्ट कुरम ता० मुर्तिजापूर.

यासः–

खालीं सही करणार याजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आमचे स्वतः मालकीचे शेत मौजे ढंगारखेड येथील शेत स नं. २८ यातील पोटहिस्सा नं. ३ एकर गुंठे ४।१९ आकार ५।५।४ हे मी तुंह्मास साल गुदस्ता पट्यानें रुपये ३३ चा वायदा समेत वाहण्यास दिले स्वामित्वाचे रुपये ज्याने वारीमाहिन्यात घेण्याचा करार होता. स्वामित्वाची रकम फिटे पावेतो शेतातांल मालावर मालकी खुद माझी राहावी या शर्ती प्रमाणें तुंह्मी मजला पट्टा लीहून दिला होता या करारा प्रमाणें सालमजकुराहि शेत तुह्मांस वरील स्वामित्वाचे रकमेस वाहण्यास दिले व त्याचा कउलपटा मी तुमचे जवळून रामचंद्र नारायण मोहोड रा० कुरम यांचे हातानें लिहिण्यास लाविला परंतु त्यांचा लिखाइची मेहनत तुह्मी त्यावेळीं नदिल्यामुळें तो लिहीलेला पटा त्याचेपासीं राहीला पुढें तुह्मी त्यांची लिखाई देऊन आणिला पण तो अजून तुह्मी मजला दिला नाहीं माझे स्वामीत्वाचा करार अजून पुढेंच आहे शिवाय तुमचे आणि माझे करारा प्रमाणें माझी स्वामीत्वाची रकम मजला मिळे पोवेतों शेतांतील मालावर माझी मालकी व ताबा आहेच पण तुह्मांस या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी ही नोटीस पावल्या पासून चार दिवसाचें आंत मजला पटा आणून द्यावा या प्रमाणें न केले तर माझे स्वामीत्वाचे रुपये मजला वरील मुदतींत ह्मणजे ४ दिवसांत आणून द्यावे आणि माझी पावती घ्यावी माझाशीरस्ता स्वामीत्वाचा रकम दिल्याची भरपाई पट्यावर करुन देण्याची वहीवाट आहे आणि या वहिवाटी प्रमाणें मी तुह्मास गुदस्त सालचे पट्यानें भरपाई करुन दिली आहे. तर याप्रमाणें नझाल्यास मी मालावर कबजा करीन आणि तुह्मास रकम घेतल्याशीवाय माल नेउ देणार नाहीं. हि नोटीस दिली सही कायद्या प्रमाणें या सर्व गोष्टीस तुह्मी मजला हरकत केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल. मुकाम आकोला ता. १०-११-१४

सही.

जमनादास इद्रचंद व गोपी किसन जेठमल पैकीं वहीटदार मालक जमनादास इद्रचंद दुकान कुरम द० खु०

नो० नं० ४४८

---

## नोटीस

आपी मर्द नथ्या महार ० गोमेदर ता० मेहकर ईस–

खालीं सही करणार कळवितो कीं तूं माझी लग्नाची बायको असून तुजला तुझे वाईट चालीचें वर्तन माझे नजरेस आलेमुळें मी गे या जानेवारी महिन्यांत काढून दिले· तेव्हांपासून तूं आपले बापाचे घरीं आहेस, आणि माझीं मुलें आसरू, तानकी, मानकी असे तूं आपले बरोबर नेले आहेत. तुला व तुझे बापास पंचासमोर तूं माझे कामी राहिली नाहींस सबब माझी मुले माझे हवाली करून गंधर्व करून दुसरा नवरा कर असें सांगितलें असून तूं माझी मुलें आणून घातली नाहींत तरी तुला या नोटीशीनें कळवितों कीं माझी हीच फारकती समजून तूं दुसरा नवरा करावा मी माझे नवरेपणाचा व लग्नाचा हक्क तुजवरील सोडला आहे. तरी माझीं मुलें नोटीस पावल्यापासून ८ दिवसानी माझे घरीं आणून घालावीं तूं मुलें आणून न घातल्यास मुलांची जबाबदारी तूं आणि तुझ्या बापावर राहील. कळावें ता. ७।११।१४ इ.

सही

नथ्या वा॥ कऱ्या महार रा. उटी ता० मेहेकर नि० आंगठा

नो० नं० ४४६

# वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य १४ शके १८३६


## साहित्यातलें स्वराज्य.

आयर्लंडांची होमरूलासाठीं जी चळवळ आज शेंदीडशें वर्षें चालली आहे तिचा इतिहास सर्वांना विदित आहे. पण या चळवळीपेक्षांही ज्यास्त गंभीर स्वरूपाची आणि अधिक फलदायी अशी एक मोठी चळवळ आयरिश समाजांत चालली आहे तिच्याकडे फारच थोड्यांचें लक्ष गेलें असेल. पण ही चळवळ अतिशय महत्त्वाची व फार बोधप्रद असल्यामुळें तिचें स्वरूप आज थोडक्यांत सांगण्याचा आमचा विचार आहे.

होमरूलाची चळवळ राजकीय आहे. आह्मी सांगणार आहों ती चळवळ राष्ट्राच्या सर्व अंगांशीं संबद्ध अशी आहे. सध्यां ती केवळ साहित्यांतच आहे, पण साहित्य हें राष्ट्रांत भावनांची जागृति करणारें, व राष्ट्रदेहांत प्राणाचा संचार करविणारें असल्यामुळें या संजीवनी मात्रेचा गुण उशीरानें कां होईना, पण विलक्षण रीतीनें दिसल्याशिवाय राहणार नाहीं. त्या देशांत एक राष्ट्रीय उद्धारक असा लेखकांचा वर्ग उत्पन्न झाला आहे. मि. रसेल हे या वर्गापैकीं एक आहेत. डा. रवींद्रनाथ यांच्या कवि-" तेचें रहस्य पाश्चात्यांच्या नजरेस आणून देणारे कवि मि. यीटस हे त्यापैकींच होत. हे लेखक मनुष्यसमाजाला अमृतत्वाचें तत्त्व समजावून देण्यास उद्युक्त झाले आहेत. या जगांत भौतिक सुख हेंच कांहीं मनुष्याचें सर्वस्व नाहीं, बाह्य सौंदर्य, बाह्यज्ञान, बाह्य दृष्टि यांच्या पोटांत अंतःसौंदर्य, सूक्ष्मदृष्टि, व चिर, अक्षय्य, आणि अविनाशी असें गंभीर सौंदर्य तत्त्व आहे तिकडे लक्ष द्या, तें प्राप्तकरून घेणें हें आपलें ध्येय ठेवा, वरच्या कवचाला भुलून आंतलें अमृत टाकूं नका अशी यांची शिकवणी आहे. हा अमृतप्रवाह राष्ट्रीय जीवनाच्या अंतर्यामीं वाहूं द्या, म्हणजे समाजाच्या अंगांत दृढता, तेजस्विता व ईश्वरपरायणता हे गुण संचरतील आणि सगळें जीवन एकरसमय होईल, शुद्ध होईल, नवें तारुण्य, नव्या उमेदी, नवी महत्त्वाकांक्षा, नवा प्राण राष्ट्रदेहाला प्राप्त होईल असें यांचें म्हणणें आहे. याला त्यांनीं केल्टिक रिव्हायव्हल असें नांव दिलें आहे. [जर्मनी]त आयकेन, बेल्ज्यमांत मेटरलिंक, पोलंडांत नीट्शे, व फ्रान्सांत बर्गसां हे तत्त्वज्ञ याच मताचा प्रचार करीत आहेत. इंग्लंडांत म्याथ्यू अर्नोल्ड हेही याच मताचे होते. पण आयरिश लेखकांनीं या विदेशी ग्रंथकारांपासून हा गुरुमंत्र घेतलेला नाहीं. ही नवी शिकवणी आयरिश लोकांची स्वकपोलकल्पित आहे. गेल्या शतकाच्या अखेर अखेर पर्यंत आयरिश लोकांमधल्या या मताचा प्रादुर्भाव ही झालेला नव्हता. ही अगदीं अलीकडची सृष्टि आहे. बर्न्स, स्कॉट प्रभृति एकोणि[सा]व्या शतकांतल्या लेखकांनीं अशाच प्रकारची कांहीं स्वाहित्य विषयक चळवळ केली होती. तिला रोम्यांटिक असें नांव आहे. पण तिच्याशींही हिचा संबंध नाहीं. तिचा पाया प्रेमसंगीत हा होता. केल्टिक चळवळीचा उगम अध्यात्मिक आहे. वर्डस्वर्थ किंवा शेली यांच्या कवितेंत या चळवळीची छाया दिसते. आमच्या रामायण महाभारत ग्रंथांचा जो प्राण आहे तोच प्राण सध्याच्या केल्टिक चळवळीचा आहे. समुद्रावरील वायु, सागरांतले तरंग, सूर्याचें तेज, शास्त्रांतलें अक्षर, रण क्षेत्रावरील भाल्याचें तीक्ष्ण अग्र, मनुष्याच्या डोक्यांतला मेंदू, पर्वतभेदी वज्रास्त्र, चंद्राची शीतलता इत्यादि सर्व मी आहे असें सांगणाऱ्या एका महत्तत्त्वाचें वर्णन एका जुन्या केल्टिक कवितेंत आहे तें वाचून भगवद्गीतेंतल्या कृष्णोक्तीची आठवण कोणाला होणार नाहीं? पण मध्यंतरीं ख्रिस्ती धर्माच्या लाटेखालीं हें केल्टिक तत्त्व दडपलें गेलें होतें. तें आता उचल खाऊं पाहत आहे. या तत्त्वाचा जीर्णोद्धार करणारांनीं आयर्लंडांत गेलिक लीग नांवाचें एक मंडळ स्थापन केलें आहे. याचा एक उद्देश मातृभाषेचा उद्धार करणें हा आहे. या मंडळाचे सभासद सध्यां एकहजार आहेत. या मंडळानें आपल्या मातृभाषेचा अभिमान जागृत करण्यासाठीं १०० प्रचारक किंवा उपदेशक फिरते ठेवले आहेत. अर्धाच हजार वर्षांपूर्वींच्या भाषेला नवजीवन देऊन पुनः तिचा संचार करण्यासाठीं ही खटपट चालली आहे. या मंडळाचा दुसरा उद्देश सर्व साधारण लोक साहित्य निर्माण करणें हा आहे. त्यासाठीं गांवोगांवचे बाजार, जत्रा, प्रदर्शनें, मेळे, नाटकें, खेळ, वगैरे लोकसमूह गोळा होण्याचे प्रसंग साधून तेथें ते आपल्या पुस्तकांचा प्रचार करतात. त्यासाठीं लोकांच्या अभिरुचीस नवें वळण लावणारीं नाटकें त्यांनीं लिहिलीं आहेत. त्यांतली भाषा अशिक्षित माणसांना सुद्धां समजण्यासारखी व विचार सर्वांना पटण्यासारखे सोपे व स्पष्ट करून दाखविलेले असतात. त्यांत पूर्वींच्या केल्टिक पूर्वजांचा करारीपणा, स्वाभिमान, देशप्रीति, सरलता, साधी राहणी, स्वधर्मप्रेम, प्रकृतिपूजा इ. गोष्टींचें हृदयंगम चित्र वठविलेलें असतें. जुन्या कल्पनांचा व जीवनादर्शाचा प्रचार करण्यासाठीं असे भगीरथ प्रयत्न दुसरे कोणी केल्याचें उदाहरण इतिहासांत नाहीं. दंतकथा, उंदरामांजरांच्या गोष्टी, कहाण्या इत्यादिकांना जुनें वळण लावून त्यांचा प्रसार करण्याचा दीर्घप्रयत्न या मंडळानें चालविला आहे, व त्याला चांगलें यश येत चाललें आहे.

या आयरिश चळवळीपासून आह्मा भारतीयांना कांहीं शिकतां येण्यासारखें आहे कीं नाहीं हें आह्मी पहावयास नको काय? सध्या आमचा समाज पाश्चात्य सुधारणेच्या प्रवाहांत गटंगळ्या खाऊन दुर्दशा करून घेत आहे. आमचा देश, हवामान, प्रकृति, धर्म, तत्त्वज्ञान, समाजाचीं मूळबंधनें सगळींच भिन्न असतां पाश्चात्य सुधारणेचें रोप येथें लावण्याची व्यर्थ खटपट करण्यांतच सगळे लोक गुंग झाले आहेत व आमच्या प्राचीन आर्यसुधारणेला पूर्णपणें विसरले आहेत. पाश्चात्य सुधारणेंत आहेत, पण प्राचीन आर्यसुधारणेंत नाहींत अशीं कोणतीं तत्त्वें आधुनिक सुधारकांनीं शोधून काढलीं आहेत? स्त्रियांचा मान, त्यांचें स्वातंत्र्य, व्यक्ति व समाज यांच्यांतलें बंधन, धर्मस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य, वसुधैव कुटुंबकम् अशी वृत्ति, कोणत्या बाबतींत आमची आर्यसुधारणा मागें होती? भौतिक शास्त्रांत त्यांची प्रगति हल्लींच्या इतकी झाली नव्हती हें कबूल आहे. ती उणीव तेवढी तुह्मी आतां भरून काढा. पण पाश्चात्य समाज केवळ भौतिक सुधारणेच्याच नादीं लागून आध्यात्मिकतेला विसरल्यामुळें जे अनर्थ होत आहेत त्यांच्याकडे दृष्टि देऊन भौतिक सुधारणा हेंच ध्येय उराशी बाळगून बसूं नका. आर्यसुधारणा ही या देशांतली, या हवेंतली, लोकांच्या हाडींमासीं खिळलेली, पुनरुज्जीवनास सुकर, समाधानवृत्ती व शांतता, आणि सुख देणारी असतां तिचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न सोडून भिन्न परिस्थितींत, भिन्न हवेंत, भिन्न प्रकृतीच्या लोकांत उत्पन्न झालेल्या सुधारणेचीं रोपें इकडे लावूं पाहतां, त्यासाठीं वर्तमानपत्रें, ग्रंथ, काव्यें, नाटकें, वगैरे लिहून ती येथें लोकप्रिय करूं पहतां याला काय ह्मणावें? जें आपल्यांत नव्हतें, पण हल्लींच्याकाळीं इष्ट आहे असें नवें तत्त्व आढळल्यास तें खुशाल घ्या. त्याला कोणी नाहीं म्हणत नाहीं. पण ज्या गोष्टी आमच्यांत पूर्वीं होत्या, पण मध्यंतरीं अज्ञानयुगानें नष्ट करून टाकल्या त्या शोधून काढून त्या अमूल्य रत्नांना उजळा देण्याचें सोडून काचमणि शोधण्यासाठीं येवढी यातायात कां करतां? जुनी मजबूत इमारत पाडून तिच्या जागीं नवी कच्ची इमारत बांधण्यासाठीं व्यर्थ जीविताचा व द्रव्याचा अपव्यय कां करतां? तुमचे सुधारकांचे गुरु न्यायमूर्ति रानडे काय शिकवितात ते तरी जरा पहा. ते म्हणतात—स्लेटपाटीवरचें लिहिलेलें साफ पुसून टाकून नवा कित्ता घालून घेणें ही खरी सुधारणा नव्हे. जुन्या वळणांत इष्ट ती सुधारणा करून जुना वळणदार कित्ता वळविणें ही खरी सुधारणा आहे. हें तुमच्याच गुरुचें वचन धाब्यावर बसवून लोकांत हंसे करून घेऊं नका. प्राचीन सुधारणेचें पुनरुज्जीवन ही गोष्ट तुम्हाला आज स्वप्नांत पाहिलेल्या राज्यासारखी वाटेल पण ती खरोखर असंभवनीय नाहीं. साहित्य प्रसारासारखें उत्कृष्ट साधन हातीं घेऊन योग्य मार्गानें व पूर्ण निश्चयानें तुम्ही चळवळ चालविली तर गेलिक लीगप्रमाणें तुम्हांलाही यश प्राप्त होईल. केल्टिक चळवळ लवकरच आम्ही जगव्यापी करून दाखवूं अशी उमेद जर आयरिश लोक आज बाळगीत आहेत, तर तशाच प्रकारच्या आशेचा संचार तुमच्यांत कां होऊं नये? पुनरुज्जीवन पावलेल्या 'सुधारक'पत्राचे संपादक या प्रश्नाचें उत्तर देतील काय?

## War Relief Fund.

( AMRAOTI, CONCERT )

A successful concert was held at Amraoti on 4th November in aid of the War Relief Fund under the patronage of the Hon. the Chief Commissioner. Mr. Fitzgerald and Colonel Sergant, Instructor Goodchild N. V. R. Rao Sahib Angal and Rao Sahib Brahma who were responsible for the arrangements spared no pains to make the concert a success, and with the assistance of local talent and with the very kind co-operation of several ladies and gentlemen from Akola they provided a various programme calculated to appeal to both the European and the Indian sections of the audience. Great enthusiasm was aroused by the topical allusions in Mr, Seaman's song "The Day" and "Back to the land" composed and sung by himself. The concert concluded with the playing of the National Anthems of Belgium, France and Russia by the Police Band, & the singing of the National Anthem by the audience.

The net proceeds amounting to Rs. 431/-have been handed over to Mrs, Standen for the "Soldiers and Sailors warm clothing Fund" Several articles of warm clothing are issued to the Army & Navy by Government. But they will wear out faster than they can be replaced by Government, and on the principle that prevention is better than cure, private efforts can be as usefully applied, to supplement the Official organization, in this department, as the provision of Hospital comforts. The sum subscribed upto date is Rs. 831/-

Subscriptions will be thankfully received and acknowledged.

Hon. Treasurer the Agent Bank of Bombay, Amraoti, will kindly receive all payments made towards this fund.

## तुर्कस्थानशीं युद्ध.

जर्मनीच्या चिथावणीला भुलून तुर्कस्थानानें इंग्लंड, फ्रान्स व रशिया याच्याशीं युद्ध सुरू करण्यांत अतिशय मूर्खपणा केला असेच उद्गार चोहोंकडून मुसलमानांच्या तोंडून ऐकूं येत आहेत. हिंदुस्थानांत बहुतेक ठळक ठळक मुसलमान वस्तीच्या शहरांतून इंग्रजांविषयीं राजनिष्ठा आणि तुर्कस्थानाविषयीं तिरस्कार प्रदर्शित करणाऱ्या सभा झाल्याच्या खबरा येत आहेत. खुद्द तुर्कस्थानच्या मंत्रिमंडलांत ही तुर्कस्थानच्या या मूर्खपणाच्या कृत्याचा निषेध करणारा एक पक्ष आहे असें कळतें. जर्मनी आज आपला मतलब साधण्यासाठीं इसापनीतींतल्या माकडाप्रमाणें तुर्कस्थानला पुढें करून त्याच्या हातून विस्तवांत हात घालवीत आहे. पण तुर्कस्थानचे बोटें भाजल्याशिवाय राहणार नाहींत, आणि त्याची सत्ता नामशेष करण्याचा ईश्वरी संकेत स्पष्ट दिसत आहे असें खुद्द विचारी मुसलमान कबूल करीत आहेत. ज्या जर्मन बादशहानें आज तुर्कस्थानशीं मैत्री करून त्याला द्रव्यसाह्य करण्याचें व दारुगोळा आणि लष्करी व आरमारी आफिसर यांचा पुरवठा करण्याचा पत्कर घेतला आहे त्याच्या मनांत तुर्कांविषयीं कितीसें प्रेम आहे तें पूर्वीं अनेक प्रसंगीं दिसून आलेंच आहे. तुर्कस्थानला पुढें करण्यांत जर्मनी मोठाच मतलब साधणार आहे. त्याच्याकडून ब्रिटिश सत्तेचा ईजिप्त व हिंदुस्थान यांत नाश

करवावा असा त्याचा बेत आहे हिंदुस्थानांतके मुसलमान धर्मवेडे असल्यामुळें ते सुलतानाला मदत करतील व त्यामुळें हिंदुस्थानांतल्या ब्रिटिशसत्तेला धोका पोंचेल असा हिशोब करून जर्मनीनें हा कावा लढविला आहे. पण हिंदुस्थानांत निजाम, आगाखान प्रभृति मुसलमान संस्थानिक, धर्मगुरु व पुढारी यांच्या राजनिष्ठेच्या उद्गारावरून तो जर्मनीचा अजमास खास चुकलेला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तुर्कस्थानकडुन हें कार्य झालें नाहीं तर खुद त्यालाच पादाक्रांत करून जर्मनीनें आपल्या मित्राच्या घरांत कायमचें ठाणें दिलें नाहीं ह्मणजे मिळविलीं ह्मणावयाचें. या नाहीं त्या प्रकारें जर्मनी आपला फायदा करून घेणार हें निश्चित आहे. पण हा जर्मनींचा कावा न समजण्याइतके तुर्की मुत्सद्दी खुळे किंवा अंध कसे झाले आहेत हेंच कळत नाहीं.

---

## महायुद्धाची मीमांसा.

**(ग्रेटब्रिटनच्या भीष्माचार्याचा नागरिकांस संदेश.)**

मागील अंकावरून पुढें चालूं.

आणि अशावेळीं हें युद्ध मिटवावे ह्मणून इंग्लंडनें

### कृष्ण शिष्टाई

ला प्रारंभ केला. आणि सर्व प्रकारें पराकाष्ठा करून पाहिली आणि शेवटीं बेलज्यम व लक्झेंबर्ग या दोन स्वतंत्र राष्ट्रांमधून त्यांच्या इच्छेविरुद्ध आपलीं सैन्यें नेतां येणार नाहींत आणि या दोन्ही स्वराष्ट्रांच्या हक्काची पायमल्ली जुन्यातहनाम्यान्वयें करिता येत नाहीं हें जर्मनीस मोठें कोडें पडलें. आणि या कोड्याचा उलगडा करितांना जर्मन इंपीरियल चान्सेलर ह्मणाले कीं लक्सेंबर्ग व बेलज्यम या दोन्ही सरकारचा मज्जाव न्याय्य खरा परंतु ह्यावेळेस तो बाजूस ठेवणें भाग झालें आहे. आणि आह्मी प्रांजलपणें कबूल करितों कीं हा जो अन्याय आमचे हातून होत आहे त्या बदलची नुकसानी आह्मी पुढें भरून देऊं पण ही गोष्ट आमचे अंतिम साध्य झाल्यावर करण्यांत येईल. जर्मनीची ही सर्व पूर्वीच्या तहनाम्याला तिलांजलीच होय. आणि ह्मणूनच इंग्लंडच्या सर एडवर्ड ग्रेसेल यांचा शिष्टाईचा न्यकार करितांना जर्मन चान्सेलरनी सांगीतलें कीं तटस्थपणा (Neutrality) हा पोकळ शद्ब आहे आणि तहनामे ह्मणजे कागदाचे चिटोरे होत. शिष्टाईच्या भागापैकीं दुसरा एक भाग असा होता कीं राष्ट्राची परिषद भरवावी आणि त्यामध्यें आस्ट्रिया व प्रशिया यांचा प्रश्न निकालास लावावा. जर्मनीला राष्ट्रांच्या परिषदेसारखा यांत्रिक दाब नको होता ह्मणून तत्काळ त्याही गोष्टीला जर्मनीनें नकार सांगितला. जर्मन सैन्याला बेलजियममधून मार्ग देणें ह्मणजे बेलजियमला आपला तटस्थपणा मोडून कोणत्यातरी एका युद्धपक्षाला हार गेल्यासारखें झालें असते. अतएव लढाई हीच जर्मनीला उक्त दिसली आणि ती त्यांनीं आरंभिली. इंग्लंडला ही लढाई सुरू झाल्यानंतर आपले पूर्वीचे तहनामे यांना मान देऊन बेलजियमच्या संरक्षणार्थ व फ्रान्सच्या मदत करण्यासाठीं या लढाईत पडणें भागच झालें. चक्रवर्ती बादशहाचा संदेश जो आह्मी पूर्वींच छापलेला आहे त्या प्रमाणेंच ब्रिटिश राष्ट्र लढाईत पडलें, कां का प्रथमतः त्यांना पूर्वींचीं अभिवचनें पाळावयाचीं आहेत आणि दुसरें जो राष्ट्रांराष्ट्रांमध्यें विश्वास आहे त्याचा उच्छेद करून एका बलिष्ठ व सर्वंकर राष्ट्राला लहान लहान राष्ट्रांची पायमल्ली होऊं द्यावयाची नाहीं हें आमचें लढाईचें विशिष्ट ब्रीद होय. या भयंकर लढाईमध्यें अशा या दैवी कल्पना ब्रिटिश अंतःकरणामध्यें इतक्या जागृत राहिल्या पाहिजेत कीं या लढाईचा शेवट गोड करण्याला त्यांना आपलें द्रव्यबल आपलें बाहुबल किंबहुना आपलें आयुष्य वेंचण्याला प्रोत्साहन मिळत जाईल.

### जर जर्मनी जिंकील

तर या युद्धाचा प्रारंभ इतक्या उत्तम सत्कारणामुळें आहे व इतक्या सद्धेतूनें आहे तथापि ब्रिटिश राष्ट्राच्या अंतःकरणांत तिळप्राय संदेह नको, कीं जर्मनीचा जय ह्मणजे ब्रिटिश राष्ट्राचा न्हास होय. आणि यापुढें ही लढाई स्वतःच्या अस्तित्वासाठींच लढली पाहिजे. पूर्व शतकांतील लढायांचा अशाच प्रकारचा ऋणानुबंध दाखविण्यांत येऊन ब्रिटिश विजय ध्वनित केला आहे.

चालु शतकाच्या आरंभीं जर्मनीशीं आपला भयंकर रण संग्राम सुरू झाला आहे. आणि जर बेलजियम जर्मनीचे ताब्यांत राहील तर हॉलंड स्विट्सर्लंड व डेन्मार्क हे जर्मन सत्तेखालीं जातील आणि मग जर्मन राज्याचा समुद्र किनारा मेमेलपासून बाल्टिक समुद्राच्या दाक्षिण किनाऱ्याच्या बाजूनें डेनमार्कला वळसा घालून थेट इंग्लिश चॅनलामध्यें येऊन भिडेल. आणि मग डेनमार्क व हॉलंड येथील मजबूत हाडा पिंडाचे खलाशी व कोळी लोक जर्मन लढाऊ आरमारावर नोकर होतील. आणि तसें झालें तर आपणास जर्मन आरमाराशीं टक्कर देणें हल्लींपेक्षां पुष्कळच कठीण जाईल. याचा परिणाम शेवटीं हाच कीं आरमारावरील ब्रिटिश वर्चस्व जर्मनीचे हातांत जाईल आणि इंग्लिश चॅनलमध्यें जर्मन सैन्य अगदीं सहज रीतीनें येऊं जाऊं लागेल. सारांश जर्मनीचा विजय ह्मणजे फ्रान्स राष्ट्राचा अवश्यक चुराडा होईल आणि मग लष्करी व आरमाराचा वाढणारा बोजा आपणाला सहन करितां आला नाहीं ह्मणजे साहजीकच आपलें राष्ट्र अगदीं तिसऱ्या वर्गाच्या दर्जाला येऊन आपणास केसरपुढें मान पदोपदीं खालीं लववावी लागेल.

राष्ट्राराष्ट्रांची त्रिकूटें ही परस्परांस आपल्या मर्यादेच्या आंत ठेवीत आहेत तों पर्यंतच ब्रिटिश आरमाराचें साम्राज्य स्थिर राहील. आणि या समुद्रावरील साम्राज्यामुळेंच सातासमुद्रापलीकडे देखील लांबलेल्या ब्रिटिश राज्याची खबरदारी ग्रेट ब्रिटनला घेतां येत आहे. सगळ्या जगाच्या एक पंचमांश भागावर प्रसृत असलेल्या ब्रिटिश राज्याचे ग्रेटब्रिटन हें हृदयच होय. आणि अर्थातच जगांतील पांच माणसामागें एक एक माणसाचा संरक्षणाचा बोजा ग्रेटब्रिटननें आपले माथीं घेतला आहे. जर्मन राष्ट्र ह्मणतें कीं इंग्लिश राष्ट्र ॲटलास राक्षसाप्रमाणें अगदीं जेरीस आलें आहे. त्याला त्याचे बोजाचा कंटाळा आला आहे. तेव्हां आह्मी ब्रिटानियाच्या हातून ही सत्ता हिसकावून घेऊन जगाला नव्या बाणेदार राष्ट्रानें कसें हे सप्त समुद्राचें राज्य चालवितां येतें हें दाखवून देऊं. आह्माला साम्राज्याचा भार वाहतां येत नाहीं हा आरोप निराधार आहे. जगभर ज्या ब्रिटिश वसाहती पसरल्या आहेत हे ब्रिटन लोक किती तरी साहसी जोमदार व समृद्ध आहे याची कल्पना करितां येईल. कॅनडा ऑस्ट्रेलिया न्यू झीलंड इकडे पहा ह्मणजे वाग्स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व धर्मस्वातंत्र्य हीं कोणत्याही लोकसत्तात्मक राज्यांत इतक्या उत्कृष्ट प्रमाणावर दिसून येणार नाहीं. ब्रिटनचें अंगभूत पाणी पाहण्याची वेळ लॉर्ड किचेनर यांनीं दहा लक्ष सैन्य उभे करण्याचें मनांत आणतांच दिसून आली. तत्काळ तरुण उत्साही नवीन जोमाची अशी मंडळी पांच लक्षांवर जमली आणि थोड्या आठवड्यांतच त्यांची सेना तयार झाली. आणखी पांच लक्ष सैन्य लवकरच तयार होईल असा रंग आहे.

### जुना लौकिक

ब्रिटिश लोकांचा जुना लौकिक इतिहास प्रसिद्ध आहे. जेथें जेथें ब्रिटिश वसाहती स्थापन झाल्या तेथें तेथें त्यांस राज्यकारभाराचा पूर्ण हक्क व पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें. आणि त्या त्या कॉलनीवाल्यांनीं चांगल्या राज्यकारभाराचा लौकिक कायम ठेविला आहे. हिंदुस्थानांत सर्व सत्ता जरी ब्रिटिश पार्लमेंटाच्या हाताखालीं आहे तरी देशाची अभिवृद्धि व आबादानी इतकी उत्तम करण्यांत आली आहे, तसेंच जीवित व धन दौलत ही इतकीं सुरक्षित आहेत, आणि लोकांच्या धर्म समजूती व सामाजिक रीतिभाती यांच्याबद्दल इतका आदरभाव व ताटस्थ्य ठेवण्यांत येतें कीं सर्व राष्ट्रांतील लोक त्याबद्दल इंडियांतील ब्रिटिश कारभाराचा एकच धन्यवाद गातात. रशिया फ्रान्स जर्मनी अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या सर्वांचा अभिप्राय असाच गौरवदर्शक आहे. यावरून हें निश्चित आहे कीं ब्रिटिश लोक आपलें स्वीकृत कर्तव्य करण्यांत थकणार नाहीं, किंवा तें आपल्या शिरीं घेतलेला कार्यभाग वाहण्यास नामर्द नाहीं. नायगेरिया, सौडन, ऱ्होडेशिया, ब्रिटिश पूर्व आफ्रिका येथील नव्या कारभारा कडे दृष्टी फेंकिली तरी देखील खात्री होण्या सारखी आहे. लढाई सुरू झाल्यानंतर गेल्या थोड्या आठवड्यांत जेथें जेथें यूनियन जॅकचें निशाण फडकत होतें तेथून थोडा अनाज इतर लढाईचीं उपसाहित्यें हीं ओतप्रोत पाठविण्यांत आलीं. इतकेंच नव्हे तर आपले देह धारातीर्थी अर्पण करण्यासही तरुण तरुण मंडळी रणसंग्रामीं येऊन दाखल झाली. या लढाईच्या वेळेला हिंदुस्थानचें राजपुत्र आपल्या वैभवशाली लष्करी लवाजम्यानिशीं युरोपच्या कुरुक्षेत्रावर येऊन ब्रिटिश राज्यासाठीं लढण्यास उभे राहिले. या पेक्षां अंतःकरणाची निराळी राजनिष्ठा ती कोणती आणि आपच्या साम्राज्याच्या कारभाराच्या लायकीबद्दल आणखी कोणतें निराळें सर्टीफिकेट असूं शकेल?

शेवटीं लॉर्ड रॉबर्टस मोठ्या कळकळीनें व आत्मप्रत्ययानें सांगतात कीं हल्लींच्या युद्धप्रसंगीं ब्रिटिश लोक निश्चयानें लढतील इतकेंच नाहीं तर विजयी होईपर्यंत लढतील अशी त्यांना पूर्वींच्या इतिहास परंपरेवरून खात्री वाटते.

### निषेध.

सर्वस्व अर्पण करणाऱ्या ब्रिटिश लोकांना उपदेशून लॉर्ड रॉबर्ट्स यांनी कोणत्या गोष्टी अवश्य टाळाव्या याबद्दल फार मार्मिक उपदेश केला आहे.

१ कांहीं लोकांच्या अशा कल्पना आहेत कीं एकदा लढाई संपली ह्मणजे या पलटणी व आरमारें एकदम कमी करण्यांत येतील. पण ही चूक आहे. जगाच्या इतिहासांत असें कधीं घडलेलें नाहीं आग विझविणाऱ्या बंबाची संस्था आग संपली ह्मणून ती मोडून तोडून टाकीत नाहींत किंवा पोलिसांनी डाकेखोर पकडले ह्मणजे पोलीस पलटण कांहीं काढून टाकीत नाहींत. तोच न्याय लष्कर व आरमार यांना लागूं पडतो.

२ लष्करांत किंवा आरमारांत राष्ट्रांतील प्रत्येक तरुणानें कांहीं दिवस तरी चाकरी केलीच पाहिजे हा जो नियम आहे तो या लढाईनें अजिबात बंद केला जाईल. या नियमाचें जर्मनीनें जरी मर्यादे पलीकडे अवलंबन केलें तरी या नियमान्वयेंच फ्रान्स व रशिया या राष्ट्रांस लढाईचे आरंभीं जोरानें तोंड देतां आलें. सहा कोट सहा लक्ष जर्मन हल्लीं समरांगणीं विजयाची कांस धरून उभे आहेत तेव्हां अशा बलाढ्य राष्ट्रानें सामर्थ्य कमी समजूं नका.

३ जर्मनीला त्यांच्या राज्याच्या मध्यस्थानीं मागें परतविल्या नंतर जर्मनीला जेरीस आणण्याचें काम पुढें आहे आणि तें मोठ्या प्रमाणावरचें आहें हें लक्षांत ठेवा.

४ शत्रूबद्दल कोणत्याहि रीतीनें तिरस्कार बुद्धि दर्शवूं नका. तसें करणें हें युद्धनीती विरुद्ध आहे. बोअर युद्धाचे वेळीं किचेनरनें अशी चूक केली होती. आपण आपलें सर्व लक्ष्य व सर्व शक्ति शत्रूचा पाडाव करण्याकडे एकाग्रतेनें लावावीं. सैनिकांनीं आपलें वर्तन अगदीं उदात्त ठेवावें. विक्रमशील असावें आणि ब्रिटीशसैन्याविषयीं लॉर्ड राबर्टस् अभिमानानें लिहितात कीं रणभूमीवर त्यांचे वर्तन योध्याला शोभेल असें असतें व इतरत्र गृहस्थाच्या शिष्टाचाराला अनुरूप असें असतें. इंडियन सैन्याविषयीं हि मी अशीच उमेद बाळगतों. ब्रिटिश सैन्याचा नैसर्गिक हा एक विशेष गुण आहे कीं ते शत्रूशीं विलक्षण तऱ्हेनें लढतात. आणि शेवटीं ते शत्रुभावांत रहात नाहींत. ब्रिटिश सैन्याची ही युद्धकला अशी सुंदर आहे कीं ज्या शत्रूंना ते

जिंकतात त्यांना ते आपण मित्र करून घेतात. उदाहरणार्थ १८९२ चे सुमारास शीख लोकांबरोबर लढाई केली आणि १८९७ चे बंडाचे वेळीं याच शीख लोकांनीं बंडखोरांचा बीमोड केला. १८८० चे सुमारास अफगाण लोकांबरोबर फार निकराची लढाई झाली परंतु पुढे पांचच वर्षांनी ब्रिटिश लोकाबरोबर हेच अफगाण लोक रशियाचे विरुद्ध लढण्यास तयार होते. दक्षिण आफ्रिकेंतली डचमंडळी थोडयावर्षांपूर्वी ब्रिटिश लोकांविरुद्ध घनघोर लढली पण तीच डचमंडळी ब्रिटिश सैन्याच्या बाजूलाबाजू देऊन जर्मनी विरुद्ध लढत आहेत.

## न्यायदृष्टी ठेवा

जर्मन सैन्याविरुद्ध जसे दोषारोप आणण्यांत येत आहेत तसले दोषारोप दक्षिण आफ्रिकेच्या लढाईंत आपणा विरुद्ध आणण्यांत येत होते, पण तें पुढे किती तरी खोटे निराधार व अमानुष ठरले. जर्मनीच्या विरुद्ध असलेले दोषारोप खरे असोत किंवा खोटे असोत आपण आपले पवित्र रहावे आणि जर्मनी विरुद्ध लढतांना आपण अशा रीतीने वागलें पाहिजे कीं जर्मन लोकांच्या मनांत चहा व आदरभाव उत्पन्न होईल.

ही लढाई ह्मणजे राष्ट्रावरील आपदा न होता कदाचित् 'प्रसाद चिन्ह' च ठरेल. जर या लढाईमुळें आपले लोक हे शिकतील कीं राज्य ह्मणजे कांहीं आपल्या फायद्यासाठीं मताच्याच जोरावर ओरबडून घेण्याचें झाड नव्हें तर राज्य ह्मणजे सर्व कल्पना साम्राज्याचा विराट पुरुषच होय आणि त्याच्या साठीं जेव्हां जेव्हां प्रसंग येईल तेव्हां तेव्हां त्याच्यापुढ आह्मी आपले प्राणही अर्पण करण्यास तयार राहूं.

वरील राष्ट्रकल्पना आपल्या जुन्या आर्य राष्ट्रपुरुषाच्या कल्पनेहून कांहीं निराळी नाहीं पण हल्लींच्या आर्थिक व व्यावहारिक संपदाकडे डोळे फिरविणाऱ्या आपल्या लोकांनीं फील्ड मार्शल रॉबर्ट्स यांची ही कल्पना पुन्हा जागृतपणें मनापुढें सदोदित ठेवावी, ह्मणजे साहजीकच व्यक्तींव्यक्तींच्या आयुष्यापेक्षां सामाजीक व राजकीय आयुष्यें कांहीं निराळीं आहेत असें ध्यानांत येईल आणि या निराळ्या आयुष्यांच्या यात्रे साठीं नागरिक या नात्यानें व्यक्तिमात्राचें कर्तव्य किती तरी उच्च पवित्र व पावनकारक आहे.

---

## (वऱ्हाडांतील शिक्षक मंडळीचें वार्षिक संमेलन)

मे. कुळकर्णी साहेब इनचार्ज इन्स्पेक्टर ऑफ् स्कूल्स वऱ्हाड यांचे अध्यक्षतेखालीं मु. अकोलें येथें ह्या संमेलनास सोमवार ता० ९ नोव्हेंबर रोजीं दोन प्रहरीं १२ वाजता सुरुवात झाली. पुलाजवळील आंग्लो उर्दू शाळेंत संमेलन भरविलें असून शिक्षक मंडळींची उतरण्याची व्यवस्था स्टेशन नजीक हायस्कूल बोर्डिंग मध्यें केलेली होती. या मजकूरच्या संमेलनांत फक्त निरनिराळ्या हायस्कुलांचे हेडमास्तर, आंग्लो व्हरनॅक्युलर शाळांचे हेडमास्तर व डेप्युटी व सबडेप्युटी इन्स्पेक्टर्स, एवढ्याच मंडळींचा समावेश करण्यांत आला होता. सुरवातीस सर्व मंडळी उभी राहून नॅशनल अँथेम-राष्ट्रीय गीत-गाण्यांत आलें नंतर मेहेरबान कुळकर्णी साहेब यांचें प्रास्ताविक भाषण झालें. ते ह्मणाले 'आजच्या या समारंभास मे. म्याकनी साहेब नाहींत ही दिलगिरीची गोष्ट आहे परंतु ते ज्या कामावर गेले आहेत तें ह्याहीपेक्षां जास्त महत्वाचें आहे ही गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे. परमेश्वरानें त्यांस यश देऊन पुनः आमच्यांत आणावें अशी इच्छा प्रदर्शित करून त्यांनीं संमेलनास लांबलांबच्या ठिकाणाहून त्रास व दगदग सोसून आलेल्या शिक्षक मंडळींचे आभार मानिले व आपण सर्व मिळून संमेलनाचें काम योग्य रीतीनें पार पडूं अशी आशा प्रदर्शित करून आपले परमपूज्य बादशहा यांचा हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व लोक यांस पाठविलेला संदेश वाचून दाखविला. व या युरोपांतील युद्धांत आपल्या बादशहांची बाजू सत्याची व न्यायाची असल्यामुळें जेथें सत्य व न्याय तेथेंच परमेश्वर व तेथेंच जय असतो हें सांगून त्यांनीं आपलें प्रास्ताविक भाषण संपविलें.

नंतर संमेलनाचे सेक्रेटरी यांनीं संमेलनाचा रिपोर्ट वाचून दाखविला त्यावरून ही संस्था सर्वतोप्रकारें समाधानकारक रीतीनें चालत आहे असें दिसून आलें.

नंतर शेगाव स्कूलमधील असिस्टंट टीचर मि. जामकर यांनीं पहिल्या यत्तेच्या मुलांस प्रेपोझीशन्सचा धडा शिकविला. विद्यार्थ्यांस काय येतें आहे व काय शिकवावयाचें आहे याच्या पद्धतवार नोट्स छापून त्याच्या प्रती सर्व प्रेक्षकांस देण्यांत आल्या होत्या. शिकविण्याची पद्धति चांगली दिसून आली परंतु एकंदर धडा हा नवीन धडा नसून झालेल्या धड्याच्या उजळणीप्रमाणें दिसून आला. विद्यार्थ्यांना प्रथम एक वाक्य नवीन शब्द घालून तयार करावयास लावून त्याच धर्तीवर दुसरीं वाक्यें तयार करावयास लावावयाचें हें तत्व पहाणाराच्या निदर्शनास स्पष्टपणें आलें नाहीं.

'वर्गांत मुलांनीं कसें बसावें याचा आरोग्यदृष्ट्या विचार' या विषयावर मि. मुनशी असि. टीचर ए. व्ही. स्कूल उमरावती याचा निबंध आमच्या मतें फार विचारणीय दिसला. शाळातून हल्लीं जीं बाकें व डेस्कें व अगदीं नवीन दिलेलीं कांबिनेशन बाकें ही आरोग्यास परिपोषक नाहींत हें मि. मुनशी यांनीं सप्रमाण दाखवून दिलें. वर्गांत उभे रहाण्यांत व लिहिण्याचे वेळीं काय काय दोष उत्पन्न होतात व ते कसे टाळतां येतील याचें निबंधलेखकांनीं सचित्र विवेचन केलें असून तें सशास्त्र ही होतें अशी आमची समजूत आहे. तरी सदरहू गोष्टीकडे शाळाखात्याचें जितकें लवकर लक्ष जाईल तेवढें बरें.

नंतर वाद विवादास सुरवात झाली. हायस्कूल स्कॉलरशिप परीक्षे संबंधीं बऱ्याच महत्वाच्या सूचना संमेलनापुढें आल्या होत्या त्या अशा कीं—

(१) परीक्षा घेण्याचे सेंटर्स कमी करावे

(२) परीक्षा डेप्युटी इन्स्पेक्टर्सनीं घ्यावा.

[३] ज्या शाळांतून या परीक्षेस विद्यार्थी बसतील त्या शाळांशीं संबंध असलेल्या कोणाही मनुष्यास परीक्षक नेमूं नये.

[४] इतिहासाचीं उत्तरें मराठींत लिहिण्याची मोकळीक असावी.

[५] ड्राइंग हा विषय ऐच्छिक असावा.

[६] यापरीक्षेत नेमिलेल्या पदार्थ विज्ञान शास्त्रापैकीं प्रकाश, विद्युत्त आणि विद्युदाकर्षण हा भाग काढून टाकण्यांत यावा.

(७) परीक्षेचा खुलासेवार निकाल शाळांस पुरविण्यांत यावा.

ह्या सर्व प्रश्नांवर बरीच मवति न भवति होऊन फक्त शेवटची सूचना पास झाली व बाकी सर्व बाबतींत हल्लीं आहे त्याच प्रमाणें अभ्यासक्रम चालू ठेवावा ह्मणून ठरलें.

या नंतरची सूचना आमच्यामतें बरीच चमत्कारिक होती. एखादा विद्यार्थी सर्व वर्षभर आठवड्याच्या परीक्षेंत नापास होत असून फक्त वार्षिक परीक्षेंत पास झाल्यास त्यास वरचे वर्गांत घालूं नये अशा प्रकारची ही सूचना संमेलनानें पास केली नाहीं हें आमच्यामतें अगदीं योग्य तेंच झालें.

इतकें काम सुमारें पावणेचार वाजेपर्यंत आटोपलें. नंतर श्रीराम थिएटरांत डा० भणगे यांचें व्याख्यान ऐकण्यास जातां यावें ह्मणून संमेलनाचें काम पुरें करण्यांत आलें. डा० भणगे यांचे व्याख्यानाचा विषय 'फर्स्ट एड टु धी इंजर्ड' ह्मणजे 'दुखापत अगर अपघात झाल्यास तात्कालिक उपायांची योजना' हा होता. अध्यक्षस्थानीं डा० कॅपटन् फाउलर सिव्हिलसर्जन हे होते. व्याख्यात्यांनीं प्रारंभीं फर्स्टएड ह्या विषयाचें महत्व सांगून त्याचा प्रारंभीपासूनचा सर्व इतिहास त्यांनीं थोडक्यांत सांगितला. ते ह्मणाले "युरोपच्या इतिहासाकडे पाहिलें ह्मणजे इ० स० च्या अकराव्या शतकापर्यंतच्या काळाला मध्ययुग असें ह्मणतात या काळांत ज्या लढाया होत असत त्या लढायांत जखमी झालेल्या माणसांची पद्धतशीर निगा करण्याची बिलकूल व्यवस्था नसे. जखमी झालेल्या माणसाचे कोणी आप्तेष्ट असतील त्यांनीं त्याची व्यवस्था केली तर ठीक नाहींतर त्यांनीं स्वस्थ आकाशाकडे पहात पडून राहावें अशी स्थिति होती. येशूख्रिस्ताची जन्मभूमि जें जरुसलेम शहर तें मुसलमानांचे अंमलाखालीं असल्यामुळें युरोपखंडांतून जे ख्रिस्ती लोक जरुसलेम येथें ख्रिस्ताचे थडग्याचे दर्शनाकरितां जात त्यांस मुसलमान लोक अत्यंत त्रास देत. याचा परिणाम असा झाला कीं युरोपांतील ख्रिस्ती व आशीयातील मुसलमान यांचीं भयंकर युद्धें होऊं लागलीं. या युद्धांस युरोपच्या इतिहासांत क्रूसेड्स असें नांव आहे. या युद्धांत जे ख्रिस्ती लोक जखमी होत त्यांची शुश्रूषा करण्याचे हेतूनें 'नाइटस् ऑफ सेंट जॉन' या नांवानें एक धार्मिक संस्था स्थापन झाली. लढाईच्या स्थळीं जाऊन दुखापत झालेल्या माणसांस शक्य ती मदत व औषधोपचार करण्याचा अशा रीतीनें पद्धतशीर उपक्रम सुरु झाल्यावर ह्या संस्थेचें महत्व लोकांस दिसून आलें व त्याचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत जाऊन केवळ लढाईच्याच वेळीं नव्हे तर हरएक संकटाच्या वेळीं दुखितांस शारीरि[क] शुश्रूषेच्या रूपानें सहाय्य करण्याकरितां 'सें[ट] जॉन्स अँब्युलन्स असोसिएशन' या नांवाच[्या] संस्थेच्या शाखा सर्व जगभर स्थापन क[र]ण्यांत आल्या आहेत व येत आहे[त]. आपल्या हिंदुस्थान देशां[त] ह्या संस्थेची पहिली शाखा सन १८८[…] साली मुंबई शहरांत स्थापन झाली प[रंतु] सन १९०८।९ सालापर्यंत या विषया[चें] महत्व कोणाच्या फारसें लक्षांत आलें नाह[ीं] तेव्हांपासून पुढें मात्र या विषयाकडे जा[स्त] लक्ष देण्यांत ये[ऊं] लागलें व आतां या संस्थेच्या मुंबई इ[ला]ख्यात व इतर ठिकाणीं मिळून सुमारें स[…] शाखा स्थापन झाल्या आहेत. फर्स्टएड [हा] विषय सेंटजान्स अँब्युलन्स असोसिएशन[च्या] जीं उद्दिष्ट कार्यें आहेत त्या पैकींच एक आ[हे.] फर्स्टएडचीं तत्वें इतकीं सोपीं आहेत [कीं] अगदीं अशिक्षित मनुष्यास सुद्धां अग[दीं] थोड्या मुदतींत तीं सहज शिकतां येती[ल.] पुष्कळ वेळां असें होतें कीं अपघात झालेली इजा अगदीं थोडी असून ही केव[ळ] अज्ञानामुळें अनर्थ होतो. ॲनीबिझांट यां[स] लंडन शहरांत रस्त्यांत एकदां एक ब[…] अगदीं वेळेवर सहाय्य मिळाल्यामुळें आप[ण] हातून वांचली व तसल्याप्रकारचें सहा[य्य] मिळालें नसतें तर निःसंशय तिची इहलोकां[तून] रवानगी झाली असती, अशी एक स्वानुभवा[ची] गोष्ट लिहिली आहे. हल्लीं मुंबई युनिव्ह[र्सि]टीनें फर्स्टएड हा विषय मॅट्रिक्युलेशन [व] स्कूल फायनल ह्या दोन्ही परीक्षांत ठेवि[ला] आहे. तरी असल्या महत्त्वाच्या विषया[कडे] लोकांचें विशेषतः वऱ्हाडांतील लोकांचें [लक्ष] लागावें ह्मणून मी आकोलें येथें फर्स्टएड[चा] क्लास सुरू केला असून त्यांत हल्लीं स[…] विद्यार्थी शिकत आहेत."

व्याख्यात्यांनीं नंतर फर्स्टएडच्या शिक्षण[ास] स्पेशल असें कांहींच लागत नसून साधारण उपयो[गी] असलेल्या वस्तूंपैकींच अ[…] थोडक्या श्रमानें व थोडक्या वेळ[ांत] फर्स्टएडला उपयोगी सामान कसें बन[वितां] येतें हें प्रत्यक्ष आणिलेली आराम [खुर्ची] व साधी खुर्ची व स्ट्रेचर ह्मणजे [उपा]य करून निजविलेल्या रोग्यास त[…] उचलून नेण्याचें साधन यां वरून दा[खवून] दिलें. व्याख्यात्यांनीं नंतर सांगित[लें कीं] माहिती ही शिक्षण स्वरूपाची असल्या[मुळें] ती आह्मीं थोडक्यांत देत नाहीं.

डाक्टर भणगे यांचें व्याख्यान [सुमारें] सवासात वाजतां आटोपलें.

संमेलनाच्या कामास मंगळवार ता० [१०] नोव्हेंबर रोजीं १२ वाजतां पुनः सु[रुवात] झाली. प्रारंभीं यवतमाळ हायस्कूल[चे] असि. टीचर मि. कुळकर्णी यांनीं '[…] ह्या विषयावर धडा शिकविला. [शाळेंत] असलेली 'रोटरी, [सूर्य मालेचा यांत्रिक सांग[ाडा] बिघडलेली असल्यामुळें, पृथ्वीच्या व चंद्राच्या कक्षेचा असलेला पांच डि[ग्री]चा कोन नीटपणें दिसून येत नाहीं, त्यामुळें धडा शिकवितांना थोडी अ[डचण] पडेल अशी प्रस्तावना करून मि. कुळ[कर्णी] यांनीं धडा शिकविण्यास सुरुवात

त्यांचा शिकविण्याची पद्धति आमच्या मतें चांगली होती. मात्र वर निर्दिशित केल्या प्रमाणें ग्रहणाच्या धड्यांतील मुख्य भाग—व दरमहिन्यास ग्रहणें कां लागत नाहींत हें मुलांस समजण्याचें जें मुख्य साधन तें दूषित असल्यामुळें शिकविलेला धडा ही थोडासा दूषितच झाला.

नंतर उमरावती हायस्कुलांतील असि. टीचर रा. गडकरी यांनीं हायस्कुलांतील शिक्षण देशी भाषांच्या द्वारें देण्यासंबंधीं विचार ' ह्या विषयावर आपला निबंध वाचला. ह्या विषयासंबंधानें विद्वान माणसाच्या तोंडून जे जे विचार ऐकूं येतात ते ते सर्व विचार एकत्र करून अशा पद्धतीनें शिक्षण देण्या-पासून काय काय फायदे होतील ह्याचें रा. गडकरी यांनीं आपल्या निबंधांत मुद्दे-सूद विवरण केलें होतें. पुणें येथील न्यु इंग्लिश स्कूलमध्यें इंग्लिश सहावे यत्तेपर्यंत सर्व शिक्षण देशी भाषेंत देऊन नंतर सहावी व सातवी या दोन्ही यत्तांत इंग्र-जीच्या द्वारें शिक्षण द्यावयाचें अशा तऱ्हेचा एक प्रयोग विवक्षित वर्ग घेऊन सुरू कर-ण्यात आला आहे. त्या प्रयोगासंबंधानें अद्यापि निकाल झाला नाहीं. परंतु रा. गडकरी यांचे मतें सर्वच शिक्षण देशी भाषातून देऊन परीक्षेच्या स्वरूपातही त्या त्या प्रमाणें फेरफार करण्यात यावे.

मि. गडकरी यांची सूचना इतकी महत्वाची आहे कीं सर्व देशातील विद्वान लोक या विषयाची रात्रंदिवस चर्चा करीत आहेत. नुसत्या परीक्षेचें स्वरूप बदलावें लागेल इतकेंच नव्हे तर शिक्षण प्रयही ह्याप्रकारचे नवीन निर्माण करावें लागतील ही गोष्ट अशक्य मात्र नाहीं परंतु सरका-रचा पूर्ण पाठिंबा मिळाल्याशिवाय नतत्या लोकमताच्या जोरावर ही गोष्ट घडून येणें शक्य नाहीं. मुंबई युनिव्हर्सिटीनें सर्वांत उच्च दर्जाची जी एम. ए. ची परीक्षा त्यात देशी भाषांचा समावेश करून देऊन देशी भाषास गौरविलें आहे. तरी संमेलनापुढें अशा रीतीनें ह्या विषयाची साद्योपांग मांडणी केल्याबद्दल रा. गडकरी यांचें आम्ही मनःपूर्वक अभि-नंदन करितों. ह्यापुढील चर्चेचा विषय म्हणजे मराठी शाळांतील अनट्रेंड शिक्षकांना ट्रेनिंगचें सार्टिफिकेट देण्यासंबंधीं होता. मराठी शाळां-तील अनट्रेंड शिक्षक त्यांना प्रमोशनची आशा नसल्यामुळें बऱ्याच अंशीं सुस्त असतात. तरी ह्या वर्गापैकीं जी हुषार माणसें आहेत त्यांना पुढें येण्याकरिता कांहीं तरी मार्ग खुला करून दिला पाहिजे. ह्याहिपेक्षां जास्त महत्वाची गोष्ट म्हणजे डिपार्टमेंटला अशा रीतीनें असलेल्या माणसातूनच जास्त चांगल्या पद्धतीनें शिकविणारी माणसें निर्माण करितां येतील. सहावी यत्ता पास झालेला मनुष्य कितीही हुषार असला तरी ट्रेंड माणसांची योग्यता त्याला येत नाहीं. व सर्वच शिक्षक ट्रेंड मिळणें शक्य नाहीं. अकोलें येथें आता लवकरच दुसरें ट्रेनिंग कालेज निघणार आहे. त्याचे योगानें नवीन जास्त ट्रेंड शिक्षक मिळतील ही गोष्ट खरी आहे. परंतु हल्लीं नोकरींत असलेल्या अनट्रेंड इसमांची त्यापासून सोय होणार नाहीं. व डिपार्टमेंटची सुधारणा बरीच लांबणीवर पडेल. तरी अनट्रेंड शिक्षकांकरिता एक स्वतंत्र परीक्षा घेण्यांत यावी व त्यांस सर्टिफिकिटें देण्यांत यावीं. अशा अर्थाची ही सूचना रा० करमरकर डे० इ० यांनीं संमेलना पुढें मांडली.

रा० गोखले प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज उमरावती यांनीं या सूचनेसंबंधीं विशेष अडचणीची गोष्ट म्हणून अशी सांगितली कीं. अशा रीतीनें सार्टिफिकेट दिलेले शिक्षक हे ट्रेंड शिक्षकांबरोबर प्रमोशन मागतील व ट्रेनिंग कॉलेज ज्या उद्देशानें उघडलें आहे त्या उद्देशाला बरेंच गौणत्व येईल.

सेंटल प्राव्हिन्सेस मध्यें अशा प्रकारची परीक्षा अस्तित्वांत असून ट्रेंड शिक्षकांप्रमाणेंच असल्या इसमांस प्रमोशन देण्यांत येतें अशी माहिती सभेपुढें ठेवण्यांत आली.

नंतर मुंबई इलाख्यांत प्रचलित असलेल्या पद्ध-तिची माहिती रा. दांडेकर हे. मा. म्युनिसिपल हायस्कूल इलिचपूर यांनीं सांगितली ती अशी कीं अनट्रेंड शिक्षकांपैकीं ज्यांचे शाळेचे निकाल तीन अगर चार वर्षे पर्यंत सारखे उत्तम लागतात अशा शिक्षकांची ट्रेनिंगच्या पहिल्या वर्षाचे परीक्षे-स बसण्याकरिता डेप्युटी इन्स्पेक्टर यांनीं शिफारस करावी. व ट्रेनिंगचे सर्व अभ्यास शिक्षकांनीं घरींच करावे परंतु परीक्षेपूर्वीं एक महिना त्यांनीं प्रत्यक्ष ट्रेनिंग कालेजात राहून तेथील शिक्षणाचा अनुभव घ्यावा. व ट्रेंड इसमाबरोबरच परीक्षेस बसावें. अशा प्रकारें पास झालेल्या इसमांस पूर्ण ट्रेंड इसमां प्रमाणेंच लेखितात. अशा तऱ्हेनें पहिल्या वर्षाची परीक्षा पास झाल्यावर कांही ठराविक मुदतीनंतर वर प्रमाणेंच समाधानकारक निकाल वगैरे शर्तींवर अशा इसमास दुसऱ्या वर्षाचे परीक्षेस बसूं देतात परंतु त्यावेळींही कालेजमध्यें प्रत्यक्ष राहून शिक्षणाचा अनुभव घ्यावा लागतो. व याच प्रमाणें तिसऱ्या वर्षाचे परीक्षेसही बसण्यास परवानगी देण्यात येते.

ट्रेनिंगचा अनुभव थोडी मुदत पर्यंत तरी ह्या पद्धतीनें मिळतो सबब ह्या पद्ध-तीस माझें मत प्रतिकूल नाहीं असें रा. गोखले म्हणाले. नंतर हा खर्चाचा प्रश्न आहे अशीही एक अडचण पुढें करण्यांत आली. परंतु एक महिनाभर शाळा असि-स्टंट वर सोपविण्यानें मोठें नुकसान होणार नाहीं, व जास्त मुदत गैर हजेरीचा प्रश्न उद्भवल्यास डिस्ट्रिक्ट बोर्डास तो खर्च खुषीनें सोसतील असें ही सांगण्यात आलें. नंतर मुंबईप्रमाणें पद्धती इकडे सुरू करावी असें सर्वानुमतें ठरलें.

(अपूर्ण)

## वऱ्हाड आथलेटिक आसोसिएशन.

विद्यापरिषदेचें काम दुसरीकडे चालू असतांना गेल्या मंगळवारपासून निरनिराळ्या शाळाचे दरम्यान हॉकी, फुटबॉल, क्रिकेट इत्यादि खेळांमधील प्राविण्याकरिता युद्धें सुरू होतीं. हे खेळातले सामने पश्चिम वऱ्हाडांतील शाळांतून विजयी झालेले अकोला हायस्कुलचे विद्यार्थी व ए. व्ही. स्कुलचे विद्यार्थी हे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला पूर्व वऱ्हाडांतील सर्व शाळांशी सामने देऊन देऊन विजयी झालेले उमरावती येथील हिंदु व मुसलमान हायस्कुलचे विद्यार्थी आणि ए. व्ही. स्कुलचे विद्यार्थी हे उलट पक्षाला अशा दोन पक्षांमध्यें हे सामने झाले. आणि त्यामध्यें सरासरीनें गेल्या साली सार-खेच निरनिराळ्या खेळामध्यें सारखी सरशी होऊन अकोला व उमरावती येथील शाळांची समसमानता दृष्टीस पडली व ३ तीन शील्ड उमरावती व ३ तीन शील्ड अकोला अशी मिळालीं तसेंच पॅरललबार. मलखांब सिंगलबार, कुस्त्या, दांडपट्टा, टग ऑफवॉर, उंच-उडी, एक मैल, अर्धा मैल, पाव मैल, इत्यादि पळण्याच्या शर्यती गेल्या शनिवारीं झाल्या आणि त्या मधील विजयी विद्यार्थ्यांस सुमारें १०० रुपयाचीं बक्षीसें वाटण्यात आलीं. मेहेकर, वाशीम, यवतमाळ, मलकापूर येथील कांहीं विद्यार्थ्यांनाही बक्षीसें मिळविलीं आहेत ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. गेल्या शनिवारीं सायंकाळीं हें खेळाचें मैदान इतकें मनुष्यांनीं फुलून गेलें होतें कीं जिकडे तिकडे विद्यार्थ्यांना खेळण्याची ईर्षा देण्याचे जयघोष व टाळ्यांचा गजर यानीं सर्व मैदान दणाणून दिलें होतें. विद्यार्थ्यांची मौज पाहण्याला अधिकारी मंडळी व इतर धंद्यांतील सुखवस्तु मंडळी पुष्कळ जमली होती. श्रीमती सौ० स्टॅडनबाई यांच्याहस्तें बक्षीसें वाटल्यानंतर रा० स्टॅडनसाहेब यानीं विद्यार्थी मंडळीचें मोठें कौतुक केलें आणि त्याची खेळांतील स्पर्धा, विजयश्री व परस्पर आदर यांबद्दल प्रशंसा केली. अथलेटिक असोसिएशननें सुरू केलेलें कार्य इतक्या [illegible] स्वरूपाला आलेलें आहे तेंव्हां यापुढें याच पद्धतीवर निरनिराळ्या शाळामधून स्वतंत्रपणें उद्योग चालविण्याची वेळ आली आहे. बक्षीसें मिळविलेल्या पुष्कळश्या विद्यार्थ्यांनीं आपापलीं बक्षीसें लढाईच्या फंडास अर्पण केलीं या बद्दलचें अभिनंदन विशेष प्रकारचें करण्यात आलें. एकदरीनें रा० स्टॅडनसाहेब व इतर लोक. हा इतका उत्तम तंबू वगैरेंनीं श्रृंगारलेला, पुष्प हारादिकानीं विशेष शोभायमान दिसणारा व बॅंडच्या दुंदुभींनीं विशेष आल्हादकारिक वाटणारा हा समारंभ पाहून त्याच्या व्यवस्थापकांचे आभार मानीत मानीत आनंदानें घरोघर परत गेले.

---

रा. रा. श्रीधरराव भगाडे सब जज्य उमरावती यांची बदली नागपूरास होऊन रा. रा. त्रिलोकीनाथ गौर, सब जज्य यांस उम-रावती येथें बदलण्यांत आलें आहे.

वॉर रिलीफ फंडाच्या मदतीकरिता उमराव-तीस मागील आठवड्यात झालेल्या कान्स-र्टची हकीगत दुसरीकडे दिली आहे. त्याच नमुन्याचें कॉन्सर्ट आपल्या शहरीं आज रात्री ९-३० वाजतां येथील टाऊनहॉल-मध्यें व्हावयाचें आहे. वॉर रिलीफ फंडाला मदत करणें हाच या कान्सर्टचा स्तुत्य उद्देश आहे.

### शेतकी परिषद

आज पासून वऱ्हाडच्या शेतकी परिषदेचा समारंभ सरकारी शेतकीच्या प्रयोग शाळेंत भरणार आहे. आज उद्या दोन दिवस चालूं आठवड्याप्रमाणेंच येथें गर्दी उडणार आहे.

पैसा फंडाचे सुप्रसिद्ध उत्पादक रा० रा० अंताजी दामोदर काळे हे शेतकीच्या परि-षदेला आले असून त्यानीं आपली भेट म्हणून शेतकी व बागाईत हें पुस्तक सभेपुढें मांडलें आहे.


## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० क्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ६

---

## अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, सुकी, ओली खा-ज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च ' दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे , विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हा भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ९

---

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!

## स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यास पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपाति महि सोई ॥
सो हरिकृत होइ फुरजाना ॥
त्यागहु जितप्रभू आस सुजाना ॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किं पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधि एक लक्ष आणि कमींत कमी पंच रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत अ तो केवळ दोन रुपयामध्ये लाभ मि

या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यास दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अ एक कार्ड लिहून पाठवावें. ही मा-जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पा

पत्ताः– सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपु

नो. नं. ३९६


---

हें पत्र आकोलें येथें कैलासवासी ख बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचा खान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं शिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला——सोमवार तारीख २३ माहे नोव्हेंबर सन १९१४ इ० [ अंक ४५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## WANTED

For the post of a temporary teacher on Rs. 25. per month to teach the English 1st standard in the Municipal Middle Anglo – Vernacular School Malkapur.

None need apply who has not passed the Matriculation Examination with Sanscrit as his second language.

Preference will be given to one who has got some experience of the work

Applications with copies of testimonials should reach the undersigned on or before the 15 th December 1914

Sd. M. A. Khan,

Malkapur } Vice chairman
24 September 1914 } M. committee
Malkapur
(Berar)

No. No· 415

विश्वास असेल तर मागवा.

## सुगंधशाव

आज पर्यंतच्या मेंथॉल व बामवर गुणकारित्वासंबंधाची शर्थ आम्ही निकिली आहे. उष्णतेचे मस्तकाविकार, संधीवात, विंचवाचा दंश, दंत विकार इत्यादिकावर खात्रीचा इलाज. पैसे परत करण्याची थाप नाहीं. थोडेसें मस्तकाला चोळतांच सुगंधानें पुष्प वाटिकेंतच उभे असल्याचा भास होईल. किंमत कांचेच्या बाटलीस .॥. ट.ख. निराळा ६ बाटल्यास पो. ख. माफ. बाटलीवर सही पाहून घ्यावी. तयार करणार —सकळकळे ॲन्ड सन्स काब्यांचे हवेली मार्गे शहर आकोला.

नो० नं० ४४९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यांत येते कीं रा० रामचंद्रसा (ऊर्फ रामभाऊ) श्रीकृष्णसा सावजी हे बाळकृष्णसा परशरामसा सावजी ह्या नांवचें जिनफॅक्टरी व कॉटन प्रेसची र दबेवची आणि शेतीचे आमचे मलकापूर दुकानीं तसेच रा० विष्णूसा बाळकृष्णसा सावजी ह्या नांवचे आमचे मलकापूर दुकानीं व त्र्यंबकसा बाळकृष्णसा सावजी ह्या नांवचे आमचे कापड दुकानीं काम करीत होते. ते ता० ३०।९।१९१४ पासून कामावरून दूर झाले आहेत तरी वरील दुकाना संबंधीं कोणताही व्यवहार त्यांचेशी करू नये. केल्यास जोखीम त्यांची त्यास सोसावी लागेल.

सही

वर निर्दिष्ट केलेले कारखाने, दुकान, व शेती यांचे मालक गोविंदसा विष्णूसा सावजी अज्ञान पालन करणार मातोश्री यमुनाबाई भ्रतार विष्णूसा सावजी द० खु०.

नो० नं० ४९१

## नोटीस

नोटीस भगवान वा शिवराम सोनार रा० मौजे शहापूर ता० खामगांव जि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणारी कडून अशी नोटीस देण्यांत येते कीं तुमचेंपाशीं मी माझे लेकीकारितां नथ करण्यास दहा मासे सोनें दिलें आहे. त्यानंतर ती नथ तयार होऊन मिळण्याकारितां मी कित्येक वेळां तुमचे कडेस येऊन मागणें केले परंतु ती तुम्ही मला तयार करून दिली नाहीं शेवटीं मी दिलेलें सोनें तुम्हाला परंत मागितले तुम्ही सांगितलें ते माझे पाशीं राहिलें नाहीं. त्याचे ऐवजीं मी तुम्हाला त्याची सवाई धरून साडेबारा मासे सोनें देईन. त्या गोष्टीस ही आतां दोन वर्षे झाली. तरी ते सोनें मला देत नाहीं व किंमतही देत नाहीं. या करितां हल्लीं ही नोटीस तुम्हाला दिली आहे तर याव त्यापासून तुम्ही पंधरा दिवसाचे आंत सोनें अथवा त्याची किंमत बाजारभावा प्रमाणें होईल ती मला देऊन निकाल करावा व माझी पावती घ्यावी तसें तुम्ही न केल्यास योग्य कोर्टात फिर्याद करून या नोटीशीच्या खर्चा सुद्धां नुकसान भरून घेतलें जाईल. कळावे ता० १७.११-१४

सही

अहेलाबाई मर्द. महादू पावसाळे
रा० मौजे चतारी तालुका
बाळापूर निशानी खुद
हातची बांगडी

नो. नं, ४९२

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-

The National Indian Life
Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay

No. No.421

## वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष शुद्ध ६ शके १८३६

## वऱ्हाडांतील शिक्षक मंडळीचें वार्षिक संमेलन

[ मागील अंकावरून पुढें चालू ]

नंतर ची सूचना रा० प्रमुणे हेडमास्तर ए. व्ही. स्कूल दर्यापूर यांची होती. हल्लीं पहिल्या यत्तेला ॲलनचें प्रायमर दुसऱ्या व तिसऱ्या यत्तांना नेल्सनचीं पुस्तकें व चौथ्या यत्तेला न्यू रॉयल रीडर अशीं पुस्तकें आहेत. या पैकीं न्यू रॉयल रीडर हें पुस्तक 'डायरेक्ट मेथड्' ह्या पद्धतीकारितां म्हणून मुद्दाम लिहिलेलें नसल्यामुळें शिकवितांना बरीच मेहनत व बराच काळ नोट्स तयार करण्यांत जातो. तरी एक प्रथम पासून न्यूरॉयल रीडर सीरीज तरी ठेवावी अगर नेलसन सीरीज तरी ठेवावी. म्हणजे एकापुढें एक क्रमशः शिकविण्यास व शिकण्यास सोईचें होईल.

अगदीं थोड्या बहुमतानें नेल्सनचीं पुस्तकें खालपासून वर पर्यंत पहिल्या चार यत्तांत सुरू करण्याचें ठरलें.

नंतर हिंदुस्थानचा इतिहास हा विषय पहिल्या तीन यत्तांतून कान्सेंट्रिक पद्धतीनें शिकविण्यांत यावा. म्हणजे सर्व मुख्य गोष्टींचा गोषवारा सांगून कोठल्या तरी एका भागांतील विशेष माहिती सांगावी. अमुकच एका पुस्तकावर अवलंबून राहूंनये अशी सूचना वादविवादाकरितां पुढें आली. एक कमिटी नेमून त्यांनीं पहिल्या तीन यत्ता करितां एक सिलेबस म्हणजे अभ्यासपत्रक तयार करावें असें ठरलें.

यापुढील सूचना बाल्फोर स्टूअर्ट यांचे पुस्तकाचे भाषांतरासंबधें होती. दुसरें चांगलें पुस्तक नसल्यामुळें तूर्त हेंच पुस्तक कायम ठेवावें असें ठरलें.

सरदेसाई यांचें शाळोपयोगी भारतवर्ष ह्या पुस्तकाची भाषा लहान विद्यार्थ्यांस समजण्यास अवघड असून त्यांतील माहिती ही अतिविस्तृत आहे सबब त्याचे ऐवजीं दुसरें एखादें पुस्तक नेमावें अशी सूचना यानंतर पुढें आली.

भाषा कठीण असली तरी ती शिक्षकांस सोपी करितां येईल व फार विस्तृत माहिती असली तर तींतही निवडा निवड करितां येईल सबब पुस्तक आहे तें चांगलें आहे असें ठरलें.

### बुधवार ता० ११ नोवेंबर

हा संमेलनाचा तिसरा दिवस होय ह्या ही दिवशीं संमेलनाच्या कामास बरोबर बारा वाजतां सुरुवात झाली. प्रारंभीं दर्यापूर ए. व्ही. स्कूल मधील असि. टीचर मि० लेले यांनीं ' एक्सिंट—इची ' हा धडा दुसऱ्या यत्तेंतील मुलांस शिकवून दाखविला. कांहींसे जास्त बाहेरील प्रश्न मुलांस विचारण्यापलीकडे यांत कांहीं दोष आमच्या मते दिसून आला नाहीं.

नंतर उमरावती हिंदु हायस्कूल मधील असि. टीचर मि० गुर्जर यांचें ' विसाव्या शतकांतील भौतिक शास्त्राची प्रगति ' ह्या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय इतका व्यापक व विस्तृत होता कीं केवळ चाळीस मिनिटांत असल्या प्रकारचें व्याख्यान आटोपणें ही गोष्ट सर्वस्वी अशक्य होती. मि० गुर्जर यांनीं विशेषतः हल्लीं पृथ्वी, पाणी व आकाश ह्या तीन्ही गोष्टीस जिंकण्याची मनुष्य प्राण्याची कशी धडपड चालली आहे व त्यांत त्यास कितपत यश आलें आहे हें सांगण्याचा यत्न केला. थोडक्या जागेंत विशेष शक्ति सांठविण्याची युक्ति ' ग्यासोलाइन ' इंजिनें निघाल्यानें मनुष्यांस साध्य झाली. व ही शक्ति साध्य झाल्यामुळें वर लिहिलेल्या तीन ही तत्वांस जिंकण्याचा उपक्रम शास्त्रज्ञांस करतां आला. मोटारच्या सहाय्यानें पृथ्वी जिंकली गेली आहे. सबमरिन म्हणजे पाण्यांत बुडून चालणाऱ्या जहाजांच्या योगानें समुद्र जिंकला आहे व आकाश यानांच्या योगानें हवा जिंकली गेली आहे. बिनतारांच्या संदेश वाहकानें इच्छामात्रें करून हजारों मैल अंतरावरील माणसांशीं संभाषण करित येऊं लागलें आहे रेडियमचे गुणधर्म अद्यापि पूर्णपणें समज[illegible] ही नाहींत. नंतर व्याख्यात्यांनीं आका[illegible] यानां संबंधीं थोडक्यांत माहिती सांगितली पूर्वी फक्त हैड्रोजनसारखें हवेपेक्षा हलके द्रव्य रेशमाचे पिशवींत भरून [illegible] हवेंतून वर जाऊं लागली म्हणजे ति[illegible] सहाय्यानें वर जावें यापेक्षां हवेंतून इ[illegible] स्वतःसंचार करितां येत नसे नंतर [illegible] त्याच प्रकारच्या पिशवींस जोडून [illegible] होडीसारखें यान जोडून त्याला [illegible] बोटी प्रमाणें फ्रॉपेलर म्हणजे गत्युत्पा[illegible] जोडावा व तो एंजिनच्या शक्तीनें चालव[illegible] अशी युक्ति निघाली. असल्या प्रकार[illegible] विमानांस डिरीजिबल असें म्हणतात. [illegible] कांस समजण्याकारितां डिरिजिबलचें [illegible] व्याख्यात्यांनीं बोर्डावर काढिलें होतें [illegible] प्रॉपेलरचा प्रत्यक्ष मॉडेल सभेपुढें ठे[illegible] होता. या विमानांस सुद्धां उंच [illegible] जाण्याकारिता हायड्रोजन सारख्या हल[illegible] द्रव्याचें सहाय्य घ्यावें लागतें. प[illegible]

शरीर हवेंत. वड असून ते वर आपोआप उच उडूं शकतात तर तशाच प्रकारची यंत्र रचना केल्यास मनुष्यासही हवेंत कां उडतां येऊं नये इकडे शास्त्रज्ञाचें लक्ष लागून अखेर बायप्लेन व मॉनोप्लेन हीं विमानें निघालीं ह्या दोन्ही विमानांचें तत्व एकच असून फक्त बाह्य स्वरूपांतील फरकांमुळें त्यांस अशीं नांवें देण्यांत आलीं आहेत. नागबोट ज्याप्रमाणें पंख्यानें पाणी मागें फेंकून पुढें निघून जाते त्याच प्रमाणें पक्षी हीं हवेस पंखांचे सहाय्यानें खालीं फेंकीत फेंकीत वर चढतात. त्याच प्रमाणें ह्या विमानांस पंख असून यंत्राचे सहाय्यानें हे पंख इतक्या जोरानें हालूं लागतात कीं प्रथम कांहीं वेळ पर्यंत सपाट जमिनीवर मोटार प्रमाणें धांवून विमान आपोआप पक्षीशरीराप्रमाणें जमिनीस सोडून वर चढूं लागतें. दोन्ही प्रकारच्या विमानांचे नमुने व्याख्यात्यांनीं प्रेक्षकांपुढें ठेविले होते. नंतर त्यांनीं बिनतारी बातमी यंत्र सचित्र समजावून दिलें व ते मॅनोरेल म्हणजे एका रुळावरून धांवणारी आगगाडी ही एकाच चाकावर तोल सांवरून कशी चालते हें सांगण्याचें उदाहरण घेऊन समजाविलें. व गाडीचा प्रत्यक्ष धांवता नमुना त्यांनीं संमेलनापुढें ठेविलेला चालवून दाखवित असतां नेमून दिलेला वेळ संपल्यामुळें त्यांस आपलें व्याख्यान आटोपावें लागलें.

मि. गुर्जर यांचें व्याख्यान फार मनोरंजक झालें त्यांची प्रतिपादन शैली ही फार चांगली असून ते आपल्या विषयाच्या ज्ञानांत अगदीं निष्णात दिसले. त्यांना अशा रीतीनें आपलें व्याख्यान आटोपावें लागलें ह्याबद्दल आम्हांस दिलगीरी वाटते. संमेलनाचे वेळीं अशा प्रकारचीं महत्वाचीं व्याख्यानें संमेलना चे ठिकाणीं न करितां थिएटरा सारख्या सार्वजनिक ठिकाणीं दिल्यास, संमेलनाच्या सोईच्या दृष्टीनें व सार्वजनिक शिक्षणाचे दृष्टीनें हीं जास्त चांगलें होणार नाहीं काय? मे. इन्स्पेक्टर साहेब या गोष्टीचा विचार करतील अशी आम्हांस फार आशा आहे.

यानंतर येवतमाळ हायस्कुलांतील आसि. टीचर मि. सटोकर यांनीं 'नैतिक शिक्षण व तें देण्याची शिक्षकांवरील जबाबदारी!' या विषयावर निबंध वाचला. आजकालच्या सुशिक्षित व विचारी मंडळींत या संबंधीं जे जे प्रचलित विचार ऐकूं येतात त्या सर्व विचारांचा रा. सटोकर यांनीं आपल्या निबंधांत समावेश करून नैतिक शिक्षणाचें महत्व सांगून बायबलच्या दहा आज्ञाप्रमाणें सर्वांस पाळण्यास अवश्यक अशा पंचवीस तीस आज्ञा निर्माण केलेल्या वाचून दाखविल्या. हा प्रयत्न चांगला आहे परंतु व्याख्यात्यांस व इतर सर्वांस आमचा असा प्रश्न आहे कीं फक्त पुस्तकी ज्ञान संपादन करण्याकरितां दिवसाचा सुमार एक चतुर्थांश भाग इतक्या अवधींत विद्यार्थी शिक्षकापुढें येतो. पुस्तकी ज्ञान देत असतांना बाह्य असा एकही शब्द बोलण्याची शिक्षकास फुरसत नाहीं. कान्फरन्समध्यें जे धडे शिकविले गेले व त्यावर ज्या टीका झाल्या त्यांजकडून पाहिलें म्हणजे कळ्ल-

रांतील शिस्तीपेक्षां शाळेंत जास्त कडक शिस्त शिक्षकांनीं ठेविली पाहिजे. वायफळ असा एक शब्दही बोलतां उपयोगी नाहीं. एक सेकंद व्यर्थ घालविला कीं छातींत तीर घुसलाच. अशा स्थितींत शाब्दिक शिक्षण देखील तसलें नैतिक तत्वें प्रतिपादलेला धडा आख्याशिवाय देणें सर्वस्वी अशक्य आहे. शाळेंत विद्यार्थी जेवढा वेळ असतो त्याचे तिप्पट वेळ तो दररोज निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या परिस्थितींत असतो. घरीं बाजारांत सहाध्यायी वर्गांत व ज्या ज्या इतर, हरएक ठिकाणीं तो येतो त्याला हरएक ठिकाणीं ऐकूं येणाऱ्या दिसणाऱ्या व मनावर संस्कार उमटविणाऱ्या हरएक गोष्टी त्याचें शील बनविण्यास कारण होतात. ह्या ठिकाणीं जे संस्कार उमटतात ते योग्यायोग्यते प्रमाणें, विद्यार्थ्यांचे वर्तनास चांगलें अगर वाईट वळण लावून देतात. ज्या शाळांना वसति गृहें आहेत त्या शाळांतील वसति गृहांवर देखरेख करणाऱ्या शिक्षकांची जबाबदारी मात्र नुसत्या पाच तास काम करणाऱ्या शिक्षकांपेक्षां भिन्न प्रकारची आहे. त्यांच्या वर्तनांतील हरएक गोष्टीचा विद्यार्थी वर्गावर परिणाम होत असल्यामुळें असल्या शिक्षकांना मात्र मि. सटोकर यांचा उपदेश फारच किंमती आहे. इतरांना तो किंमती नाहीं असें नाहीं परंतु त्यांनीं त्या उपदेशा प्रमाणें विद्यार्थ्यांस वागविण्यास त्यांना हल्लींच्या परिस्थितींत वावच नाहीं.

यानंतर क्रमिक पुस्तकांसंबंधें वाद विवाद सुरु झाला. इंग्रजी पांचव्या यत्तेंत हल्लीं शिकवित असलेल्या संस्कृतापैकीं कांहीं भाग कमी करावा ही सूचना नापसंत ठरली. फीजिकल जिऑग्रफी म्हणजे भूपृष्ठावरील सृष्ट फेरफारांविषयीं ज्ञान हा विषय इंग्रजी तीन यत्तांस जेवढा नेमिला आहे तेवढा चार यत्तांस शिकवावा व चवथ्या यत्तेस नेमिलेला अजीबात सोडून द्यावा असें ठरलें.

आवर्त दशांश घनमूळ व चक्रवाढ व्याज हीं ए. व्ही स्कुलांत न शिकवितां पुढें शिकवावीं ही सूचना नामंजूर झाली.

नंतर पहिल्या चार यत्तांतून सायन्स या विषयाचें अभ्यासक्रम सिलेबस तयार करून त्याप्रमाणें कान्सेंट्रिक पद्धतीनें हा विषय शिकविण्यांत यावा ही सूचना पास होऊन सिलेबस तयार करण्याकरितां तज्ञांची एक कमिटी नेमून ती कमिटी तयार करील ते सिलेबस हेडमास्तराकडे पाठविण्यांत येऊन त्यांच्या हरकती असल्यास त्यांचा विचार होऊन त्याप्रमाणें फेरफार करण्याचें ठरलें.

ए. व्ही स्कूलसमधून हल्लीं शिकविलें जाणारें इंग्रजी व्याकरण फार अवघड आहे तरी त्यांत फेरफार व्हावा अशी सूचना होती ती नापास झाली. कारण व्याकरणाचा अभ्यासक्रम—सिलेबस ठरलेला असल्यामुळें तें संगतवार शिकविणें बिकट नाहीं असें बहुमतानें ठरलें.

ड्राइंगचें अभ्यासक्रमपत्रक लवकरच तयार करण्यांत येऊन तें सर्व हेडमास्तराकडे पाठविण्यांत येईल व सर्वांचीं मतें घेतल्यावर त्याप्रमाणें फेरफार करण्यांत येईल असें सांगण्यांत आलें.

नंतर प्राथमिक शाळांतून हल्लीं वडील भाऊ व धाकटा भाऊ हे एकाच वेळीं शिकत असल्यास वडीलभावास पूर्ण फी व धाकट्या भावास अर्धी फी घेण्यांत येते ती सर्व घेण्यांत यावी अशी सूचना पुढें आली ती नापास झाली.

वऱ्हाड शाळापत्रकांत सप्टेंबर १९१२ मध्यें जें सरक्युलर झालें आहे त्याप्रमाणें हजीरी बुकांत विद्यार्थ्यांच्या नांवापुढें शाळेंतील मुदतीचीं वर्षें महिने व दिवस अशी दाखविण्यांत यावीं ही सूचना नापास झाली व फार्म वगैरे भरण्याची हल्लींची पद्धति आहे तीच चालू ठेवावी असें ठरलें.

गुरुवार ता० १२ नोव्हेंबर १९१४

हा संमेलनाचा शेवटला दिवस असून या दिवशीं कामास बरोबर बारा वाजतां सुरुवात झाली. प्रारंभीं उमरावती ए. व्ही स्कूलमधील असि. टीचर मि. शेलगांवकर यांनीं 'व्यवहारी अपूर्णांक' हा विषय इंग्रजी दुसरे यत्तेस शिकवून दाखविला. धडा शिकविण्याची पद्धति चांगली होती.

यानंतर अकोला हायस्कुलांतील आसि. मास्तर मि. कुळकर्णी यांनीं 'ग्राफ'—चित्रबंध—हा जो बीज गणितांतील भाग त्याचा उपोद्घात म्हणून धडा शिकविला. कान्फरन्स पुढें आतां पर्यंत आलेल्या धड्यांपैकीं हा धडा खरोखरच नमुनेदार असून रा. कुळकर्णी हे धडा शिकवितांना अगदीं स्वस्थ शांत व शिकविला जाणाऱ्या विषयाचे पूर्ण माहितगार असे दिसत होते. असें असूनही त्यांचे शिक्षणावर टीका म्हणून कांहीं मंडळींनीं जी टीका केली ती अगदीं कुत्सित होती. आमचे मतें. रा. कुळकर्णी यांनीं. O'-is any point in the plane where the observer is supposed to stand with his face towards the north —अशी सुरवात करून Y चा axis oy & oy'

असें नामाभिधान करावयाचें होतें—असा आरंभ केला असता तर जास्त बरें झालें असतें. असो. रा० कुळकर्णी यांची पद्धति उत्तम दर्जाची होती या विषयीं मात्र बिलकूल शंका नाहीं.

यानंतर सर्वांत अत्यंत महत्वाची सूचना म्हणजे 'धि बॉय् स्काउट् मुव्हमेंट्' म्हणजे विद्यार्थी वर्गांत शिस्त, शील, कार्यक्षमता व शारीरिक पूर्णता उत्पन्न होण्या करितां व पुढील आयुष्य क्रमांत त्यांनीं उत्तम नागरिक बनावें म्हणून त्यांना शिक्षण देण्याकरितां संस्था वऱ्हाडांतील शाळांतून सुरु करावी—अशा प्रकारची होती. ही सूचना रा० देवभानकर यांनीं पुढें मांडिली. परंतु या संबंधें बोलतांना त्यांनीं असें सांगितलें कीं या स्काउट पद्धती प्रमाणेंच परंतु थोडा फेरफार करून यवतमाळ हायस्कूल मध्यें 'लीग ऑफ ऑनर' या नांवाची संस्था स्थापन झाली असून तिजला तेथील डेप्युटी कमिशनर साहेब यांची सर्वतो प्रकारें मदत आहे. मे. डायरेक्टर साहेब बहादूर यांचीही या संस्थेविषयीं सहानुभूति आहे. तरी ही संस्था कार्यकारी फायदा होतो तो पाहून अशा प्रकारच्या संस्था पाहिल्यानें हायस्कुलांत सुरु कराव्या व नंतर क्रमाक्रमानें ए. व्ही. स्कूलस मधून सुरु कराव्या. लीग ऑफ ऑनर या संस्थेचे

नियम वगैरे सर्व बॉय् स्काउट पद्धतीप्रमाणेंच आहेत व पुढें शाळापत्रकांत बेळगांव हायस्कुलांत ही पद्धति सुरु केल्याबद्दल जी माहिती आली आहे त्याच प्रमाणें हे नियम ही असल्यामुळें आम्हीं यावर जास्त लिहित नाहीं.

यानंतरची सूचना गेम्स फंडांस सरकारी मदतीची अपेक्षा या बद्दल होती परंतु ह्याबद्दल गुदस्त साली प्रतिकूल निकाल झाला असल्यामुळें त्यांत फेरफार होणें शक्य नाहीं असें मे. कुळकर्णी साहेब म्हणाले. नंतर ग्राज्युएट लोकांनी निदान दोन वर्षें नोकरी करावी व आधी सोडून गेल्यास सर्व पगार परत देऊं असा करार करून दिल्याशिवाय त्यांस नोकरींत घेऊं नये अशी सूचना पुढें आली. अशा शर्तींवर कोणीही ग्राज्युएट येणार नाहींत असें सर्वांचें मत पडून सूचना नापास झाली.

नंतर युनिव्हर्सिटी परीक्षांस जाणारे शिक्षकांस रजा पाहिजे असल्यास ती त्यांनी टर्मचे आरंभापासून घेतली पाहिजे मध्यें घेऊं नये अशी सूचना पुढें आली. या गोष्टीची चर्चा इन्स्पेक्टरांचे कान्फरन्स मध्यें व्हावयाची असल्यामुळें ही सूचना तहकूब ठेवण्यांत आली.

यापुढील सूचना म्हणजे ए. व्ही. स्कूलमधील शिक्षकांना सायन्स हा विषय शिकवितां येत नाहीं सबब त्यांस एक एक सायन्स शिकविणारा शिक्षक द्यावा अशी होती. ए० व्ही. शाळांस आतां आणखी एक एक असिस्टंट लवकरच देण्यांत येणार आहे तो देण्यांत आल्यावर हेडमास्तर यांस जास्त फुरसत मिळेल. सबब त्यांनीं आपला फावला वेळ सायन्स शिकण्याकडे लाविला पाहिजे. त्याचप्रमाणें शाळेंतील एकएक शिक्षकास एक महिना अगर दोन महिनेपर्यंत हायस्कुलांत पाठवून तेथें सायन्सचें शिक्षण त्यांनीं घेतलें पाहिजे. ही अडचण अन्यथा दूर होणें शक्य नाहीं. असे मे. कुळकर्णी साहेब म्हणाले.

यापुढील विषय म्हणजे ए. व्ही शाळांस सायन्स ॲपरेटस देण्यासंबंधें होता. सिलेबस तयार होत असल्यामुळें तें तयार होताच ॲपरेटसचीही यादी तयार करण्यांत येईल व त्याप्रमाणें ॲपरेटस देण्यांत येईल असें मे. कुळकर्णी साहेब बोलले.

यापुढील सूचना म्हणजे निरनिराळ्या विषयावरील निबंध वगैरे घेऊन त्यांवर विद्वानांकडून शिक्षण पद्धति निदर्शक नोट्स—टिपणें—प्रसिद्ध व्हावीं अशी होती. अशा प्रकारचीं टिपणें शाळा पत्रकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध करण्यांत येतील असें मे. कुळकर्णी साहेब यांनीं सांगितलें.

त्याचप्रमाणें शाळापत्रकांतून ऐतिहासिक नकाशे व नकाशांसह धडे प्रसिद्ध करण्यांत येतील असें ही मे. कुळकर्णी साहेब यांनी कळविलें.

या नंतरची सूचना म्हणजे चौथे यत्तेस भूगोलाचें शिक्षण मराठीद्वारा देण्यास हरकत नसावी अशा प्रकारची होती. एज्युकेशन मॅन्युअल मध्ये फक्त स्थल वर्णन इंग्रजी मधून शिकवावें असें आहे — व फीजिकल— म्हणजे भूपृष्ठावरील सृ

सरकाराचें ज्ञान मराठींत शिकविण्यास हरकत नाहीं असें असल्यामुळें आणखी फेरफार करण्याचें कारण नाहीं असें ठरलें.

या नंतरची सूचना नवळपूरच्या शाळेंत निवडक शिक्षकांस पाठवून कांहीं मुदत पर्यंत त्यांस तेथील शिक्षण पद्धति प्रत्यक्ष पहाण्यास मिळावी अशी होती. ही सूचना मान्य झाली आहे व यास मे. डायरेक्टर साहेब यांची मंजुरी मिळतांच शिक्षकांस पाठविण्याची सुरुवात करण्यात येईल. असें रा. कुळकर्णी साहेब ह्मणाले.

या पुढील सूचना कांहीं निवडक ड्राइंग मास्तरांना कान्फरन्सला येऊं देण्या विषयींची होती परंतु ती नापास झाली.

यानंतर निरनिराळ्या शाळांतून आलेल्या मापीक, ड्राइंग व नकाशे यांतून जी उत्तम ठरलीं त्यांची नांवें सांगण्यांत आलीं. हे विषय आमच्या मतें अतिशय महत्वाचे असून त्यास बक्षिसें अगदीं अल्प व असमाधानकारक असल्यामुळें यकडे कोणाही शिक्षकाचें मोठें लक्ष आहे असें दिसत नाहीं व या गोष्टींकडे शाळाखात्याचें जास्त लक्ष जाईल अशी आह्मास आशा आहे.

यानंतर आमचे येथील लोकप्रिय डे. कमिशनर मे. डेवर साहेब ह्यांनी शिक्षकांस उद्देशून भाषण केलें तें दुसरीकडे छापलें आहे. मे० कुळकर्णी साहेब ह्यांनीं व इतर मंडळींनीं समारोपकलितेवेळीं जीं भाषणें केलीं त्यांचा थोडक्यात उल्लेख त्याच ठिकाणीं केला आहे.

सदर मजकूरच्या कान्फरन्सची जी हकीकत आह्मी वर दिली आहे त्यासंबंधीं लोकांस कांहीं सूचना किंवा इतर माहिती किंवा टीकात्मक असें कांहीं लिहावयाचें असल्यास तें आह्मी आनंदानें प्रसिद्ध करूं. ह्या कान्फरन्समध्यें फक्त हेड मास्तरांचाच समावेश झाला असून कान्फरन्सच्या प्रत्यक्ष बैठकींत बाहेरील असा एकही गृहस्थ दिसत नाहीं. कान्फरन्स चालू असतांना पुस्तकावरील चर्चेत रा० प्रभुणे यांचे भाषणावर रा० देवभानकर यांनीं जें विधान केलें तें अगदीं अन्यायी व अयोग्य होतें अशी आमची समजूत झाली आहे. रा० प्रभुणे यांचे भाषण फक्त स्पष्टोक्ति या सदराखालीं येऊं शकेल अशी होती त्यास भाषेस रा० देवभानकर यांनीं 'Detrimental to the Department' ह्मणून ह्मणावें हें अत्यंत आश्चर्य होय!

## शिक्षकांस सूचना

आमचे लोकप्रिय डेप्युटि कमिशनर मि. डेवर साहेब हे ता० १२ नोव्हेंबर रोजीं टीचर्स कान्फरन्स पहाण्यास गेले होते. कान्फरन्सचा हा शेवटचा दिवस असल्यामुळें कान्फरन्सचें काम आटोपेपर्यंत ते तेथेंच होते. कान्फरन्सचें काम पुरें होतांच त्यांनीं जमलेल्या शिक्षक मंडळीस उद्देशून भाषण केलें. ते ह्मणाले 'मी आज येथें कांहीं हेतूनें आलों आहे. एडनसारख्या यःकश्चित् जहाजानें व्यापारी जहाजांस कसा त्रास दिला होता व त्याचा विध्वंस कसा झाला हें आपण काल ऐकलेंच आहे. आणि या संबंधानें सावि-स्तर तारा अशा आहेत सरकारचा विचार असा आहे कीं त्वकरच एक कहानसें पत्र काढून त्यांत वेळोवेळीं लढाईच्या वास्तविक बातम्या प्रसिद्ध करून त्या सर्व सरकारी ऑफिसें व शाळांचे हेडमास्तर यांजकडे पाठवावयाचें. यांतील उद्देश इतकाच आहे कीं लोकांत भलत्याच बातम्या पसरून भलतीच हूल उठूं नये. कांहीं मूर्ख लोक व कांहीं लबाड लोक मुद्दामच भलत्याच कंड्या पिकवून देतात व बिचारे अज्ञानी लोक त्यापासून विनाकारणच हवालदील होतात. याचें एक ताजें व उत्कृष्ट उदाहरण त्यांनीं असें सांगितलें का, अगदीं थोड्या दिवसांपूर्वी अनिजपूर शहरांत एक अशी कंडी पिकली कीं 'एक जर्मन विमान दिल्ली शहरावर आलें व तेथून त्यांनीं आपले परम पूज्य बादशहा पंचम जॉर्ज यांस उचलून नेलें, आपले बादशहा विलायतेंत आहेत ते दिल्लीला मुळीच नाहींत तेव्हां ही गोष्ट खोटी आहे असें कांहीं समंजस माणसें सांगत परंतु त्यांच्या सांगण्याकडे कोणीही लक्ष देईना. व ही कंडी दोनचार दिवस अशीच पिकत होती. तेव्हां शिक्षक मंडळींस मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं खेडे गांवांत शिक्षक हा मोठ्या योग्यतेचा मनुष्य समजला जातो व त्यास पुष्कळ गोष्टी आपल्या लक्षांत ठेवितां येतात. तरी तुह्मीं आपर्डे आपापल्या गांवांतून लढाईसंबंधें कंड्या उठल्यास त्या तत्काल मोडून काढून सरकारी पत्रकांत येणाऱ्या खऱ्या बातम्या लोकांस देण्याचा यत्न करावा त्याच प्रमाणें एखादी अपशकुनाची बातमी आल्यास तेवढ्यामुळें घाबरून जाऊं नये ह्मणून लोकांस समजाऊन सांगावें. नंतर न्यायमंत्र अभय गाऊन आपले परमपूज्य बादशहा व महाराणी साहेब चिरंजीव प्रिन्स ऑफ वेल्स व डेप्युटी कमिशनर साहेब यांच्या नांवानें त्रिवार जयघोष होऊन साहेब बहादुर माघारे गेले.

## युध्दोपयोगी खबुतरें.

पाश्चात्य देशांतून सध्याचें प्रगतिवर भौतिक शास्त्रांशीं मेळ ठेवणाऱ्या प्राचीन ग्रंथांतल्या गोष्टी शोधून काढणारा मोठा शोधक आणि देशाभिमानी पुरुष समजला जातो व त्याचा सर्वत्र सन्मान होतो. आमच्या इकडे याच्या अगदीं उलट प्रकार दृष्टीस पडतो. पुराणांतून दीर्घजीवी प्राणी, विमानें, गोस्तनदेवी काढण्याचा प्रकार, तोफा, वगैरेंचीं वर्णनें आहेत तीं काल्पनिक नसून तत्कालीन लोकांच्या बुद्धिमत्तेचीं आणि शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीची साक्ष देणाऱ्या गोष्टी आहेत असें एखाद्यानें प्रतिपादिलें कीं सुबोधपत्रिका कर्त्यांसारखे सुशिक्षित ह्मणविणारे लोक त्या माणसाची टर उडवायला लागतात, आणि दांत विचकून 'छः! काय आमचे लोक दुबळे आहेत! फुकट त्यांचें इंग्रजी शिक्षण! त्यांचा भोळेपणा आपला आहे तो आहेच!' असे उद्गार काढूं लागतात. पण वस्तुस्थिति कळविण्याचा त्यांनीं कितीही प्रयत्न केला तरी अखेर 'सत्यमेव जयते' हेंच खरें ठरतें, आणि युरोपियन विद्वानांनीं त्या गोष्टीची सत्यता कबूल केल्यावर मग तरी धोबाड्यांत मारल्याप्रमाणें या लोकांना हाजे काजेनें ती गोष्ट कबूल करावी लागते. आज असा एक नवीन शोध आह्माला आमच्या पूर्वजांच्या संबंधानें सांगण्याचा सुयोग प्राप्त झाला आहे. युद्धाचे वेळीं बातम्या पोंचविण्यासाठीं खबुतरांना वार्ताहराचें काम शिकवून तयार करण्याचा प्रघात पाश्चात्य देशांतून आहे. हा प्रकार नवा नसून हिंदुस्थानांत निदान दोन हजार वर्षांपूर्वीं तरी तो होता असें चाणक्याच्या अर्थशास्त्रावरून दिसतें. हा चाणक्य राजा चंद्रगुप्त याच्यावेळीं मगध देशांत होऊन गेला ही इतिहास प्रसिद्ध गोष्ट आहे. यानें आपल्या ग्रंथांत ह्मटलें आहे—'अमित्राटवी संचारं राज्ञो गृहकपोतैः मुद्रायुक्तैः हारयेयुः' (कौटिलीयाध्यक्ष अध्याय पहा) या वाक्यावरून व तत्संबंधाच्या विवेचनावरून चंद्रगुप्ताच्या वेळीं युद्ध प्रसंगीं शत्रूच्या हालचालीची बातमी आणण्याकडे किंवा इकडची बातमी तिकडे पोंचविण्याकडे खबुतरांचा उपयोग होत असला पाहिजे. ही खबुतरें कौटिलीयाध्यक्ष नांवाच्या एका ऑफिसरच्या ताब्यात असत, आणि तीं हल्लींच्या आगगाड्यांच्या वेळापत्रक निराळें ठेवीत अशाच वेगानें जात असत असेंही दिसतें. चाणक्याच्या अर्थशास्त्रावरून अशा प्रकारची बरीच ऐतिहासिक माहिती प्रकाशांत येण्यासारखी आहे, आणि कोणी विद्वानानें तिचा योग्य रीतीनें उपयोग करून प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडण्याचें प्रशंसनीय कृत्य हातीं घ्यावें अशी आमची सूचना आहे.

## लोखंडाचा कारखाना.

मध्यप्रांतांत साकची येथें जो टाटाकंपनीचा लोखंडाचा कारखाना आहे तोच एक हिंदी व्यापारी धाडसाचा विजयस्तंभ आहे, आणि आणि आनंदाची गोष्ट आहे कीं इतर हिंदी कारखान्यांनीं कित्ता घेण्यासारखी या कारखान्याची उत्तम व्यवस्था व पाश्चात्य राष्ट्रांना हेवा वाटण्यासारखी या कारखान्याची भरभराट होत आहे. जून १९१४ मध्यें संपलेल्या वर्षाबद्दलचा या कारखान्याचा जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून पाहतां गेल्या सालीं या कारखान्याला एकंदर पावणे तेवीस लक्ष रुपये नफा झाला. कंपनीनें आपल्या भागीदारांना शेकडा ६ प्रमाणें हा नफा वाटून दिला. या कारखान्यावरचे पुष्कळ मुख्य अधिकारी जर्मन असल्यामुळें सध्याच्या लढाईच्या वेळीं त्यांना एकदम काढून दिल्यानें कारखाना बसेल कीं काय अशी भीति वाटणें साहजिक होतें. परंतु सरकारनें कृपादृष्टि करून या लोकांना राहूं दिलें आहे. गेल्यासालीं या कंपनीकडून पुष्कळ ठिकाणीं खाणीसाठीं जमिनीची तपासणी करण्यांत आली. पैकीं मैसूर संस्थानांत म्यांगनीज व क्रोमाइट नांवाच्या धातु असलेली कांहीं जमीन सांपडली. बंगाल—नागपूर लाईन जिकडे वाढावयाची आहे त्याही बाजूला कांहीं खाणी सांपडल्या. येथें लोखंड व कोळसा दोन्हींचा शोध लागलेला आहे. राजपुतान्यांतही असाच खाणींचा शोध लागलेला आहे, आणि आशा वाटत आहे कीं या खाणी चालू लागल्यावर सध्याच्या प्रमाणें परदेशाहून कारखान्याला लागणारीं कांहीं द्रव्यें येथल्यायेथेंच मिळूं लागतील. या कारखान्यांत सध्या ७६४३ लोक कामकरी आहेत. पैकीं १८९ युरोपियन आहेत. या कारखान्यांत तयार होणारा माल युरोप व अमेरिका या देशांत गेला व तो पसंत पडला. स्काटलंड, इटली व फिलिपाइन बेटें हीं नवीं गिऱ्हाइकें मिळालीं. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत देखील रेल्वे कंपन्यांना लागणारें सामान या कारखान्यानें पुरविलें. आमच्या लोकांना लोखंड गाळण्याची विद्या शिकविण्याची कांहीं सोय या कारखान्याकडून होईल तर टाटाकंपनीचे देशावर अनंत उपकार होतील.

## टपाल खात्याचा रिपोर्ट.

हिंदुस्थानांत सर्वांत अत्यंत लोकोपयोगी व सुव्यवस्थित असें एखादें खातें असेल तर तें सरकारी टपाल खातें होय. गेल्या सालापासून तार—ऑफिसें हीं या खात्याच्या ताब्यांत आपल्या हातीं घेतलीं आहेत. गेल्या संबंध वर्षांत ६ कोट, ९० लक्ष पत्रांचा बटवडा झाला. २२॥ कोट रुपयांचीं व्ही० पी० पार्सलें गेलीं व आलीं. मनिऑर्डरीनें ९१॥ कोट रुपयांच्या झाल्या. सेव्हिंग्ज बँकांतून २१ कोट रुपयांची देवघेव झाली. १ कोट ७० लक्ष तारा पोंचविण्यांत आल्या; व या सगळ्या कृत्यांनीं लोकांची सोयी होऊन सरकारला ११ लक्ष रुपये निव्वळ नफ्याचे मिळाले. लोकांना सुव्यवस्थित कारभाराचें व्यावहारिक शिक्षण मिळालें तें निराळेंच. येथें प्रश्न असा येतो कीं एवढी व्यवस्थित कारभाराची प्रचिती आली असून आमच्या दृष्टीसमोर असतां आमचे लोक इतके आळशी कां? आह्मी आमचे लोकांनी व्यवहारांत या खात्यापासून शिकण्याच्या गोष्टी ह्मणजे टापटीप, वक्तशीरपणा, दीर्घोद्योग, निरलसता, कर्तव्यदक्षता, स्वतः फायदा करून लोकांना उपयोगी पडण्याचें धोरण, वगैरे पैकीं एकही गुण कधीं उचलीत नाहीं किंवढें आश्चर्य!

## अबकारी खात्याचा रिपोर्ट.

१९१३।१४ सालाकरितां मध्यप्रांत वऱ्हाड यांतील अबकारी खात्याचा कारभाराचा रिपोर्ट बराच समाधानकारक आहे. मागल्या सालीं या खात्याच्या उत्पन्नांत शेकडा १६ या प्रमाणांत वाढ झाली होती. ती गेल्या सालीं फक्त ९ झाली, यांत पैकीं ८ लायसेन्स फीच्या उत्पन्नांत झाली आहे ह्मणजे दारू सारखें भयंकर द्रव्य लोकांच्या घशांत ओतणाराकडून सरकारनें अधिक पैसे मागितले, अर्थात् दारू महाग झाली. पण या मुळें पिणारांची संख्या कमी झाली असती तर समाधान मानण्यास जागा आहे. सरकार ह्मणतें किरकोळ दारू विक्रीचे दर यामुळें इतके चढले आहेत कीं या बद्दल कडकपणा थोडीशी शिथिलता ठेवणें अवश्य वाटूं लागलें आहे. कारण त्यामुळें लोक स्वदेशी विदेशी दारू जास्त घेऊं लागले आहेत तसाच गांजाचाही खप जास्त होऊं लागला आहे. हें संकट टाळण्याचा उपाय ह्मणजे विदेशी दारूवर जास्त कर व

दुषित झालेली असली तरी ती राजनीतीच्या दृष्टीनें एकार्थी अवश्य आहे.

## मुंबईचें साहित्य संमेलन.

यंदाचें साहित्य संमेलन मुंबईस ईस्टरच्या सुटींत भरविण्याचें ठरलें होतें व त्या प्रमाणें साहित्य परिषदेचे सेक्रेटरी रावसाहेब मोरमकर व रा. आपटे यांच्या सहीची जाहिरात ही प्रसिद्ध झाली. पण त्याच वेळीं महाराष्ट्रीय सामाजिक परिषदेची बैठक अमरावतीस होण्याचें ठरलें असल्या मुळें संमेलनानें आपल्या बैठकी साठीं दुसरी एखादी सोयीची वेळ पाहावी अशा अर्थाचीं पत्रें सामाजिक परिषदेच्या चालकीं कडून साहित्य परिषदेकडे गेल्यामुळें त्या गोष्टीचा पुनः विचार होत असल्याचें कळतें. सामाजिक परिषदेच्या चालकांची सुचना कांहीं वावगी नाहीं. ह्मणून आह्मी असें सुचवितों कीं मुंबईच्या मंडळीनें संमेलनाची बैठक शिमग्याच्या सुट्टींत ह्मणजे फेब्रुवारीच्या मध्याच्या सुमारास भरविण्यास वावगें होणार नाहीं. केंव्हांही भरवा पण साहित्याविषयींच्या कर्तव्याला अजीबात विसरूं नका येवढेंच आमचें मुंबईकरांना सांगणें आहे.

## ना० मि० गोखले.

हे गेल्या आठवड्यांत पुण्यांत सुखरूपपणें परत आले हें वाचून आह्मांस फार आनंद झाला. त्यांची प्रकृति अलीकडे दोन वर्षांपासून नीट राहिनाशी झाली आहे. विलायतेच्या थंड हवेनें त्यांना आराम वाटू लागला आहे व ते पब्लिकसर्व्हिस कमिशनचें काम संपवून यंदाच्या राष्ट्रीयसभेला हजर राहण्यासाठीं परत आले आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. यंदाच्या राष्ट्रीयसभेची बैठक विशेष महत्वाची होईल. कारण त्यांत जहाल व मवाळ पक्षांचा समेट करण्याचें घाटत आहे अशा वेळीं सुरतच्या बैठकीची पुनरावृत्ति न होतां व कांग्रेसच्या प्रगतिपर तत्वाचा होम न होतां समेट करतां आला तर तो अवश्य करण्यांत यावा असें आमचें मत आहे. पण ही फार विचाराची गोष्ट आहे. कारण दोन्ही पक्षांच्या अंतिमध्येयांत व तें साध्य करून घेण्याच्या पद्धतींत जें अंतर आहे तें काढून टाकून राष्ट्रीय देहांतलें अपकारक बीज नाहींसें करणें हें कांहींअंशीं प्लेगन व्हावा ह्मणून इनाक्युलेशन करून घेण्यासारख विचाराचें काम आहे. राजनीतिज्ञांनीं यावेळीं योग्य खबरदारी न घेतल्यास इनॉक्युलेशन प्लेगच्या रोगाइतकेंच प्राणाला अपघात करणारें होण्याचा संभव आहे. अशावेळीं ना. गोखले योग्य सल्ला देण्यास आहेत ही संतोषाची गोष्ट ह्मटली पाहिजे.

## लढाई

सींग टॉऊ हे जपाननें सर केल्यापासून पॅसिफिक महासागरांत जर्मनीची सत्ता अगदींच नामशेष झाली आहे एमडेन हें लढाऊ जहाज अंदमान जवळ पकडून बाळून टाकण्यांत आलें तसेंच आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यांवर कॉनिसबर्ग या जर्मन जहाजाची तीच अवस्था झाली. बादशहांनीं जेव्हां पार्लमेंट उघडून स्वतःचा संदेश सांगितला तेव्हां त्यांनीं साम्राज्यांतील इंडियन प्रजेच्या राजनिष्ठेबद्दल विशेष अभिमान व्यक्त केला. रशियन सैन्य जर्मनीला इतकें भेडीला आणित आहे कीं थोड्याशा तहाच्या गोष्टी सुरू झाल्या आहेत. डिक्समूड येथें जर्मन सैन्याची सरशी होऊन भयंकर लढाई झाली व जर्मनीला तेथें जयही मिळाला. तथापी जर्मनीचें पाऊल कॅलेच्या बाजूला न पडूं देण्यासंबंधानें सर्व संयुक्त सैन्यें अगदीं दक्षतेनें उभीं आहेत. टर्की, जर्मनीच्या हातांत बाहुली प्रमाणें खेळत असल्या मुळें इंडियांतील मुसलमान मंडळींनीं टर्कीचा निषेध केला आहे आणि या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्व मुसलमान मंडळी मशीदींतून व निरनिराळ्या सभामधून आपली राजभक्ति अधिक व्यक्त करित आहेत.

वून ती महाग करून सोडणें हा आहे. पण या उपायाचें अवलंबन करण्यास सरकारी अधिकाऱ्यांना काय अडचणी आहेत याचा खुलासा रिपोर्टांत नसल्यामुळें त्याबद्दलची चर्चा आह्मांला करतां येत नाहीं. मध्यप्रांतांत दारूच्या दुकानांची संख्या कमी करण्यांत आली आहे ही समाधानाची गोष्ट आहे, पण त्याबरोबरच कित्येक दूरच्या डोंगराळ प्रांतांतून जेथ चोरून दारू गाळण्याच्या कामावर सरकारला नीटशी देखरेख ठेवतां येत नाहीं तेथें दुकानांची संख्या वाढविण्याची अवश्यकता सरकारला वाटू लागली आहे ही गोष्ट कोणाही विचारी माणसाचें मन अस्वस्थ करून सोडील. ही देखरेख ज्यास्त कडक करण्यासाठीं अधिक खर्चाची मंजुरी द्या, अधिक हुशार लोक नेमा, काय वाटेल तें करा, पण तस्ताला सोडून व्यसनाच्या वृद्धीला अवसर देण्यास [ निरुपायानें कां होईना ? ] तयार होणें कदापि इष्ट होणार नाहीं हें अत्यंत आदरपूर्वक सरकारास आह्मी सुचवितों. ताडी कमी मादक व कमी हानिकर ह्मणून देशी दारूपेक्षां ती बरी समजून तिला उत्तेजन देण्याचा सरकारचा क्रम दोन हानिकर गोष्टींत कमी हानिकर स्वीकारण्याच्या तत्वावर मान्य आहे. पण देशी दारूबरोबर विदेशी दारू ही कां महाग करूं नये हें कळत नाहीं. गेल्या साली मध्यप्रांतात अफूचा खप ९३१ शेरांनीं कमी झाला, पण वऱ्हाडांत तो १०९ शेरांनीं वाढला! याचें कारण उमरावती व दर्यापूर जिल्ह्यांत अफूचा भाव उतरला हें दाखविण्यांत आलें आहे. पण हा भाव कृत्रिम उपायांनीं उतरण्याचें थांबविणें सरकारच्या हातांत नव्हतें काय? असा प्रश्न करणें गैरवाजवी होणार नाहीं. देशी दारूचा भाव चढल्या मुळें गांजाचाही खप मध्यप्रांत व वऱ्हाड या दोन्ही प्रांतांत वाढलेला आहे. दारू इतकाच गांजाही प्रकृतीला अपायकारक असल्या मुळें हा झालेला फेरबदल कोणीही समाधान कारक मानणार नाहीं. गांजाचे मक्तेदारांनीं मक्त्याची मुदत संपण्याचे वेळीं भाव कमी करून खप वाढविला असें या बदलचें कारण देण्यांत आलें आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांनीं असें भावांत वाटेल त्यावेळीं उतार होऊं दिल्यास लोक दारूबाज आहेत तेथें गांजेखोर होतील, आणि नीतिदृष्ट्या दोन्ही गोष्टी सारख्याच दूषणीय आहेत, तेव्हां याचा बंदोबस्त अवश्य झाला पाहिजे असें आह्मांस वाटतें. अबकारी पदार्थांच्या व्यवहाराच्या बाबतींत स्थानिक पुढारी गृहस्थांचा विचार घेण्याची योजना अधिकाऱ्यांस पसंत आहे ही गोष्ट फार समाधानकारक आहे व ती अधिकाधिक अमलांत आणिली जात आहे ही गोष्ट आनंददायक आहे. व्यसनांना आळा घालण्याचे कामीं खाजगी प्रयत्नांना सरकार आपणाकडून सहानुभूति व उत्तेजन देण्यास तयार आहे हें अत्यंत समाधानकारक आहे; मात्र असे प्रयत्न खरोखर सद्हेतु मूलक असले पाहिजेत, त्यांत अन्य हेतु नसावा, ही शेवटची अधिकाऱ्यांचा, सूचना लोकांच्या सद्हेतूविषयींच्या शंकेनें भरी

## सीलोनची राष्ट्रीयसभा

हिंदुस्थानच्या राष्ट्रीयसभेचें कार्य यशस्वी होत असलेलें पाहून सीलोनच्या राष्ट्रदेहांत नव्या आशा व आकांक्षा यांचा संचार झालेला दिसत आहे. १९१३ सालीं सीलोनच्या कांहीं तरुण व उत्साही मंडळीनें साहित्यसंमेलन हें नांव धारण करून एक राष्ट्रसभेसारखी सभा स्थापन केली आहे. तिच्या पहिल्या सभेचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यावरून पाहतां त्या सभेच्या उद्देशाशीं व कार्याशीं साहित्याचा अर्थाअर्थी संबंध दिसत नाहीं. अबकारी, नियमबद्ध राज्यपद्धति, अमेरिकेंतील स्वातंत्र्ययुद्धाची माहिती ४० विषय या सभेनें चर्चेसाठीं हातीं घेतले होते. यावरून ही सभा उघडउघड राजकीय गोष्टींची चर्चा करणारी दिसते. असें असता या सभेनें साहित्य संस्था साहित्यसंमेलन असें भलतेंच नांव धारण करून त्या नांवाशीं सदृश असलेल्या इतर खरोखरीच साहित्याच्या अभिवृद्धीसाठीं निर्माण झालेल्या संस्थाविषयीं सरकारी अधिकाऱ्यांचे मनांत कुशंका उत्पन्न करून देण्यासारखें कृत्य कां करावें तें कळत नाहीं. सीलोनसारख्या मागसलेल्या बेटांत नवजीवनाचा संचार होत आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे पण या सभेला कोणी दूरदर्शी, अनुभवी व वृद्ध अशा माणसाच्या चालकत्वाखालीं राहणें मात्र फार अवश्य आहे असें यावरून दिसतें.

## जगद्गुरूचें आगमन.

लवकरच हिंदुस्थानात मैत्रेय ऋषि अवतार घेऊन लोककल्याणाचें शुभकार्य साधणार आहेत असें थिओसफी पंथाच्या लोकांचें मत आहे. या मताचा उपहास करणारेच सध्या पुष्कळ आहेत. पण युरोपांतल्या युद्धामुळें एकाएकीं उत्पन्न झालेली भयंकर परिस्थिति त्या आगमनाचीं पूर्वचिन्हें होत असें विचारी मनुष्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं कालांतरानें इतिहासाची पुनरावृत्ति होत असते हें तत्व आतां इतिहासवेत्त्यांना मान्य आहे व शास्त्रज्ञही तें कबूल करतात. हें तत्व जर खरें असेल तर जगद्गुरूचा अवतार होणें ही गोष्ट दूरची नाहीं. रोमन सत्तेच्या ऱ्हासाच्या काळीं जी स्थिति होती तिचीच पुनरावृत्ति आतां होत आहे. त्या वेळच्या प्रमाणेंच आतां नाशाचीं बीजें सर्वत्र पसरलीं आहेत. त्या वेळच्या प्रमाणेंच आतांही राष्ट्राराष्ट्रांत - मनुष्यामनुष्यांत वैरभाव, स्वार्थ, आणि अनीतीच्या भावना प्रबळ झालेल्या दिसत आहेत. अशा परिस्थितीनंतरच एशियाखंडांत येशूख्रिस्ताचा अवतार झाला व त्यानें उपदेशिलेल्या धर्मानें युरोपांत शांतता स्थापित करून बंधुप्रेमाचें बीं पेरलें. त्या परिस्थितीची जर पुनरावृत्ति झालेली दिसत आहे तर त्याच्या पुढच्या पायरीची ह्मणजे जगद्गुरूच्या आगमनाची ही पुनरावृत्ति होईल असें मानणें हें शास्त्रनियमाविरुद्ध कसें ह्मणतां येईल? येशू ख्रिस्त प्यालेस्टाइनमध्यें जन्म पावला आणि त्याच्या धर्मानें युरोप खडाला उन्नतदशेला नेलें तसें आतां मैत्रय ऋषि हिंदुस्थानांत अवतीर्ण होऊन सर्वांच्या जगद्व्यापी अशांततेंत कायमची मुक्ति देऊन भ्रातृभाव पुनः प्रस्थापित करतील यांत असंभवनीयता कोठें आहे तें आह्मांस कळत नाहीं.

## जर्मनीकडून हिंदुस्थानचा अपमान.

सध्याच्या युद्धांत हिंदी फौज ब्रिटिश राज्या विषयींच्या राजनिष्ठेनें प्रेरित होऊन इतक्या शौर्यानें व आवेशानें लढत आहे कीं तें त्यांचें शैर्य पाहून युरोपांतले युद्धकलावेत्ते चकित झाले आहेत व खुद्द जर्मन लोकांना हिंदी फौजेचा दरारा वाटू लागला आहे, व अशा लोकांना आजपर्यंत ब्रिटिश सरकारनें मागें ठेवून फौजेंतल्या अंमलदारीच्या जागा दिल्या नाहींत याबद्दल पुष्कळांनीं सखेद आश्चर्यही प्रकट केलें आहे. हें युद्ध शांत झाल्यानंतर या शौर्याचें व राजनिष्ठेचें योग्य बक्षीस हिंदुस्थानाला मिळाल्यावाचून राहणार नाहीं असेंही पुष्कळ ह्मणत आहेत. पण तूर्त तरी फळाशेवर दृष्टी न देतां हिंदी सैनिक केवळ 'कर्मण्येवाधिकारस्ते' या गीतोक्तीवरच श्रद्धा ठेवून आपलें कर्तव्य करीत आहेत. त्यांच्या आवेशाला आणखी पुष्टि देण्यासाठीं सुप्रसिद्ध लेखक सेंट निहालसिंग हे त्यांना मागील एका प्रसंगाची आठवण करून देत आहेत. ते आपल्या एका लेखांत लिहितात कीं नुसत्या राजनिष्ठेसाठींच नव्हे तर आत्माभिमानानें प्रेरित होऊन ही हिंदी सैन्यानें लढलें पाहिजे. कारण कीं मागें सन १९०० सालीं चीनच्या युद्धांत हिंदी पलटणवाले गेले होते ते वेळीं जर्मनीनें त्यांचा अपमान केला होता. त्यांना जर्मनीनें 'मजूर' अशी संज्ञा देऊन केलेल्या अपमानाचा सूड उगविण्याची आयती संधी परमेश्वरानें आता आणून दिली आहे. तिचा फायदा घेऊन हिंदुस्थानांतले 'मजूर' सुद्धां किती पाणीदार आणि अपकारासहिष्णु आहेत तें हिंदी सैनिक नीं जर्मनीला दाखवावें, आणि त अपमानास्पद शब्द उच्चारणाऱ्यां जिव्हेला चांगलें शासन करावें.

## चवथी आग्रिकल्चरल कान्फरन्स

ह्या कान्फरन्सची बैठक तारीख १७ रोजीं येथील सरकारी शेतावर भरविण्यांत आली होती. सदर्हू बैठकी बरोबर शेतकीचें छेट्या प्रमाणावर प्रदर्शनही भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शन व सभामंडप यांची योजना सरकारी शेताचें आफीसासमोरील भव्य आवारांत केलेली होती. मंडपास कमानी वगैरे लावून बराच शृंगारला होता.

बाहेरच्या दरवाज्यापासून तो आंत पेईपर्यंत ठिकठिकाणीं रंगी बेरंगी पताका लाविलेल्या असल्यामुळें बरीच शोभा आलली होती. प्रदर्शनांत रोझिया कापूस ज्वारी व भुईमूग हे जिन्नस मांडलेले असून गुरांचे दवाखान्यापैकीं कांहीं शस्त्रेंहि मांडण्यांत आलीं होतीं. प्रदर्शना साठीं बाहेरचे बाजूस नवीन तऱ्हेची लोखंडी आउतें, कडबा कापण्याचीं यंत्रें व उफणेर वगैरे जिनसा ठेविल्या असून जिन्नसू मदतीस त्याचा उपयोग कसा करावयाचा हेंही समजावून सांगण्यांत येत होतें.

प्रदर्शनचें काम सकाळीं १० वाजेपर्यंत आटोपल्यावर दुपारीं दोन वाजता मे० क्लूस्टन साहेब डेप्युटी डायरेक्टर ऑफ आग्रिकल्चर [illegible] भाग [illegible] कामास सुरवात केली. [illegible] साहेब यांनीं स्वीकारलें होतें. [illegible] ठिकाणीं [illegible] साहेब [illegible] ताल आग्रिकल्चरल कालेज नागपूर, रा० रा० रिचे डेप्युटी डायरेक्टर आफ आग्रिकल्चर सदर्न रेंज, रा० रा० क्रास्थवेट साहेब रजिस्ट्रार कॉऑपरेटिव्ह सोसायटीज रा० रा० डेवर साहेब, डॅग साहेब, जठार साहेब, ख[illegible]ल्लामुल्लाखान, गिब[illegible] गेरे मंडळी बसली असून त्याचे मागें न्हं डिव्हिजनल ऑफिसर, तहशीलदार व इतर प्रमुख व्यापारी व वकील मंडळी यांची बसण्याची सोय केली होती असो. [illegible]भेच्या कामास सुरवात झाल्यावर मी० जोशी सुपरिंटेंडंट लँड रेकर्ड्स यांनीं येथील फार्मच्या कामाचा गोषवारा मराठींत वाचला. त्याचा साराशः—

येथील सरकारी फार्म ८॥ वर्षांपूर्वी उघडण्यांत येऊन त्या अवधींत जे निर निराळे प्रयोग करण्यांत आले त्यावरून रोझिया कापसाची लागवड ज्यास्त किफायतशिर आहे हें ठरविण्यांत आलें. नायट्रेट आफ सोडा हें गुराचे खताबरोबर घातल्यानें ज्यास्त फायदेशीर आहे. एकसारखें एकाच जमीनींत कपाशीचें पीक लागोपाठ काढणें नुकसान कारक आहे. जनावरांच्या मूत्राचा शेतांत चांगला उपयोग होतो हें [illegible]गण्यांत आलें.

रोझिया कापसाची लागवड ज्यास्त प्रमाणावर होण्याकरितां आग्रिकल्चरल युनियनें काढण्यांत येत आहेत. त्येका युनियनांत कोणातरी एका मेंबरास २१ ते १००एकर जमीनीस पुरेल अशी रोझिया कापसाची सरकी [illegible]ण्यांत येते व नंतर त्यानें त्या पासून होणाऱ्या उत्पन्नांतून इतर मेंबरास बीं द्यावें. त्यापासून होणारें बीं चांगल्या रीतीनें [illegible]न करण्यांत येऊन तें इतर लोकांस फक्त बीं साठींच विकण्यांत येतें. त्यावर सरकारची चांगली देखरेख आहे. गेल्या वर्षी येथून ९७००० पौंड रोझियाचें बीं निरनिराळ्या ठिकाणीं पुरविण्यांत आलें असून खर्चवेंच वजा जातां रु. ९२१० निवळ नफा झाला. यावरून हें येथील फार्म किती किफायतशीर चालविण्यांत येत आहे हें दिसून येईल. सर्व हिंदुस्थानांत इतकें किफायतशीर असें शेतकी फार्म कोठेंही नसल्या बद्दल आह्मास अभिमान वाटतो. या सभेंतील इतर कामांची हकीकत पुढील अंकावर सोपवून त्याविळीं ज्या गृहस्थांस बक्षीसें व सनदा मिळाल्या त्यांचा निकाल आज देऊन हा विषय पुरा करितों.

### बक्षिसांचा निकाल

#### पदकें

रा. रा. हरलाल रामसुख, रा. कोकर्डा
" यशवंतराव देवराव देशमुख, तळेगांव
" प्रल्हाद रामचंद्र देशपांडे, शिंदी

#### सनदा

" बळिराम मोरेश्वर, काडली जि. उमरावती
" नंदराम शेवनाथ, दर्द " "
" स्वरूपसिंग देवमणसिंग, पाथरोट "
" नारायण रामचंद्र दगपांडे, बाळापुर
" गोविंद शिगाजी, पारस
" [illegible] पाटील, [illegible]
" [illegible] कोळे, [illegible]
" [illegible] व्यंकटेश देशमुख, [illegible]
" [illegible] अंभोरकर, [illegible]
" यशवंतराव नारायण पाटील, पा[illegible]
" निळकंठराव देशमुख, त्रिकल
" नारायण बाळाजी पाटील, मालखेड[illegible]
" गोविंदराव देशारडे, नाचणगांव

कपाशींत एकंदर ११ बक्षिसें. भुईमुगांत [illegible] ज्वारींत ४ या प्रमाणें बक्षिसें वाटण्यांत आलीं त्याचीं क्रमवार नावें

#### कपाशी

रा. रा. दौलत सूर्यभान पाटील, तिरसा
" हरलाल रामसुख, कोकर्डा
" डी. के. काणे, यवतमाळ
" नथुप्रसाद शेवप्रसाद डबे, कोकर्डा
" रामसुख शेट, कोकर्डा
" मारुती येदुजी पाटील, वडनेर
" खंडराव बापूराव पाटील, भेंडसी
" कोर्ट ऑफ वॉर्डस, खंडवा
" किसन दर्याजी पटेल तेंव्हार
" हरि फकीरजी आलेगाव
" माधवराव गणेश देशपांडे गोनी

#### भुईमुग

" निनांवी — पिंपळखुटा
" निनांवी — चांदूर बिस्वा
" नूरउल्लाखान पिंपळगांव राजा

#### ज्वारी

" लक्ष्मण बापूजी कृष्ण, कांडली.
" गुलाम अहमद पिंपळगांव राजा.
" वा. डी. देशमुख
" ठाणा मिशन, नागपूर

या शिवाय आग्रिकल्चरल युनियनें यांनीं बक्षिसें दिलीं तीं स्थल संकोचास्तव देतां येत नाहींत.

पिंपळगांवराजा येथील रहिवाशी रा० रा० गुलाम अहमदखां यांस मिळालेलें २० रुपयांचें बक्षीस त्यांनी वॉर रिलीफ फंडास दिलें हें प्रशंसनीय होय.

## टर्कीचा निषेध.

[मुलुख की इस्लाम]

गेल्या बुधवारीं येथील टाऊन हॉलमध्यें ना० खानबहादुर नबाब सलामुल्लाखान, सी० आय० ई, देऊळघाट, यांच्या अध्यक्षतेखालीं वऱ्हाडांतील प्रमुख प्रमुख मुसलमानमंडळीची जाहीरसभा भरली होती. या सभेला कमिशनर आदीकरून अधिकारी व पुष्कळशी हिंदू मुसलमान मंडळी जमली होती. अध्यक्ष या नात्यानें नवाबसाहेबांचें जें उर्दूंत भाषण झालें तें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें होतें त्यांच्या विचारांना व त्यांच्या शद्बांना मुसलमान बंधूच काय पण सर्वजण किती मोठा मान देतात हें पाहून नबाबसाहेबांस देखील परम आल्हाद वाटेल. टर्कीनें या लढाईत जर्मनीचा पक्ष घेतला व जर्मनीशीं जें तुमुल युद्ध चालूं आहे त्याकडे नजर दिली असता असें लक्षांत येईल कीं या सर्व यादवीच्या मुळाशीं राज्यतृष्णा आहे. ही लढाई मुलुख पैदा करण्यासाठीं आहे. तिचा इस्लामी धर्माशीं कांहीं संबंध नाहीं. ब्रिटिश सरकारचे प्रजाजन या नात्यानें आह्मी जितके बांधल आहों त्यापेक्षां ब्रिटिश राज्याच्या संस्कृतीनें व उपकारश्रेणींनें सर्व इंडियन प्रजा स्वाभाविकपणेंच राजभक्त आहे. ही साप्रतची लढाई मोठ्या चाणाक्ष जवाहीर वाल्यासारखी आहे. आणि हा रत्नपारखी इंडियन प्रजेच्या राजनिष्ठेनें व तिच्या [illegible] अमोल जसजसें राज्यक[illegible] [illegible] तपतगा सर्व [illegible] उसळत [illegible] संभाषणाचा जो टाळयांच्या गजरानें आणि आनंदाच्या स्फूर्तीनें बहुमान करण्यात आला त्यापेक्षा या थोर विभूतीच्या यशस्वंत तेचें निराळें अभिनंदन तें कोणतें !

## महायुद्धाचा निकर

जर्मनांनें कॉलेवर दृष्टी रोंखली आहे खरी पण हळूं हळूं जर्मनीचा पाय मागें मागें सरत आहे. इकडे पश्चिमेच्या बाजूच्या सिलेसियामधील याने जवळ जर्मन लष्कराचा तळ पडला आहे आणि रशियाशी निकराची लढाई आसपास होऊन जर्मनी तरी सर्वस्व हरील व लढाईचा शेवट होईल असा रंग दिसतो. काळ्या समुद्रांत शत्रूचीं गोंबन व ब्रेसला हीं जहाजें भस्म झालीं. व टर्कीनें अमेरिकेचे टेनेसी जहाजाला सरबत्ती दिली ह्मणून जाबजबाब चालूं आहेत.

## प्रेमलहरी

फिल्ड मार्शल अर्ल राबर्टस यांचा प्रेतसंस्कार गेल्या गुरुवारीं झाला तेव्हां त्या महायोद्ध्याच्या कैलासवासाविषयीं स्वाभाविकपणेंच सर्व ब्रिटिश राष्ट्र आनंदाश्रु गाळील ! पिकलेलें पान गळित व्हावें हा सृष्टीनियमच आहे पण इतक्या पर्णावस्थेंतही जो महायोद्धा आपल्या राष्ट्राला लढाईच्या प्रसंगीं सल्ला देत असतांना देह ठेवितो आणि इंडियन सैन्या विषयीं सर्व जगाला महती सांगतो तो सदा चिरंजीवच आहे आणि अशाच्या उदार चारित्राची आठवण आह्मी प्रेमलहरींनें सदा काढीत राहूं.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— थंडी मध्यम पडते. वारंवार अभ्रें येतात. दिवसा ऊनही कडक पडतें. हवेंतील या चढविचढीमुळें ती आरोग्यवर्धक नसून ताप खोकला वगैरे दुखण्यांच्या प्रसाराला अनकूलशी आहे.

रा. रा. अंताजी दामोदर काळे यांनीं गेल्या बुधवारीं पैसा फंडा संबंधीं येथे [illegible] लायब्ररींत व्याख्यान दिलें. या पैसा फंडाचा उत्पत्ती त्याची महती व त्याच्या आश्रयाखालीं चाललेला तळेगांव येथील कांचेचा कारखाना या संबंधानें चागली उपयुक्त माहिती सागितली आणि कांचेच्या कारखान्या संबंधानें पुढील व्यवस्था काय करावी या संबंधानें लोकमत बनवून तें जिल्ह्या जिल्ह्याच्या लोकांनी पैसा फंडाच्या अध्य[illegible] कामिटी पुढें मांडण्या विषयीं त्यांनीं विशेष आग्रहाची सूचना केली.

**वॉर फंड** — वार फंडाची रक्कम पूर्वी रु. ४०९१७१८०४११ जमली होती ता गेल्या १२तारखे पर्यंत रु. ९३०८४२८१९८२ इतकी जमली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

ता. १६ व १७ नवबर रोजी येथे टाऊन हॉलांत इंडियन इंपीरियल रिलीफ फंडाच्या मदती करितां दोन जलसे करण्यात आले त्या बद्दलची हकीकत स्थलसंकोचास्त पुढील अंकीं देण्यात येईल.

रा. रा. [illegible] नीळकंठ चा[illegible] [illegible] वकील, [illegible] यांनीं येथूनी [illegible] [illegible]

**दुरुस्ती**- [illegible] नोटीस व दुरु[illegible] फेरबदल [illegible] मूळती तर वाचता[illegible] येथल्या तेथें तो वा[illegible] तुझी [illegible] सन्मान [illegible] दोनदां [illegible] तिला परत पाठविले [illegible]सें ह्मणता. तुह्मास [illegible] असतां १९० रुपये [illegible] पाटील व पंच [illegible] मजूत केली परंतु [illegible] तुह्मी ह्मणता [illegible] माझी शक्ती नाहीं. [illegible] तुह्माला कळवितों [illegible] मून १९ दिवसांत [illegible] कोस घेऊन जावे [illegible] ास फारकती द्यावी. [illegible] असल्यानें मला [illegible] चें सामर्थ्य नाहीं. [illegible] कोणाशीं गंधर्व [illegible] झालें असतां [illegible] वगैरे खर्च कोर्ट [illegible] लागेल. कळावें. [illegible] पो० बोरगांव. [illegible] घडंब कुणबी [illegible] निशानी आंगठा

### आकोला


सोनं
चांदी
अळशी
बाजरी
कापूस
तीळ
गहू
ज्वारी
तूप
तेल
सरकी

**केशरांचें** [illegible]
पवित्र केशर ॥।=१ [illegible]
कस्तूरी २४ ममीरा०
हींग ८= तो० सुंदर
$२\frac{१}{२}$ + $१\frac{१}{२}$ गम १ [illegible]
काश्मीर स्टोर्स श्री.

Regd. NO. N. 150



सतत १० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग
न आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक
णाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी
ं, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें
णाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय
ाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार
ल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सा-
ल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच
े अशाबद्दल खात्री करून घेणें.

ालक-- डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई. नंबर २.

नो० नं० १११


---

शेकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

**सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी**

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गाठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण,
प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

**जव्हेरीयनचें जी[illegible]मिक्श्चर**



केर[illegible] हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून
वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ८१२
वी. एच जव्हेरियन कंपनी,
खलासीचकला, मुंबई.

नो. नं० ३३७

---

ागलिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरितां
सेंटचा राजा.

**ोटो—दील—चमन.**

सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय.
थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या
ुशांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत
ंचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥। व रु. २ ट. ख. वेगळा.
दिलचमनचीं दर डझनास रु. -॥। "

ुजन्ट्स. एच, आर. मोदी आणि कं
नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.

---

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांड्याचें तेल,**

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.
सरकारचे अनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप.**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९

---

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assurances. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38 000 |
| 1893 | 17 657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27.774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | |
| 1888 | 11,[illegible] | 3[illegible] |
| 1893 | 21,16,549 | 80 [illegible]5,818 |
| | 31 36,421 | 1.4[illegible],32356 |
| 1903 | 4 [illegible],07,009 | 2,1[illegible],95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,2[illegible],79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,4[illegible],61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh, NAGPUR*

N. No. 13

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला--सोमवार तारीख ३० माहे नोव्हेंबर सन १९१४ इ० [ अंक ४६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## WANTED

For the post of a temporary teacher on Rs. 25. per month to teach the English 1st standard in the Municipal Middle Anglo-Vernacular School Malkapur.

None need apply who has not passed the Matriculation Examination with Sanscrit as his second language.

Preference will be given to one who has got some experience of the work

Applications with copies of testimonials should reach the undersigned on or before the 15 th December 1914

Sd. M. A. Khan

Malkapur
24 September 1914 } Vice chairman M. committee Malkapur (Berar)

No. No. 415

## केशराचें फूल मुक्त

पवित्र केशर ।।।=शुद्ध शिलाजीत ।। अपली कस्तुरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल १ व $३\frac{१}{२}+१\frac{१}{२}$ गज ६ शे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ४५३

## नोटीस.

गोंड्या वा॥ रायसींग जात टाकोनकार रा. पो. राजंदा यांसः— खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून तुम्ही आज चार पांच वर्षें झालीं तेव्हां पासून तुम्ही माझी जे आण केली नाहीं तेव्हां पासून मी आपले आई बापाचे घरींच आहे. व मी असें ऐकलें कीं तुम्हाला रक्तपिती झाली तर मी तुमचे घरीं येण्यास नाखुष आहे. तरी माझे खावटी बद्दल दरसाल ६० रुपये प्रमाणें रुपये २१० अडीचशें रुपये देऊन मला वेऊन जावें व तुम्हाला रक्त पीती नाहीं याबद्दल डाक्तरचे सर्टीफिकीट घेऊन मला दाखवावें. यानोटीसीचे उत्तर आठदिवसाचे आंत द्यावें. न दिल्यास हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा

घरठाव करीन व तुमची कोणतेही तऱ्हेची तक्रार चालणार नाहीं कळावें ता २०।११।१४ इसवी.

सही

नि. अं. पुंजी मर्द गोंड्या जात टाकोनकार रा. चिंचोली पो. राजंदा तर्फे मनसाराम वा॥ रामसींग टाकोनकार नि अं.

नो. नं ४९९

## नोटीस.

### अस्सल उर्दू हुकमाचें भाषांतर

हजरता गफुरांनिसा बेगम साहेब किबला ज्याहागीर दारीण जाहागीर कौलखेडा जाहागीरीचे पाटील पटवारी आणि एकंदर रयत लोक यांसः—

कळविले जाते कीं आमचे पाहिले नायब मौलवी महमद अबदुल कादर सा यांस आमचे पाहिले चाकत आलेले हुकमाप्रमाणें साल्याची रकम अदाकरीत जावी आणि नेहमी ज्याप्रमाणें त्यांचे लेखावर आणि हुकमावर तुम्ही अंमलबागी करीत होते त्याप्रमाणें करीत जावें हा हुकूम जाहिर होण्यास्तव वर्तमानपत्रांतही प्रसिद्ध करावा. ता० १४ शाबान सन १३३२ हिजरी

सही उर्दूंत

गफुरानिसा बेगम

ना० नं० ४९१

## डायरी बक्षीस!!

(१)वडे तात्विक बोल, भाग १ ला, किमत ८६. (२)वडे तात्विक बोल, भाग २ रा, किमत ८६. [३) धर्मपद, किमत ८४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किमत ८५. (५) विदग्धवाङ्मय, किमत ८३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किमत ८२. (७) मुलांस थोडा उपदेश, किमत ८८. (८) वाल्मीकीचा जय, किमत ८८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किमत प्रत्येकी ८१२. (१०) शिवलीलामृत किमत ८८. या यादीपैकीं आठ आणे किमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.

नो नं ४५४

विश्वास असेल तर मागवा.

## सुगंध

आज पर्यंतच्या मेंथॉल व बामवर गुणकारित्वासंबंधाची शर्थ आम्ही जिंकिली आहे. उष्णतेचे मस्तकाविकार, संधिवात, विंचवाचा दंश, दंत विकार इत्यादिकावर खात्रीचा इलाज. पैसे परत करण्याची थाप नाहीं. थोडसें मस्तकाला चोळतांच सुगंधानें पुष्प वाटिकेंतच उभे असल्याचा भास होईल. किंमत काचेच्या बाटलीस .॥. ट. ख. निराळा ६ बाटल्यास पो. ख. माफ. बाटलीवर सही पाहून घ्यावी. तयार करणार —सकळकळे ॲन्ड सन्स काळयांचे हवेली मार्गे शहर आकोला.

नो० नं० ४४९

## नोटीस

नोटीस वेशमी चिरंजीव १ गुलाम अहमद वा॥ मन्नुमिया दशमूख रा० लोहारा ता० बाळापूर व २ शामराव गणोबा पाटील व ३ विठू वा॥ रावजी पाटील रा० डोंगरगांव ता० बाळापूर ४ देवीदयाल परदेशी ब्राह्मण व ५ आकाजी वा॥ सोनाजी पाटील रा० कवठा ता० बाळापूर व ६ ताराचंद शिवनारायण सावकार व ७ हरि कुकाजी पाटील उभयतां रा० शेगाव ता० बाळपूर व इतर गांवकरी या सर्वांसः—

या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा साक्षात वडील मुलगा नांवें उपरी निर्दिष्ट गुलाम अहमद ॥ शेखमन्नु देशमुख रा० लोहारे ता० बाळापूर हा असल्यामुळे त्याचे अज्ञानपणींच त्याचे नावें मौजे लोहारे ता० बाळापूर येथील शेतें सर्वे नंबर—४०-२१९-४०-१०१ असे चारी शेताचे खाते त्याचें नावें पोकळ करून देऊन ते पोकळ असल्यावरून त्याची वहीवाट व कबजा सर्व प्रकारें माझा आहे. हा माझा वडील मुलगा गेरचालीचा असल्यामुळें पाहिल्यानें त्याला नोटीस देऊन त्याचें वर्तन न सुधारल्यामुळें मी त्याला पूर्वींच घरा बाहेर काढून दिले होते. त्याचा वरील व माझे सर्वच इस्टेटीवर कोणतेच प्रकारचा हक्क संबंध नाहीं. तरी त्यास व आपण सर्व साहू सावकार व इतर लोकांस कळवितो कीं त्याला कोणी या इस्टेटीच्या भरंवशावर कर्ज देऊ नये. त्यांनीं केलेलें कोणतेंही कृत्य मला मंजूर नाहीं. तो जें कर्ज काढील व जें तुम्ही द्याल त्यांस मी अगर उपरी निर्दिष्ट माझी इस्टेट मुळींच जबाबदार होणार नाहीं त्यानीं करून दिलेले लेख रद्द समजले जातील. तरी त्या जवळून कोणी गहाण खरीदी, बक्षीस, पट्यानें वगैरे घेऊन फसू नये. सबब ही अगाऊ इशारत सर्वांस दिली आहे. या नोटिशीची प्रत एक माहिती करितां चि० गुलाम अहमद यांसही देण्यांत येत आहे. कळावें तारीख २९-११-१४

सही

१ शेखमन्नु वा॥ शेखपन्नू देशमुख लोहारे निशानी अंगठा

नो० नं० ४९७

## जाहीरात

पाहिजे— न्यु इंडिया इंन्शुरन्स ब्यांकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि खानदेशभर हुशार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल. विशेष माहिती करितां खालिल पत्त्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके. चीफ एजंट न्यु० इं० इं० कंपनी. मुर्तिजापूर —वऱ्हाड.

नो० नं ४९०

## नोटीस.

नोटीस वेशमी चंद्रभान भसणाजी कुणबी राहणार धानोर ता० मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार कडून नोटीस देण्यांत येते कीं माझी बहीण मुक्ती ही तुमची लग्नाची बायको असून तुम्ही तीस टाकून दिलें आहे. ती सज्ञान असून मी तिला तुमचेकडे दोनदां पाठविली परंतु तुम्ही तिला परत पाठविलें व वागवीतनाहीं असें ह्मणतां. तुम्हास फारकती मागितली असतां १५० रुपये मागतां. तुमच्या गांवच्या पाटील व पंच मंडळीनें तुमची समजूत केली परंतु तुम्ही ऐकत नाहीं. व तुम्ही ह्मणतां तेवढे पैसे देण्यास माझी शक्ती नाहीं. तेव्हां या नोटिशीनें तुम्हाला कळवितो कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत तुम्ही आपल्या बायकोस घेऊन जावें अगर नांदवित नसल्यास फारकती द्यावी. तसें न केल्यास मी गरीब असल्यानें मला तिला या पुढें पोसण्याचें सामर्थ्य नाहीं. करितां मी तिचें दुसरे कोणाशीं गंधर्व लाऊन देईन व तसें झालें असतां तिच्या खावटी बद्दल वगैरे खर्च कोर्ट मार्फत वसूल करावा लागेल. कळावें. ता० २१।११।१९१४ इ०

सहीची निशानी आंगठा संपत वा॥ नरसिंग घडंग कुणबी रा० वणी जहागीर पो० बोरगांवमंजू ता० आकोला.

नो० नं० ४९८

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीस सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझे दोन मुलगे अज्ञान होते तो पावेतों मी आपली वडीलोपार्जीत इस्टेट संरक्षण केली. कर्ज वगैरे मुळावर अगर इस्टेटीवर मुळींच केलें नाहीं. हल्लीं दोन्ही मुलगे सज्ञान झाले आहेत. दोघा पैकीं वडील आजीमोदीन हा उधळेपणा करीत असून अविचारीपणानें खर्च करून फाजील कर्ज काढीत आहे. करितां त्याचे कर्जाचे बोजाचा परिणाम फार वाईट होऊन वडिलोपार्जीत इस्टेटीची अफरातफर होणार असें दिसते. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आजीमोदीन यांस कोणी कर्ज देऊं नये. त्याचे कर्जाबद्दल इस्टेट व आह्मी जबाबदार होणार नाहीं. शिवाय त्याचा धाकटाभाऊ हाकीमोदीन यांस वाटणी मिळाली नाहीं त्याचा हिस्सा घेणें आहे.

शिवाय मला स्वतःला माहेरा करिता म्हणून मुळाव येथील शेतें दोन व पुसद येथील शेत एक नि. धाण्याचे अशीं तीन शेतें माहेरची असल्या बद्दल माझे मालकीची आहेत त्यावर माझे दोन्ही मुलाचा हक्क संबंध मुळींच नाहीं. व बाकीची इस्टेट माझे उभयताचे मुलाची असून त्यांनीं आपसात वाटून घेतली नाहीं. त्याबद्दल एकट्या आजीमोदीन यास कोणी कर्ज देऊन कर्जाचा बोजा केल्यास तें कर्ज रद्द होईल. कारण आजीमोदीन यानें एक शेत विकून आपलें लग्न केलें आहे. व हाकीमोदीनचे लग्न झाले नाहीं. त्याचें लग्न करणें आहे. व त्याचे लग्नाकरिता जो खर्च येईल तो समाईक निघून बाकीची इस्टेट ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत वाटणीपत्र करून दस्तऐवज रजीष्टर करून एकमेकाचे जबाबदार राहूं नये. असें न केल्यास सदरहू मिळकत वाटणी होई पावेतों सरकार तर्फें लागवण करण्यांत येईल. व शेताचे उत्पन्नाची व्यवस्था सरकार मार्फत होईल. नोटीसीचे पूर्वीचे कर्ज व आलीकडे झालेले कर्जाचे उभयता भाऊ एकमेकाचे कर्जाचे जबाबदार राहणार नाहींत. कारण उभयता भाऊ वेगळाले राहून खाणे पिणें वेगळाले खर्च करीत आहेत. या नोटीसीनें जाहीर केले आहे. ता. २१।११।१४ दस्तुर गोविंद सटवाजी अर्जनवीस पुसद

सही

नि. ईमामबी पत्नी महमद फयाजोदीन काजी ईचे हाताची निशाणी बांगडी असे.

नो. नं. ४९९

## नोटीस

नोटीस बेशमी जानकीबाई नवरे त्र्यंबक पाठक रा० मुळावें ता० पुसद.

यांसः—

खालीं सह्याकरणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा नवरा आमचे येथें कुलमुखत्यार होता. त्यावेळीं आमचे कागद पत्र दस्तऐवज आसाम्यांची गहाण खतें, रोखें वगैरे सर्व त्याचे जवळ राहिले. मुखत्यार पत्र रद्दकेले त्यावेळीं त्र्यंबक आजारी असलेमुळें कागज पत्र पुढें देऊं असे त्यांनीं एकदोन वेळ सांगीतले त्र्यंबक मैतझाले वर चार पंचासमक्ष कागदाबद्दल आह्मी तुह्मांस विचारणा केली, तेव्हां सर्व कागद पत्र आठदिवसांनीं देऊं असें तुह्मी केले. वरील मुदतहि गेली तरी तुह्मी कागद देत नाहीं. तर या नोटिशीनें कळविलें जाते कीं, नोटीस पावल्यापासून चार दिवसांत आमचे सर्व कागद देऊन योग्य निकाल करावे नाहीतर कायदेशीर जी योग्य तजविज आहे. ती करून योग्य नुकसान जी होईल ती तुमचे जवळून घेऊं व आणखी जे कायदेशीर करणें पडेल ते हीकरूं तारीख ११-११-१४ इसवी.

सही.

दगडोबा वलद अदोबा तेलवार

गोविंदा वलद अदोबा तेलवार

मुळावें दुकान.

नो० नं० ४६०


## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगात दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चोकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुर्णेसिटी

नो. नं. ६

## अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुरुं, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे १ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आण, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० सु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे, नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ९

## हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थांनातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं**

**शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १०८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

**सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना**

## ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिंचपोकलीकमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! एकच भाव!

**ओटो सुगंधी आमचेकडे मिळणारा माल ओटो सुगंधी**

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्कहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस २ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दगडी नंजिके, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिल्लिक, इसापिकें, हस्तीदंती फणे व फण्या, पितळी सामान, पितळी डिंबे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्यूपेबलनें पाठविला जाईल. ना. नं. ४१३


## नोटीशीस उत्तर

रा० नामदेव वा॥ सुर्यभान बचाटे कुणबी राहणार व्याळ ता० बाळापूर

यांस

कळविण्यांत येते कीं तुमची ता० २७ १०।१४ ची शुद्धवऱ्हाडी पत्रांतून दिलेली नोटीस खोटी आहे. आमचे जवळ उदेभान किसन चे गहाणखत तुह्मी अगर तुमचे बापानें ठेवले नाहीं व तुमचे कोणतेही दस्तैवज व गहाणखते आह्मापाशीं नाहींत. तुमचे गहाणखताचा आह्मांस काय उपयोग आहे हें ही समजत नाहीं. तुह्मी समक्ष ही आह्मांस भटले होते त्याच वेळीं तुह्मांस स्पष्ट कळविले कीं तुमचा कोणताही कागद वगैरे आमचे जवळ नाहीं. असें असतां त्रास देण्याचे बुद्धिनें खोटी नोटीस दिली आहे त्यास खर्च करून उत्तर देणें भाग झाले त्या खर्चाचे रु० ७ आह्मांस ८ दिवसांत आणून देऊन पावती घ्यावी. तसें न केल्यास तुमचेवर योग्य कोर्टात दावा करून नुकसान भरून घेण्यांत येईल. कळावें. ता० २९।११।१४

सही

दाजी गंगाराम द० खु०

नो नं ४६१


## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ J. G. Ridland. एजंट

नो. नं ४

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ 2/3 तोळे असतें.

मुंबई बँक आकोला २१-९-१० J. G. Ridland. एजंट.

नो० नं० १

## जलसा

**इंडियन इंपिरीयल रिलीफ फंडा कारतां करण्यांत आलेला जलसा.)**

हल्लींच्या वेळीं आपल्या सरकारास आपण आपणाकडून होईल तितकी शक्य ती मदत अत्यंत उत्साहानें करणें हें आपलें कर्तव्य असून, सर्वत्र हिंदुस्थानानें या वेळीं दाखविलेली राजनिष्ठा खरोखरीच चिरस्मरणीय होण्यासारखी आहे. आपआपसांतील मतभेदाचा प्रश्न आणि सरकाराजवळून मिळविण्याच्या मागण्याबद्दलचा मतभेद ह्या दोन्हीं ही गोष्टी आयर्लंड प्रमाणेंच हिंदुस्थानानें ही अशा वेळीं एकीकडे ठेवून, आपल्या सरकारास मदत करण्यास, प्रसंग ओळखून दाखविलेली एकवाक्यता, व एतद्देशीय राजे रजवाड्यानी ही दाखविलेली निष्ठा लक्षात बाळगण्यासारखी आहे. आणि आपलें सरकार या युद्धातून पूर्ण यशस्वी होऊन बाहेर आल्या नंतर — आणि सत्याचा वाली परमेश्वर असल्यानें इंग्रेज सरकारच विजयी होईल – हिंदुस्थाना संबंधानें पुष्कळ सढळ हातानें व उदारपणानें विचार होईल असें मानण्यास बळकट्तर जागा आहे.

इंपिरियल रिलीफ फंडाचे बाबतींत हिंदुस्थानांतील इतर भागा प्रमाणेंच वऱ्हाडवासी जनानींही मोठ्या उत्सुकतेनें शक्तिनुसार हातभार लाविलेला आहे; व हल्लीं ही लावीत आहेत. अशाच उद्देशानें ता० १६ रोजीं रात्रीं टाउन हालांत एक जलसा करण्यांत आला. हा जलसा घडवून आणण्यांत येथील लोकप्रीय डे. कमीशनर मेहरबान डेवर साहेब आणि कांक प्रसिद्ध वकील रा. रा. दादासाहेब महाजनी यानीं विशेष मेहनत घेतली. समारंभांत मेहेरबान स्टांडन साहेब कमीशनर, जठार साहेब डे. कमीशनर बुलढाणा, ठकूर साहेब सेशनजज्ज अकोला, रावबहादुर महाजनी वगैरे बडीबडी मंडळी हजर होती. ह्या जलशा मध्यें इंग्लिश मराठी आणि उर्दू या भाषाचें मिश्रण होतें. युरोपियन पैकीं पहिल्याभागात मेहेरबान क्लुस्टन [ डे. डायरेक्टर ऑफ़ एग्रिकल्चर ] फादर फर्नांडिझ मे. क्रास्थवेट ( रजिष्ट्रार को-आपरेटिव्ह सोसायटी, ) मि. ऍकेंटाश, ( राली ब्रदर्सचे एजंट, ) मिस वाकर यांचीं कामें चागली झाली. दुसऱ्या भागात जाली नंबर १ मे. डेवर सा० डे. कमीशनर नंबर २ मि रिडल्ड मुंबई ग्यांकेचे एजंट, जाली नंबर ३ मि. लि ओराईड अ. इंजिनिअर वेस्ट बेरार डिव्हिजन. मिस्टर डेव्हीस रे. इंजिनियर जी. आय. पी. रेल्वे, मि. समेन असि. कमीशनर, मेजर फाउटर सिव्हिल सर्जन, वगैरेंची हास्य कारक कामें प्रेक्षणीय झाली रा. रा. दादा सा० महाजनी व खानजोडे यांनीं मटजी बुवांचीं कामें केलीं. व आकृती, अभिनय, आणि आवाज या त्रईच्या मिश्रणानें प्रेक्षकांत बराच हास्य रस उत्पन्न झाला. मि. रुस्तुमजी सरजज्ज वाशीम यांचें भाटाचें काम, गाणें व अभिनय यांतह " वन्स मोअर " होण्या इतकें चागलें वठलें; तथापीही ह्या सर्व जलशांतील महत्वाची गोष्ट म्हणजे मिस विली डेवर ह्या सात वर्षांच्या लहान मुलीचें " धि गर्ल्स स्काउट " चें गाणें, आणि दुसऱ्या भागांतील जाली नंबर चार ची भूमिका व नृत्य अत्यंत प्रेक्षणीय व प्रशंसनीय झालें, ही होय.

जलशानें शेवटीं इंग्लिश, फ्रेंच आणि रशियन राष्ट्रगीत ह्मणण्यांत आलें. व बादशहा पंचम जार्ज यांचे नांवाचा त्रिवार जय घोष करण्यांत येऊन जलसा बरखास्त करण्यांत आला.

जलसा सुरु होण्या पुर्वीच सर्व हॉल चिकार भरून गेला, आणि जागेच्या अभावीं पुष्कळ लोकांस परत जावें लागलें, ह्मणून ता० १७ रोजीं रात्री ही पुन्हा तोच जलसा करावा लागला दोन्ही खेळ मिळून उत्पन्न अजमासें ४६० रुपये झाले, व ते इंपीरियल रिलीफ फंडाकडे पाठविण्याची तजवीज करण्यांत आली.

---

# वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष शुद्ध १३ शके १८३६

## प्रसिद्ध बल्जयन कवि मटरलिंक

ता. ४ आगस्ट रोजीं सांप्रतचे घनघोर युद्ध सुरु झाल्यापासून मनुष्याच्या अंगच्या पाशवी अंशाच्या प्रभावाच्या गोष्टी—क्रूरपणा, निष्ठुरता, रक्तपात, लूट, जाळपोळ इत्या गोष्टींच– विशेषतः वर्तमान पत्राच्या वाचकांच्या वाचण्यात रोज येत आहेत. देशाभिमान, स्वार्थत्याग, आत्मयज्ञ, इ० उच्च मनोवृत्तींचा साक्ष देणाऱ्या ही कांहीं गोष्टी प्रतीतीस येतात, पण अशा गोष्टी थोड्या; बहु संख्या पहिल्या प्रतीच्याच गोष्टी असत. याचा परिणाम वाचकांच्या मनावर अनिष्ट होतो, पण निरुपाय ह्मणून स्वस्थ बसावें लागतें. अशा मनःक्षोभाच्या वेळीं चित्ताला शांति देण्यास उत्तम कवितेचें वाचन हा सर्वोत्तम उपाय आहे. ह्मणून आह्मी आमच्या पुस्तकसंग्रहांतून एखादा काव्यग्रंथ पाहूं लागलों तों प्रसिद्ध बल्जन कवि मेटरलिंक याचेंच एक काव्य हातीं लागलें. या कवी संबंधानें आमच्या मराठी वाचकांना महिती अश्रुतपूर्वच असल्यानें आम्ही या कवीचाच अल्प परिचय करून देऊन युद्धवार्ता वाचून वाचून शिणलेल्या वाचकांच्या मनाला थोडीशी तरी शांति देण्याचा आमचा संकल्प आहे.

सध्यां साऱ्या जगांत जे ठळक ठळक कवि विद्यमान आहेत, त्यांपैकीं मेटरलिंक हे एक प्रमुख कवि आहेत. गेल्या सालीं बंगाल्यांचे सुप्रसिद्ध कवि रवींद्र नाथ टागोर यांना जें १ लक्ष २० हजार रुपयांचें नोबेल प्राइज नांवाचें बक्षीस मिळालें तें १९११-सालीं मेटरलिंक यांना मिळालें होतें. डा. टागोर यांच्या प्रमाणेंच मेटरलिंक हे नुसते कविच नसून उत्तम तत्वज्ञानी, व नाटककारही आहेत. डा. टागोर यांच्या प्रमाणेंच यांच्या कवितेचा रोख गूढ ज्ञानाकडे [इंग्रजींत याला मिस्टिसिज्म् ह्मणतात] आहे. मेटरलिंक यांच्या काव्यांत व तत्वज्ञान विषयक ग्रंथांत जें काय सांगितलें आहे त्याचें रहस्य थोडक्यांत असें देतां येईल— वरवर पाहिलें तर मनुष्याचें दैनिक एकप्रकारचें दिसतें, पण अंतर्यामी बुद्धी मारून पाहणारास त्याचा रंग अगदीं निराळा दिसतो. त्याचें अंतर्याम रहस्यमय आहे हें रहस्य— मानव जीवन रूपी सागराच्या तळीं असलेलीं गूढ रत्नें — बाहेर काढून लोकांच्या निदर्शनास आणणें हच खरें कवीचें काम आहे. या रहस्यमय संसारांत मानवात्मा हाच नायक व नायिका होत असतो नाटकांतल्या पात्रांच्या तोंडीं घातलेली हर्ष, विषाद, शोक, क्रोध इ. मनोभाव सूचक भाषणांत नाटककर्त्याला कांहीं तरी सुचवावयाचें असतें, त्यात कांहीं तरी गूढ अर्थ असतो, तसा मनुष्याच्या जीवनांत भिन्न भिन्न प्रसंगीं दिसून येणाऱ्या भिन्नमनोवृत्तींत कांहीं गूढ आध्यात्मिक ज्ञान– मनुष्याला निर्माण करणाऱ्या विश्वरूपी नाटकाच्या कर्त्याचा कांहीं गूढ उद्देश– खास आहे, व हा उद्देश ज्यांना समजून घेतां येतो त्यानाच या संसाररूपी नाटकाचें खरें मर्म कळून ते कृतार्थ होतात. नाटकांतलें प्रत्येक पात्र नाटककर्त्यानें कांहीं विशिष्ट हेतूनें विशिष्ट कार्य संपादण्यासाठीं योजिलेलें असतें, तसाच प्रकार याही संसारनाटकांत आहे. पुष्कळ वेळां आपण असें पाहतों कीं नाटकांत एखाद्याकडे नुसतें वार्ता हरीचें काम असतें. तो राजदरबारांत येऊन एखादा निरोप एक दोन मिनिटांत सांगतो आणि चालता होतो. पुनः रंगभूमीवर तो केव्हांही येत नाहीं. पण त्याचें येवढेंच अल्प काम नाटकाच्या सांगतेला अवश्य असतें. त्याच्या त्या दोन मिनिटांच्या भाषणानेंच राजाच्या मनोवृत्तींत विलक्षण क्रांति घडून येते. राजा विलासांत निमग्न असतां दूताकडून शत्रूच्या आक्रमणाची बातमी कळल्याबरोबर त्याची विलासप्रियता पार मावळून तो युद्धाच्या तयारीला लागतो व आपल्या प्रियेची शेवटची भेटही न घेतां एकदम निराळ्याच प्रकारच्या कर्तव्य क्षेत्रांत जाऊन उभा राहतो. तसेंच या संसाररूपी नाटकांत ही आहे. येथें एखादें अर्भक जन्माला येतें न येतें तों देवी, गोवर किंवा दुसरी एखादी व्याधि यानें पीडित होऊन अल्पावधींतच जन्माची इतिश्री करून चालतें होतें, तेव्हां हें मूल कशासाठीं जन्माला आलें, त्याला जन्माला घालण्यांत ईश्वराचा काय उद्देश असेल याचें मनुष्याला मोठें गूढ वाटतें. पण नाटकांतल्या गजदूताच्या कामासारखें या अर्भकानें ही अवश्य असें आपलें नियत कार्य– आईच्या व बापाच्या मनोवृत्तीला एक विशिष्ट स्वरूप देण्याचें कार्य– उरकलें आहे, आतां त्यानें जिवंत राहणें हें या संसारनाटकाच्या कथानकाशीं सुसंगत होणार नाहीं ह्मणूनच तें जगनिर्यंत अंतर्धान पावलें ही गोष्ट सामान्य बुद्धीच्या माणसाच्या लक्षांत येत नाहीं. हाच प्रकार मनुष्याच्या प्रत्येक कृतीचा, प्रत्येक सुखदुःखाच्या प्रसंगाचा, प्रत्येकक्षणीं घडणाऱ्या अनुभवाचा आहे, या प्रत्येकाशीं संगत व सुसंबद्ध असा आध्यात्मिक भाग आहे, व त्या प्रत्येकाच्या मुळाशीं अलौकिक सामर्थ्यवान आणि प्रभावशाली अशा नाटककर्त्याचा कांहीं विशिष्ट हेतु आहे; कितीही क्षुद्र प्रसंग असला तरी मनुष्य जीवनरूपी नाटकाचें तो एक अवश्य अंग आहे ही गोष्ट जर मनुष्य ध्यानांत घेईल, तर आयुष्यातले सुखदुःखादि प्रसंग व त्यांपासून होणाऱ्या तीव्र यातना यातून तो मुक्त होऊन सृष्टीच्या निर्माणकर्त्याच्या अलौकिक चातुर्यानें त्याची मति कुंठित होऊन तो त्याच्या भजनात गुंग होऊन जाईल, व हेंच महत्तम तत्वज्ञान ह्मणा किंवा वेदांत ह्मणा मनुष्याचें निःश्रेयसाचें साधन आहे, हीच गोष्ट मनुष्यानें शिकावयाची व अंतश्चक्षूंनीं पाहावयाची आहे व ती तो जेव्हां पाहील तेव्हां सुखदुःखाची बाधा त्याला कदापि होणार नाहीं; तो आपल्या जिवंतपणीच निर्वाणप्राप्ति किंवा मोक्ष प्राप्ति करून घेईल, हें मेटरलिंक यांच्या एकंदर काव्यांतल्या, नाटकांतलें आणि तत्वज्ञानाचें सार आहे. हें आमच्या वेदांत मताशीं किती जुळणारें आहे हें सूक्ष्म व विचारी वाचक अनुभवून पाहोत येवढीच विनंति आहे.

---

## आणखी काय पाहिजे ?

लॉर्ड कर्झन यांनीं नुकतेंच एका भाषणांत बोलून दाखविलें कीं प्रस्तुतच्या युद्धात हिंदुस्थानानें ब्रिटिश सत्तेविषयीं जी निष्ठा दाखविली आहे, तिला इतिहासांत दुसरी तुलनाच नाहीं. ते आणखी ह्मणाले कीं न्यायपरायणता, सरलता, सुशासन, दया व सत्याचरण इ० गुणाच्या भक्कम पायावर हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश सत्तेची उभारणी झालेली आहे. या भाषणास उद्देशून सरविल्यम वेडरबर्न हे न्यू स्टेटस्मन् पत्रांत ह्मणतात कीं लॉर्ड कर्झन ह्मणतात त्या गोष्टीची सत्यता प्रत्यक्ष वर्तनांत दाखविण्याचा सुयोग लवकरच ब्रिटिश राष्ट्राला प्राप्त होणार आहे. पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट बहुतेक तयार होत आला आहे. या रिपोर्टाचा विचार करतांना लॉर्ड कर्झन यानीं केलेल्या विधानाचें स्मरण ब्रिटिश राष्ट्रानें ठेवावें. यापुढें हिंदुस्थानच्या लोकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें राज्यकारभारांतल्या उच्च प्रतीच्या जागी नेमण्यास सरकारनें संकोच करूं नये. अशा नेमणुकांच्या वेळीं योग्यतेपेक्षां वर्णभेदाकडेच अधिक दृष्टि देण्याची सध्याची जी वहिवाट आहे ती मोडण्याचें श्रेय सरकारनें घ्यावें, व ब्रिटिश सरकारच्या वचनावर हिंदुस्थानच्या लोकांचा भाव आहे तो दृढतर करून दाखवावा; जोंपर्यंत हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत देशी कामगार उच्च प्रतीचें राज्यकारभाराचें काम करण्यास मिळतील तों पर्यंत परदेशांतून ते आणण्याचा विचार ह्या सरकारानें मनांत आणूं नये; काळा व गोरा यांच्या मधल्या न्यायावर क्रिचित वेळा पक्षपाताचा शितोडा उडण्यासारखीं कृत्यें न्यायदेवतेच्या हातून घडणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी. या योगानें हिंदुस्थानची राजनिष्ठा दृढतर होऊन हिंदुस्थानला ब्रिटिशराज्य आपलेंच असें वाटेल व त्याच्या मनाचें समाधान होऊन हिंदुस्था

नांतलें ब्रिटिश राज्य खुद इंग्लंडला ही आशिर्वादासमान होईल. याहून आणखी काय पाहिजे?

## चवथी आग्रिकल्चरल कान्फरन्स

मागील अंकावरून पुढें चालं

या नंतर रा. रा. ले साहेब डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर यांचा कापसाच्या स्थिती विषयीं लिहून आलेला लेख वाचण्यांत आला. तो आह्मी आमचे वाचकां करितां विशेष महत्वाचा वाटल्या वरून निराळा देत आहोंत.

सदरहू निंबध वाचून झाल्यावर कमिटी A चा रिपोर्ट वाचण्यांत आला. नंतर सहकारी पत पेढ्या व शेतकी यूनियनें यावर निंबध वाचण्यात आला. शेतकी यूनियनें काढण्याचा हेतु रिपोर्टाचा गोषवारा जो वर दिला त्यांत आला आहेच. ज्वारी भुईमूग व नायट्रट ऑफ सोडा यांवर लिहिलेल्या निंबंधाचे रूपांतर वाचण्यांत आलें. नंतर कमिटी B चा रिपोर्ट वाचण्यांत आल्यावर नारिंगाची लागवड यावर निंबध वाचण्यांत आला. गुरांस देवी निवाल्यास त्यावर टोंचून घेणें यावर एक लेख वाचण्यांत आल्यावर डेअरी बरचा मे. क्रुस्टन साहेब यांचा निंबध वचून दाखविला. त्यांत डेअरीचे जनावरास चरण्याकरिता मोठ्या जंगलाची अवश्यकता, त्यांची राहण्याची सोय कशी असावी, खाण्या पिण्याची व्यवस्था कशी ठेवावी, गुराची पैदास उत्तम कशी करावी वगैरे निरनिराळ्या बाबींचा विचार करून तेली-नखेडी येथें काढलेल्या डेअरीचा कशा रीतीनें अनुभव आला हें सांगण्यांत आलें.

या नंतर रा. रा. क्रास्थवेट साहेब रजिस्ट्रार को ऑपरेटिव्ह सोसायटीज मध्यप्रांत व वऱ्हाड यांच्या सहकारी चळवळ या विषयावरच्या निंबधाचा सारांश रा. रा. रामभाऊ महाजनी यानीं थोडक्यात चटकदार रीतीनें सांगितला तो आह्मी निराळा देत आहोंत.

नंतर C कमिटीचा रिपोर्ट वाचण्यांत येऊन त्याप्रमाणें अध्यक्ष रा० रा० स्टँडनसा० याचे हस्तें पदकें सनदा व बक्षिसें वाटण्यांत आल्यावर पानसुपारी हारतुरे देण्यांत येऊन समारंभ आटोपला

## सहकारी चळवळ

**( मे. क्रास्थवेट सा० रजिस्ट्रार नागपूर व वऱ्हाड ह्यांनीं अकोलें येथील शेतकी कानफरन्स पुढें वाचलेल्या निबंधाचें रूपान्तर)**

हल्लीं वऱ्हाडात १९७ सहकारी पतपेढ्या व पांच सेंट्रल ब्यांका आहेत. ह्या सेंट्रल ब्यांका अकोला, खामगांव, उमरावती, यवतमाळ आणि मेहकर येथें आहेत. मेहकर येथील ब्यांक नुकतीच सुरूं करण्यांत आली आहे. यवतमाळ येथील ब्यांकेनें आपलें काम इ. सन १९१३ च्या प्रारंभीं सुरूं केलें, व उमरावती आणि खामगांव येथील ब्यांकांनी आपलें काम इ. सन १९१२ सालीं सुरूं केलें. अकोला येथील सेंट्रल ब्यांक १९०९ च्या फेब्रुवारी महिन्यापासून अस्तित्वांत आहे, ह्मणजे तिने बहुतेक पांच वर्षेंपर्यंतच आपलें काम केलें आहे. इ. सनें १९१३ च्या जून महिन्यापासून इ. सन १९१४ ता ३० जून पावेतों वऱ्हाडांतील सेंट्रल ब्यांकांचे चालूं भांडवल सरासरी पावणे दोन लाखापासून जवळ जवळ साडेतीन लाखापर्यंत गेलेंले आहे. ह्मणजे या वर्षांत चालूं भांडवलाची वाढ जवळ जवळ एक लक्ष सत्तर हजार रुपयांची आहे व ही वाढ खालीं दर्शविलेल्या रकमा मिळून झाली आहे:—

अ—सभासद नसलेल्या ग्रहस्थाकडून कर्जाऊ अगर ठेवीच्या रुपानें घेतलेली रक्कम रुपये .... .... .... .... ४४०००

ब—प्रॉव्हिन्शियल ब्यांके कडून घेतलेंलें कर्ज .... .... .... .... .... ६४०००

क—सभासदाकडून घतलेल्या ठेवी .... .... .... .... .... .... १८०००

ड—भागीदारी भांडवलाची वाढ ४३०००

एकूण रक्कम १६९०००

या वर्षांत ९३ नवीन पेढ्या नोंदल्या गेल्या. यावरून दिसून येईल कीं वऱ्हाडांत सहकारी पत-पेढ्यांची चळवळ अद्यापी बाल्यावस्थेंत आहे, व तिच्यामुळें या प्रांतातील सांपत्तिक स्थितीवर तादृश परिणाम झालेला दिसून येत नाहीं. ह्या चळवळीनिमित्त जी एक गोष्ट अवश्यक आहे ती ही कीं, ज्यांना खेड्यापाड्यांत राहणाऱ्या लोकांची व त्यांच्या गृहस्थितीची चांगली माहिती आहे असे पुष्कळसे बिन सरकारी काम करणारे लोकांची जरूरी आहे. हल्लींची प्रवृत्ती अशी आहे कीं मोठ्या शहरांतून रहात असलेल्या थोड्याशा लोकांच्या हातांत या सेंट्रल ब्यांकाची सूत्रें ठेवण्यात येत असतात. अर्थात या तऱ्हेचे निरपेक्ष बुद्धीनें व लोक कल्याणासाठीं काम करणारे लोक थोडेच का होईना. हल्लींच्या सारखें कठीण व जे काम करताना बहुशा प्रशंसा होण्याचा संभव कमी असें काम करण्याकरितां पुढें आलें. याबद्दल ह्या प्रांतानें त्यांचें ऋणी रहावें ही गोष्ट जरी खरी आहे, तथापी आता पर्यंत जी प्रगती झाली आहे ती प्रगती जास्त व्यापक प्रमाणावर वाढाविणें ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणें आजपावेतों पतपेढ्या चालूं करण्याचे बाबतींत व त्या चालविण्याचें बाबतींत जीं कामें बिनसरकारी लोकांनीं आपल्या जबाबदारीवर करावयास पाहिजे होती तीं कामे करितांना सरकारी अधिकाऱ्यांची मदत वाजवीपेक्षां जास्त घेतली गेली असें मला वाटतें. चालूं असलेल्या पतपेढ्यांची देखरेख व तपासणी करण्याचे बाबतींत त्या त्या गांवच्या लोकांकडून ह्मणण्यासारखी मदत आजपावेतों मिळाली नाहीं, तथापी एकंदरीनें पाहतां जो प्रारंभ झाला आहे तो समाधानकारक आहे, परंतु त्यावरून ह्यीं पुढें सहकारी पतपेढ्या संबंधानें चळवळ करताना पूर्वीपेक्षां आपण आपलें पाऊल जपून टाकावें, असें न ह्मणता मी अशी आग्रहाची विनंती करतों कीं, सहकारी पतपेढ्या व ब्यांका चांगल्या तऱ्हेनें चालविणें जरी कठीण काम आहे तरी तुमच्या समाजातील बुद्धिवान व कर्तृत्वशील लोकांनीं ह्या कामीं लक्ष घालावें. यामुळें हल्लींपेक्षा ह्या कामीं वऱ्हाडांत जास्त लक्ष घालणारे लोक मिळाल्याशिवाय मला कधींहि समाधान वाटणार नाहीं. ह्या कामीं ज्या गृहस्थांनीं आपणाला पूर्वींच वाहून घेतलें आहे अशा लोकांच्या मदतीनेंच जास्त बिन सरकारी काम करणारे लोक आपण मिळविण्याची खटपट करणें हाच एक तरणोपाय आहे. सेंट्रल ब्यांकेच्या प्रत्येक डायरेक्टरांचें हें काम आहे कीं त्यानें आपल्या मित्रांची या चळवळीस पूर्ण सहानुभूती मिळविण्याची खटपट केली पाहिजे. ह्याकरितां सहकारी चळवळीची आवश्यकता हल्लीं किती आहे, यबद्दल एकंदर समाजांत जागृती केल्याशिवाय इष्ट परिणाम कधींही घडून येणार नाहींत. व्यापारांत वर्चस्व मिळण्याकरितां चाललेल्या चढाओढींत आपलें उच्चपद कायम राखण्यासाठीं जगांतील सर्व राष्ट्रें सहकारी चळवळीचें अवलंबन करीत आहेत, ही गोष्ट आपण जाणतच आहात. ज्या चळवळीची आवश्यकता इंग्लंड, फ्रान्स, इटाली आस्ट्रिया, जर्मनी, रशिया, जपान आणि अमेरिका या सारख्या बलाढ्य राष्ट्रांनासुद्धां भासली तिची आवश्यकता हिंदुस्थानासारख्या देशाला तर खात्रीनें आहेच आहे. हल्लीं चाललेल्या व्यापारी चढाओढींत हिंदुस्थानानें अगदीं खालच्या पायरीवर राहिलें तरी चालेल अशीच जर आपली इच्छा असेल तर मग मात्र पुढें बोलणें नाहीं. दक्षिण अमेरिकेमध्यें सुद्धां सहकारी चळवळ ही राष्ट्रीय जीवितांचें बरेच महत्वाचें अंग असल्याचें दिसून येते; व या चळवळीचा आयर्लंड, स्वीडन आणि डेनमार्क, या देशातील इतिहास पाहिला असतां हा सर्व प्रकार जादूचा खेळ तर नव्हेना अशी शंका येऊं लागते. सहकारी चळवळीचे मोठे उपयोग कोणते आहेत, या बद्दल वऱ्हाडांतील लोकांचो अद्याप समजून पडली नाहीं, असेंच मला ह्मणावें लागते. या चळवळीच्या योगानें जगांतील सर्व मोठीं राष्ट्रें आपापल्या प्रत्येक व्यक्तीचा व सर्व राष्ट्राची संपत्ती उत्पन्न करण्याची शक्ती वाढाविण्याचा प्रयत्न करीत आहेत. हल्लींच्या काळात कोणत्याही राष्ट्रानें स्वस्थ बसणें शक्य नाहीं. त्यानें एक पुढें तरी आलें पाहिजे नाहींतर मागें तरी पडलें पाहिजे. सहकारी चळवळीच्या मदती शिवाय कोणत्याही राष्ट्रानें पुढें पुढें पडणें शक्य नाहीं. तेव्हां आपल्या पुढें एकच प्रश्न आहे तो हा कीं आपल्या मनातून पुढें जावयाचे आहे, किंवा मागें पडावयाचें आहे? जर आपल्या मनांतून पुढें जावयाचें आहे तर या सहकारी चळवळीचें महत्व अद्यापि आपणाला कसें चांगलें समजलें नाहीं व तिला जास्त उत्साहानें मदत करण्याचें कसें आपल्या मनांत येत नाहीं? जे लोक आपल्या बांधवांत राहून आपल्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेनें, दुरदर्शीपणानें आणि उत्साहानें आपल्या इतर बांधवांच्या उपयोगी पडण्यास उद्युक्त असतात त्यांच्याच प्रयत्नानें सहकारी चळवळीचा पाया भक्कम होतो. युरोपांत ही सहकारी चळवळ अशाच लोक नायका कडून सुरु झाली व त्यांनींच आपल्या अज्ञान देश बांधवांना शिक्षण देण्याचें व्रत अंगिकारून ती चळवळ पुढें चालविली. ह्या सहकारी तत्वांच्या मदतीनें प्रगतीशील समाज आपल्या पुढील पिढीची प्रगती घडवून आणीत तिचा मार्ग सुलभ करीत आहे. ह्या लोकांना पुष्कळ प्रयत्न आणि स्वार्थ त्याग केल्याशिवाय ही प्रगती घडवून आणतां आली नाहीं. या कामाकरितां नेमिलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना औषधाप्रमाणें प्रगती समाजास पाजता आली नाहीं. कारण वर हुकूम सोडले, अगर एखादें खातें अस्तित्वांत आणलें ह्मणजे त्या बरोबर प्रयत्न व स्वार्थत्याग करण्याची बुद्धी तावडतोब उत्पन्न होईल असें सरकारास वाटत नाहीं. सहकारी तत्वांचें बीज लोकांच्या अंतःकरणांत रुजल्याशिवाय कधीही तिची खरी वाढ होणार नाहीं. या करितां तुह्मी आपल्या स्वतःच्या प्रयत्नावर व निश्चयावर भिस्त ठेवा व हें ही लक्षांत असूं द्या कीं व्यापारामध्यें हिंदुस्थानानें डोकें वर काढावें अशी जर तुमची इच्छा असेल तर सहकारी चळवळ अगदीं अवश्य आहे. ह्याकरितां या चळवळीस तुह्मी येथें जमलेल्या मंडळींनीं स्वतः मेहनत करून व त्याच प्रमाणें पैशाची मदत करून या चळवळीस साह्य करावे अशा बद्दल मी तुह्मां सर्वांना आग्रहाची विनंती करतो.

२ मी तुह्मास विनंती केली आहे त्या प्रमाणें स्वतः मेहनत करण्यास जर तयार झालांत तर ह्या चळवळीस पैशाची मदत हां हां ह्मणतां होईल याविषयीं मला संशय नाहीं. ह्या सेंट्रल ब्यांकांची व्यवस्था तुमच्यापैकीं ज्या गृहस्थाकडेस आहे त्यांच्या कडेस तुह्मी चौकशी केली, आणि ह्या ब्यांकाकडून वऱ्हाडांत हल्लीं काय काम होत आहे या विषयीं जर तुह्मी चौकशी केली तर तुमची खात्री होईल कीं सेंट्रल ब्यांकेची कामें जर बरोबर रीतीनें चालली तर ह्या निर्भय संस्था आहेत. सेंट्रल ब्यांका ह्या तुह्मीच चालवाव्या असा सरकाचा हेतू आहे, या करितां त्यांचीं कामें तुह्मीच पाहणें इष्ट आहे. व त्या निमित्त सरकाराकडून जितकी आवश्यक अशी मदत तपासणी वगैरे बाबतींत तुह्मास लागेल तिची मात्र तुह्मी अपेक्षा धरावी. तुह्माला तुमच्या पैशाची व्यवस्था ठेवता येत नसेल तर मग जास्त बोलण्याचीच गरज नाही. सेंट्रल ब्यांकेचें काम जो मनुष्य बत : करतो व ज्यानें आपले पैसे सदरहू ब्यांकेंत ठेवींच्या रुपानें ठेविले आहेत त्याला आपल्या पैशाची व्यवस्था किती चागल्या तऱ्हेनें झाली आहे, याबद्दल समाधान वाटल्या वांचून राहणार नाहीं. माझ्या असें कानावर आलें आहे कीं तुमच्यापैकीं कित्येकांस अद्यापि पैसे जमीनींत पुरून ठेवणें आवडते; सहकारी ब्यांका तुमच्याकरितां तुमचा पैसा जमीनींत पुरून ठेवीत आहेत. कारण ज्या शेतकऱ्यांनीं आपल्या शेतीच्या सुधारेणकीरतां आपल्या समाइक व अमर्यादित पतीवर पैसा कर्जाऊ घेण्याचें ठरविलें आहे, अशा लोकांच्या पतपेढ्यांना सदरहू

त्यांका तुमचा पैसा कर्जाऊ देतील व या प्रमाणें या सेंट्रल त्यांकाच्या योगानें तुमच्या पैशाचा वाढ होऊन शिवाय एकंदर प्रांतात त्यांच्या मदतीनें सुबत्ता वाढेल. तुमच्या पैकीं ज्या लोकांना जमीनीमध्यें कोणाला माहीत नाहीं अशा ठिकाणीं पैसा पुरण्याची सवय असेल ते लोक तुमच्या देशाचे शत्रू आहेत;— कारण असे लोक चोर आणि डाकेखोर यांच्या धद्यास एका परीनें उत्तेजन देतात. अशा तऱ्हेनें पुरलेला पैसा वाढीस लागत नाहीं, किंवा कोणत्याही योग्य कारणास लागत नाहीं, व तो पुरून ठेवल्या मुळें व्यापाराला ज्या भांडवलाची अगदीं आवश्यकता आहे तें भांडवल मात्र त्याला मिळू शकत नाहीं.

शेतकीच्या धंद्याला भरती ओहोटी लागू आहेच आणि हल्लीं वऱ्हाडांत कापसाचा भाव मंदावलेला असल्यामुळें जरी आपणाला थोडीशी काळजी वाटत असेल तरी शेतकीचा धंदा अजीबात कधींही थांबावयाचा नाहीं असें तुह्मास विचारांतीं दिसून येईल. दिवस व रात्र ही एकमेकांमागून नेहमीं यावयाचीच; अलीकडे आपणाला बरींच वर्षें तेजीची व बरकतीची गेलीं आहेत तेव्हां आपण मनांत पक्की खात्री बाळगावी कीं पुढें ही अशाच तऱ्हेचीं वर्षें आपल्या वाट्यास येतील; व्यापार विषयक अगर दुसऱ्या कोणत्याही चढाओढींत यशस्वी होऊन वर येण्यांत आपल्या अंगीं धैर्य धिमेपणा व उत्साह या गुणांची आवश्यकता आहे; व हल्लीं सारख्या काळातच अशा गुणांची फार वाण असते, व अशा काळांतच धैर्यवान आणि कमकुवत या मधील भेद दर्शविणारी रेषा स्पष्टपणें निदर्शनास येते. ह्या करितां वऱ्हाडांत जी सहकारी चळवळ सुरू झाली आहे ती पूर्ण उत्साहानें पुढें चालवा आणि जर तुह्मी तिला मनोभावानें मदत द्याल तर तुह्मास तिचे दृश्य परिणाम पाहून समाधान वाटल्या वाचून राहणार नाहीं; ही चळवळ चालविण्या करितां आह्माला स्थानिक मनुष्यांची गरज आहे; व या कामांत स्थानिक भांडवल जास्त मिळालें पाहिजे दुसरी कडून आणलेल्या पैशानें तुह्माला खरी सुधारणा घडवून आणता येणार नाहीं. तुमच्या प्रांताच्या बाहेरून पैसा आणणें जरूर आहे असें ह्मणणें ह्मणजे तुमचा दुबळेपणा तुह्मी कबूल केल्यासारखें होईल. जर तुह्माला बाहेरील मदतीवांचून चालत असेल तर तुह्मी आपल्या स्वतःचा पैसा ह्या कामांत घालून आपली कर्तबगारी व कर्तृत्वशक्ती लवकरच उघडकीस आणावी अशी माझी तुह्माला आग्रहाची विनंती आहे.

अपूर्ण

## कापूस

**( सांप्रतच्या क्रांतासंबंधाचे रा. रा. सी. ई. लो साहेब यांच्या विचारांचा [illegible]तार्थ)**

हल्लीं कापसाचा भाव फार मंद आहे आणि त्यामुळें आमच्या प्रांताच्या जगांत मोठी गडबड उडालेली आहे. ज्या भागात कापसाचें पीक हीच शेतकऱ्याची मोठी धनदौलत तेथें या मंदभावामुळें लोक मोठे अधीर अस्थिर व अगतिक झाले आहेत. गेल्या सालच्या कापसाच्या व्यापारांत पुष्कळ लोक बुडाले आहेत आणि सध्याच्या लढाईमुळें कापसाला गिऱ्हाईकही यथातथाच आहे. तेव्हां अशा स्थितींत कापसाच्या पेठेंत कोणकोणत्या नव्यागोष्टी उद्भवत आहेत आणि त्यांचा लोकांच्या स्थितीवर काय परिणाम होईल या विषयीं सरकारी लोक, व्यापारी लोक, व शेतकरी लोक अनुकूल व प्रतिकूल तर्क बांधीत आहेत. अशा घोंटाळ्याच्या व विचारांना निरनिराळ्या दिशेनें मोह पाडणाऱ्या घाबरलेल्या स्थितींत कांहीं मार्गदर्शक असे विचार रा० लोसाहेब यांनीं गेल्या शेतीच्या परिषदेपुढें मांडले आहेत. आणि त्या विचारांचे प्रकाशन आह्मी मुद्दाम करीत आहोंत कांकीं आमच्या मताने ते विचार ह्मणजे रस्ता चुकलेल्या गलबतांना जसा दीपस्तंभ तितक्याच महत्वाचे व नवीन विचारांना प्रवर्तक असे हे आहेत

रा० लोसाहेब हे [illegible] हिंदुस्थान सरकारच्या तैनातीस बढतीवर जात आहेत. तेव्हां त्यांच्या विचारांना लोक अधिक महती देतील. पण त्यापेक्षाहि त्यांची ती विचारसरणी अधिक बुद्धीला प्रकाशक वाटेल आणि आपल्या निबंधाच्या प्रारंभींच त्यांनीं ह्मणून ठेविलें आहे कीं या कापसाचे संबंधांत पुष्कळाचे अभिप्राय नानाविध पडतात आणि त्या [illegible] विरुद्ध मतें ही पुष्कळ आहेत. सरकारच्या बाजूनें आपण कांहीं सांगत नाहीं हें त्यांनीं मुद्दाम बजावून लिहिलें आहे. आपण ज्या गोष्टी संकलित केल्या आहेत त्या लोकांनीं विचारांत घेऊन ज्याचा त्यानें निर्णय करण्याचा प्रयत्न करावा ह्मणजे हल्लींची वस्तुस्थिति किती संकटमय व विलक्षण आहे हें ध्यानांत येईल व अशा परिस्थितींत सरकारास कोणतीही निर्णयात्मक गोष्ट ठरविणें अत्यंत कठीण आहे हेंही कळून चुकेल.

### कापसाच्या विक्रीचा अंदाज

हिंदुस्थानच्या कापसाची स्थिति जवळ जवळ अशी आहे. गेल्या सालीं जो कापूस बाहेर पाठविण्यात आला त्यापैकीं १ ऱ्या हिश्याहूनही थोड्या अधिक कापसाला कोणी घेवालच राहिलेला नाहीं. हल्लीं ज्या राष्ट्रांत लढाई चालूं आहे त्या राष्ट्राकडूनच हा कापूस गुदस्ता मागविण्यांत आला होता आणि हल्लींच्या या महायुद्धामुळें कापसाचे उद्योगधंदे बंद पडले आहेत व सर्व जगभर माल ने आण करण्याचे दर वाढले आहेत व व्यापाऱ्यांची परस्परामध्यें पतही यथातथाच राहिलेली आहे.

हिंदुस्थानांतून एकंदर १०६२६००० हंड्रेडवेट इतका कापूस बाहेर देशीं पाठविला जातो त्यापैकीं

जर्मन १६८८०००
बेलज्यम ११३३०००
ऑस्ट्रिया ७४७०००
फ्रान्स ९२४०००

येणें प्रमाणें कापूस बाहेरदेशीं पाठविण्यांत आला आहे. लढाईमुळें जपान देखील कापूस पुष्कळ कमी विकत घेईल तिकडे त्यांचे माग अगोदरच कमी कमी वेळ चालवितात आणि त्या राष्ट्राचा इरादा हा मागाचा धंदा अधिक कमी करण्याचा आहे. उलटपक्षीं कापसाचा व्यापार ग्रेटब्रिटननें लढाईमुळें बंद केलेला नाहीं तेव्हां जर्मनींतल्या गिरण्या इटली व हॉलंड या राष्ट्रांच्या मार्फतीनें कांहीं कापूस तिकडे नेतील व तेवढा तो आपणास फायदा होईल.

देशांतल्या देशांत ६४४९००० हंड्रेडवेट कापूस गिरण्यांना लागतो आणि १६०७००० हंड्रेडवेट कापूस गिरण्यांतील मालांना लागण्याचा संभव आहे.

पण यंदा एवढा कापूस गिरण्याकडे लागणार नाहीं. कांहीं तज्ञ लोक ह्मणतात कीं गिरण्याकडे खपणारा कापूसही एक तृतियांशनें कमी लागेल. सारांश असा निघतो कीं एकंदर हिंदुस्थानांतील कापूस नेहमीं जितका साधारणपणें विकतो त्या पैकीं शेकडा ४० या प्रमाणांत कापसाचा खप कमी होण्याचा संभव आहे.

कापसाच्या भावा संबंधानें विचार करितांना असा अंदाज काढतात कीं एक एकर कापसाचें पीक काढतांना शेतकऱ्याना २० रु० खर्च येतो. यांत सरकारी सारा धरला आहे. या खर्चाचा पिकाशी ताळा बसविला असतां दर नागपुरी खंडीस रु० ३९ खर्च येतो. जर शेतकऱ्याला भाव ४० रु० खंडी प्रमाणें मिळेल तर त्याची आदा व व्यय याची दोन्हीं तोंडे रमारमीनें मिळतीं राहतील. पण नागपूरकडे व वऱ्हाडांत शेती नफ्यानें देण्याची वहिवाट विशेष आहे. वऱ्हाडचे कमिशनर रा० स्टँडन साहेब यांनीं असा अंदाज काढला आहे कीं एकंदर वहितींतील शेतीपैकीं निम्म्याहून कमी नाहीं इतकी शेती सरकारी साऱ्याच्या चौपटी इतक्या स्वामित्वावर नफ्यानें दिली जाते. तेव्हां अशा पोट वहितदारांना शेतीचा खर्च दर एकरीं कमींत कमी ३० रु० पडतो आणि नागपुरी खंडीला जर ९२ रु० भाव येईल तरच त्यांचा निभाव होईल.

शेतकरी लोकांना सध्याची स्थिति पक्की कळून चुकली आहे आणि ह्मणूनच बाजारांत कापूस आणूं इच्छित नाहींत. आणि यंदा हंगामही थोडा उशीराच सुरू झाला आहे. या रीतीनें निदान कापसाचें अर्धे पीक तरी पुढील मे महिन्यापर्यंत बाजारांत न आणण्याची लोकांची तयारी आहे. आणि मग असा अंदाज आहे कीं गेल्या ४।९ वर्षांचा जर सरासरीने भाव काढला तर त्या भावाच्या रुपयाचे मागें १४ आणे या दरानें पुढें किंमत येण्याचा संभव आहे. वऱ्हाडांत क्षेत्राच्या मानानें कापसाचा पेरा शेंकडा ४० या प्रमाणांत आहे. कापसाच्या पिकाची इतर खरीप व रबीच्या पिकाशी तुलना केली असतां असें दिसून येइल कीं कापसास इतर पिकां पेक्षां दुपटीनें भाव येत असतो. तेव्हां जेवढा आतां मोठा पुकारा झाला आहे तेवढें शेतकऱ्यांना नुकसान येण्याचा संभव नाहीं व शेतकऱ्यांना दुष्काळांतल्या सारखी मदत देण्याचा किंवा सरकार सारा एक वर्षभर तहकूब ठेवण्याचेंही प्रयोजन दिसत नाहीं.

कापसाच्या भावाला कृत्रिम तेजी आणण्यासाठीं कांहीं लोक असें सुचवितात कीं नवें सरकार पाटस्थळें काढून पैसा खर्च करितें व भाताचें पीक वाढवितें तसा तेजीचा कापूस खरेदी करण्यांत पैसा गुंतविला तर जपानसारख्या राष्ट्राला जो हल्लीं दोन वर्षें पुरण्या इतका कापूस फुकट किंमतीस घ्यावयास सांपडत आहे तसा प्रसंग येणार नाहीं. पण या सूचनेबद्दल रा. लो साहेब ह्मणतात कीं यांत कांहीं अर्थच नाहीं बाकी हें खरें कीं लढाई थांबल्यानंतर आणि कपाशीचा पेरा कमी झाल्या नंतर आपोआपच कापसाला तेजी येईल.

जर कापूस बाजारांतच कमी भावानें विकूं द्यावयाचा नाहीं असा बेत केला तर पुढील सालच्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत एक तर टिकाव धरला पाहिजे आणि ही सूचना अमलांत आणतांना पुढील उन्हाळ्याच्या वेळीं लोकांना समजावून सांगून कपाशीचा पेरा होता होईल तितका कमी केला पाहिजे ह्मणजे हल्लीं रिकामा पडून राहिलेल्या कापसाला साहजीकच चांगला भाव येईल आणि कपाशीचें क्षेत्र कमी करी करण्याकडे शेतकरी लोकही तत्परतेनें प्रवृत्त होतील. आणि मधींत अशा रीतीनें कापसाच्या व्यापाऱ्यां जवळ हल्लीं तुंबून पडलेला माल पुढल्या हंगामापर्यंत विकून टाकण्याला चांगली संधी मिळेल. आणि जो कांहीं व्यापाऱ्यांचा सल्ला पुढील हंगामापर्यंत कापूस गाळूं नये असा आहे त्यांत विशेष खोलपणा दिसत नाहीं.

वरील सर्व सूचनांपेक्षा एक सूचना अशी आहे कीं सरकारनेंच बाजारभावानें पुष्कळसें कापसाचें पीक खरेदी करावें. ९।६ वर्षांपूर्वीं ब्राझील येथील सरकारनें पाच लक्ष पौंड किंमतीची कॉफी विकत घेतली आणि या रीतीनें कॉफीची किंमत वाढवून दिली. ब्राझिलमध्यें कॉफीचेंच मोठें पीक असतें, इजिप्तमध्येंहि असा प्रकार करण्यात आला होता असें आपण वृत्तपत्रांतून वाचतों पण हिंदुस्थानपेक्षां इजिप्त कापसावर विशेष अवलंबून असतो हें लक्षात ठेवावयास पाहिजे. प्रथमतः अशा सरकारी खरेदीनें जे शेतकरी आपला कापूस विकतील त्यांस कांहीं फायदा नाहीं. जे सरकारची खरेदी होईपर्यंत थांबतील त्यांनाच फक्त फायदा होईल. इतका कापूस खरेदी करण्याला क्रोडो रुपये लागतील व लढाईवर पैसा जर लागला तर सरकारजवळ इतका पैसाहि या खरेदींत अडकावून ठेवतां येण्य जोगा नाहीं. शिवाय त्यास बऱ्याच अडचणी येतील त्या निराळ्या आणि ही कुठली भानगड केली असें होईल.

वरील सूचनेचें दुसरें बदललेलें रूपांतर असें आहे कीं सरकारनें कापसाच्या गाठांवर कुळाला आगाऊ निम्मे किंमत द्यावी आणि मग जेव्हां भाव चांगले येतील तेव्हां आपल्या गाठी विकून सरकारची रकम सव्याज परत करावी या रीतीनें सरकारला आगाऊ फक्त निम्मेच रकम गुंतवावी लागेल.

हिंदुस्थानचें यंदाचे कपाशीचें पीक पन्नास लक्ष गठडी होईल, त्या पैकीं १२ लक्ष गठडी कापूस वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून होईल. फारच मोठ्या रकमा या कामाला पाहिजे हें उघड आहे. आणि बंगालचे तागवाले शेतकरी मद्रासचे भुईमूग उत्पन्न करणार शेतकरी, संयुक्तप्रांत व पंजाब कडील गळीताचीं धान्यें उत्पन्न करणारे शेतकरी हे ही पुढें येतील व सरकारची अशीच मदत मागतील आणि मग एकंदर मांडला एवढा विलक्षण फुगेल कीं सरकार कितीही श्रीमान् असलें तरी एवढी रकम उभारणें सरकारच्या शक्तीबाहेरच आहे. कापूस सांठवून ठेवणें जितकें वाटतें तितकें कठीण नाहीं. वऱ्हाडांतच दोन लाख गांठी साठवून ठेवतां येतील व मे महि-

त्याचे सुमारास जिनाचे व इतर कारखाने खाली झाल्यावर तेथें ही गठड्या, सांठविता येतील.

शेतकऱ्यांना या वेळीं तगाईच्या रूपानें मदत देण्यांत यावी व तगाईची रकम कापसाच्या निम्या किंमती पर्यंत दिली जावी अशी एक सूचना आहे. ही सूचना अमलांत आणणें शक्य नाहीं. व लोकांकडून ही तगाई वसूल करणें हा मोठ्या मुष्किलीचें होईल. शिवाय पावसाळ्यांत कापूस सांठविणें मोठ्या अडचणीचे आहे. आणि तगाई दिल्यानंतर शेतकरी बाजारांत मंद भावानें कापूस विकून घेईल तो पैसा वसूल करून घेणार नाहीं या बद्दलची कांहीं शाश्वती नाहीं. या सूचनेंत थोडा फरक करून डेप्युटी डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर रा० क्लूस्टन हें ह्मणतात कीं कांहीं सहकारी पतपेढ्या काढाव्या आणि त्यांना सरकारांतून व ब्यांकेकडून पृथक् पृथक् व समाईक जबाबदारीवर रकमा देण्यांत याव्या. आणि त्या रकमांतून कापूस सांठविण्यांत यावा. तगाई इतक्या या सूचनेंत अडचणी नाहींत हें खरें आणि जर पैसा मिळण्यासारखा असेल तर ही सूचना अमलांत आणावयास हरकत नाहीं परंतु या व्यवस्थेला निराळाच अडचण आहे. जर आगाऊ दिलेल्या रकमेच्यापेक्षाहि भाव खालीं उतरेल तर सरकार किंवा ब्यांक या घाईघाईनें बनविलेल्या नामधारी पतपेढ्याकडून लागलीच बाजारभाव व आगाऊ दिलेली रकम यामध्यें कमी पडणारी रकम भरून मागतील आणि तेव्हां अमानत ठेवलेला कापूस ही रकम देण्याकरितां विकावा लागेल. समजा शेतकऱ्यानी ७० रु० गांठीला भाव होता तेव्हां रु० ३९ ॲडव्हान्स घेतला पुढें भाव ३० रु० गांठ इतका उतरला तेव्हां शेतकऱ्याचा ३० रु० च्या भावानें ७० रु० भावाच्या वेळीं ठेविलेला कापूसहि विकला जाईल व त्याशिवाय त्यावर ९ रु० चा दावा होईल. तेव्हां सारांश असा निघतो कीं जर शेतकऱ्याना आगाऊ रकम द्यावयाची असेल तर ती सरकारातून मिळाल्यास कांहीं वास्तविक उपयोग होईल. पण अशा कामाला प्रचंड रकमा लागतात.

या नंतर सरकारनें बॅंकेला पैसे पुरवावे आणि कापसाच्या गठड्या जितक्या आपल्या ताब्यांत घेतील त्या मानानें बॅंकवर हुंडी द्यावी अशा प्रकारच्या एका सूचनेचा या निबंधात रा. [illegible]साहेब यांनीं उल्लेख केला आहे व तिचीहि अशक्यता निरनिराळ्या बाजूंनें दाखविली आहे.

हल्लींच्या सहकारीपेढ्या फारच लहान प्रमाणावर आहेत. त्यापासून फारशी मदत होण्याची आशा नाहीं. सहकारीपेढ्या मोठ्या प्रमाणावर काढल्यास ह्या अडचणीच्या वेळीं त्यांचे तुह्मास सहाय्य होऊन बचाव होण्याचा संभव आहे. जर ह्या वेळेला वऱ्हाडांत सहकारीपेढ्या चांगल्या असल्या तर योग्य वेळेवर पुष्कळसे लाख रुपये नसले तरी कांहीं लक्ष रुपयानें या कापसाच्या भावांत पुष्कळसा फरक पडला असता.

तेव्हां या कापसाच्या प्रश्नाकडे कोणत्याही दृष्टीनें पहा या प्रकरणांत पुष्कळच अडचणी आहेत. तेव्हां हिंदुस्थान सरकार आपला निकाल लवकरच काय देईल हें पहाण्याकडे सर्वांचें लक्ष लागलेलें आहे. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रमाणें दुसऱ्याही लोक यांच्या कल्याणाकडे सरकारास लक्ष पुरविलें पाहिजे. सध्या लढाईला पैसा पाहिजे. पलटणी घोडे हें लढाईसाठीं हिंदुस्थानांतून जे जात आहेत ते पाठविण्यास पैसा पाहिजे. त्यांच्या अन्न सामुग्रीची व्यवस्था केली पाहिजे आणि यूरोपच्या हवेंत या सैन्याच्या सुख सोईची योजना केली पाहिजे. आणि या सर्व गोष्टी अशावेळीं आल्या आहेत कीं रेल्वेचें, नकातखात्याचें, व इतर उत्पन्नें अगदीं उतरलीं आहेत. सरकार जवळ साधनें पुष्कळ आहेत व सरकारची पतही जगांत उत्तम आहे. जर्मनी व आस्ट्रिया यांच्या सारख्यांची आपल्या सरकारपुढें पत ती काय ! पण ही सरकारची पत फारच फार दक्षतेनें राखली पाहिजे आणि अशावेळीं ज्या योजनांच्या लाभापेक्षां नुकसानीचा संभव अधिक अशा योजनांकडे या पतीचा उपयोग होतां कामा नये.

---

## कोनशिला समारंभ

### (एका स्त्रीप्रेक्षका कडून)

गेल्या बुधवारीं सायंकाळीं स्त्रियांच्या नव्या दवाखान्याचा कोनशिला प्रस्थापित करण्याचा समारंभ भावी इमारतीच्या पटांगणावर उभारलेल्या व श्रृंगारलेल्या तंबूमध्यें श्री. सौ. स्टॅंडनबाई यांच्या हस्तें साजरा करण्यांत आला. राज्यश्रीचा बहुमान सौ. स्टॅंडनबाईना देण्यांत आला व त्यांच्या यशस्वी हाताला हें पुण्य कर्म करण्याचा लाभ मिळाला हीही गोष्ट यथोचितच होय. या सभेच्या प्रसंगी रा. रा. रामभाऊ महाजनी यांनीं संस्थेच्या वर्णनावर व प्रशंसावर संभाषण केलें. त्या भाषणांत आजपर्यंत जमलेली वर्गणी ३६००० रुपये, येऊं घातलेली वर्गणी १४००० रुपये व त्या शिवाय सरकारांतून मिळावयाची भली मोठी रकम इत्यादि गोष्टींचा त्यांनीं उल्लेख केला. त्या नंतर रा. स्टॅंडन साहेब यांचें इंग्रजींत जें भाषण झालें त्याचा गोषवारा कोणीतरी मराठींत सांगितला असता तर ता सभेंत जमलेल्या बायकांच्या मनाला विशेष रुचला असता. असो.

पानसुपारीच्या वेळा नामदार रा. ब. दामले, दादासाहेब महाजनी, नानासाहेब ढांगे इत्यादि ठरविक मंडळींनीं तेथें जमलेल्या मुख्य मुख्य स्त्री पुरुषाच्या गळ्यात पुष्पहार घातले व हंसत हंसत मुजरा करितांना त्यांची गर्दीही उडाली. पण अशा वेळीं तेथील सन्मान्य मंडळींनी त्याच्या गळ्यांत जर हार घातले असते तर विशेष शोभा आली असती. जेथें जेथें सभा भरतात तेथें तेथें सरकारी माणसांची इतकी पुजा अर्चा होते कीं देवांना आपल्या उंच आसना वरून उठावेंसें वाटत नाहीं किंवा आमच्या या गजमान्यांना दुसऱ्याचा मान करण्या पर्यंकडे कोणताच बहुमान मोठा वाटत नाहीं. वरील समारंभाचे वेळीं भरगच्च भरलेल्या पुष्पहारांपैकीं एकही मोठा हार एका बाजूस बसलेल्या हिंदी स्त्रियांच्या वाट्यास आला नाहीं. सौ० स्टॅंडनबाई सारख्या बाया बसूं लागतात तेव्हा कांहीं कांहीं पुजारी मंडळी सत्य गमनासाठीं तंबूच्या दोन्या वर खालीं करितात, खुर्च्या थोड्याशा हातानें हालविल्या सारख्या करितात. पण त्याच्यामध्यें आपल्या नेहमींच्या परिचयातील स्त्री वर्गाबद्दल इतक्या पूजाविधीचा मागमूसही दिसत नाहीं. आणि त्यामुळें हें अंतर पाहून मनाला कससेंसें वाटतें. कदाचित् ही शिष्टाचाराची कल्पना असाधी तितकी दांडगी नसेल. या वेळीं जर एखाद्या रावबहादुरांच्या मातुश्रीला किंवा पत्नीला अध्यक्ष स्थानाचा बहुमान दिला असता तर सौ० स्टॅंडनबाईसारख्या थोर मनाच्या बायांना त्या गोष्टीचें विशेष कौतुक वाटून त्यांनीं या समारंभाला विशेष बहार आणली असती.

---

## लढाईच्या संक्षिप्त बातम्या.

पंचम जॉर्ज बादशहाचे वडील चिरंजीव प्रिन्स ऑफ वेल्स हे युद्धावर गेले आहेत. ब्रिटिश सरकार युद्धासाठीं ह्मणन एक फार जंगी रकम कर्जाऊ काढीत आहे. युद्धामुळें विलायतेंत प्राप्तिवरला कर दर पौंडाला २॥ शिलींग करण्याचें घाटत आहे. तसेंच चहा व दारू यांच्यावरची जकात वाढणार आहे. इप्रेस व डिक्समूडच्या बाजूला निकरानें लढाई चालली आहे. कॅले जर्मनीनें घेतल्याच्या कंड्या आज कित्येक दिवस इकडे उठल्या आहेत, पण त्या निवळ खोट्या आहत. कॅलेच्या जवळ जवळ सुद्धां जाणें जर्मनीला मुष्किल झालें आहे. इंग्रज व हिंदी यांची फळी फोडली पाहिजे असें वाटून जर्मन केसरनें या कामावर आपले अगदीं वेचक शूर लोक पाठविले त्यांनीं ती फळी तीन ठिकाणीं फोडली, आणि मग रानांत दोन्ही सैन्यांचें घनघोर युद्ध झालें. इंग्रजांनीं जर्मन लोकांना भाजी चिरतात तसें कापून काढलें या एका लढाईंत जर्मनीचीं ९०,०० माणसें मारलीं गेलीं असावीं असा अंदाज आहे. बेलजमच्या लोकांनीं पुनः कालव्यांतून पाणी सोडल्यामुळें जर्मन लोकांना 'त्राहि भगवन्' ह्मणण्याची पाळी आली. रशियन सैन्य प्राशियामध्यें पुढें पुढें सरकत चाललें आहे. रशियन फौजेला आपल्या घरांत पुष्कळ चांगलें येऊं द्यावयाचें आणि मग तिला हात दाखवावयाचा व पळतां पळतां पुरे वाईट होईल असें करावयाचा जर्मनीचा बेत असल्यास नकळे. रशियन फौज प्रेम झिसलला वेढा घालण्याच्या तयारींत आहे. क्राकाउला आग लागल्याची खबर आहे नवी आस्ट्रियन सेना सर्व्हियामध्यें शिरली आहे तुर्की सैन्यानें एकेमार्गी रशियन सैन्याला मागें हटावयाला लाविलें, पण रशियनांनीं मागून जोरानें हल्ला करून तुर्कांना चीत केलें. हिंदुस्थानांतून गेलेल्या फौजेनें शेख सैयद नांवाचें तुर्कीचें एक ठिकाण घेतलें तुर्कस्थानांत जो जपानचा वकील आहे त्यानेंही आपण निघून जाण्याची इच्छा दर्शवून परवाना मागितला आहे.


---

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— थंडी चांगली चमकूं लागली आहे. आकाश स्वच्छ असतें दुपारीं सूर्यही चांगला तापतो. ज्वारीची सोंगणी व कपाशीच्या वेंचण्या चालू आहेत. सध्यां हवा आरोग्यकारक आहे. रोगराई विशेष नाहीं.


**सतत ६० वर्षाच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला**

**दूषित रक्त शुद्ध करणारा**



शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक—** डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई. नंबर २

नो० नं० १११


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें